Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

✲ वर्ष ५४ ✲ अंक २०८ ✲ ✲ नागपूर ✲ | मंगळवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२४ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## पोटनिवडणुकीची तारीख बदलली

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४:
उत्तर प्रदेश, पंजाब आणि केरळमध्ये विधानसभा पोटनिवडणुकीच्या तारखा बदलल्या आहेत. निवडणूक आयोगाने सोमवारी सांगितले की, तीन राज्यांतील 14 विधानसभा जागांसाठी आता 13 नोव्हेंबरऐवजी 20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. 23 नोव्हेंबरलाच निकाल लागेल.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, आता उत्तर प्रदेशातील 9, पंजाबमधील 4 आणि केरळमधील 1 विधानसभा जागांवर 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. कार्तिक पौर्णिमा, गुरुनानक देवजीं प्रकाश पर्व आणि केरळमध्ये कलापथी रास्तोलसेवाम साजरा केला जाणार आहे. हे लक्षात घेवून निवडणूक आयोगाने तारखेत बदल केला आहे.

## बस दरीत कोसळली, ३६ प्रवासी ठार

■ वृत्तसंस्था, अल्मोडा, दि. ४ :
उत्तराखंडमधील अल्मोडा येथे सोमवारी सकाळी 8 वाजता एक प्रवासी बस 150 फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात 36 जणांचा मृत्यू झाला, तर 6 जण जखमी झाले. अल्मोडा येथील कुपीजवळ हा अपघात झाला. बसमध्ये 42 प्रवासी होते. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. अपघाताचे कारण समजू शकलेले नाही. वळणावर बसचे नियंत्रण सुटले आणि ती खाली कोसळली.

'बस नदीच्या 10 फूट आधी झाडात अडकल्याने थांबली. खड्ड्यात पडताना धक्का लागल्याने अनेक प्रवासी खिडक्याबाहेर पडले. बस किनाथहून रामनगरकडे जात होती.

दिवाळीच्या सुट्टीनंतरचा सोमवार हा पहिला कामाचा दिवस होता. त्यामुळे बस पूर्ण भरली होती. जास्तीत जास्त स्थानिक लोक प्रवास करत होते.

▶▶ पान ८ वर

## राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:
राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची अखेर बदली करण्यात आली आहे. रश्मी शुक्ला यांच्यावर फोन टॅपिंगचे गंभीर आरोप होते.



त्यामुळे काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्षांनी

▶▶ पान ८ वर

अग्रलेख

## खरीखरी...

# बडा दिवस

महाराष्ट्राच्या इतिहासातील जे काही महत्त्वाचे दिवस आहेत. त्यात आजच्या दिवसाला सर्वात 'बडा दिवस' असे म्हणता येईल. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर 1960 ते 2024 या कालखंडात निवडणुकांच्या राजकारणात जी पक्षांची आणि अपक्षांची भाऊ गर्दी झाली आहे. तशी गर्दी आजपर्यंत कधीच बघितली नव्हती. नाही म्हणता 1995 साली तीन डझनपेक्षा जास्त अपक्ष निवडून आले आणि त्या अपक्षांच्या पाठबळाशिवाय कोणतेही सरकार स्थापन होणे शक्य नव्हते. यंदा युती आणि आघाडी मधील सहा पक्षांशिवाय इतर लहान मोठ्या पक्षांची आणि युतीसह आघाड्यातील पक्षांच्या बंडखोरांची संख्या फार मोठी आहे. आता या अपक्षांच्या पाठबळावरच सरकार स्थापन करावे लागते की, देशातील सध्याच्या द्विपक्षीय लढाईत कोणत्यातरी एका पक्षाला बहुमत मिळते. हे पुढे बघावेच लागेल. भारतीय जनता पक्ष विधानसभेत सर्वात मोठा पक्ष आहे. या पक्षाच्या उमेदवारीसाठी आजही रांगा लागलेल्या आहेत. तिकीट मिळाले नाही म्हणून अनेकांनी बंडखोरी केलेली आहे. पण या बंडोबांना भारतीय जनता पक्षाच्या यंत्रणेने थंड करून पक्षाची मोठीच सेवा केलेली दिसते. एवढे असूनही बऱ्यापैकी बंडखोरांची राज्यात सध्या चलती आहे. गोपाळ शेट्टी यांच्यासारखे खासदार शेलारांच्या फडणवीस पुरस्कृत विनवणीमुळे असेच विरघळलेले आहेत. त्यांनी उमेदवारी मागे घेतली आहे. आर्वी मतदार संघात आमदार केचे यांनी सुद्धा आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. अशी अनेक उदाहरणे महायुतीत आहेत. त्या मानाने काँग्रेस पक्षातील बंडखोरी शमवण्यात त्या पक्षाला एवढे यश मिळालेले दिसत नाही. कोल्हापुरात तिकीट देऊनही एक उमेदवाराने काँग्रेसचे तिकीट नाकारून निवडणुकीतून चक्क पळ काढलेला आहे. ही बाब अत्यंत महत्वाची आहे. कालपर्यंत मराठा समाजाचे आक्रमक नेते मनोज जरांगे पाटील कोणती भूमिका घेतात व आपले किती उमेदवार मैदानात उतरवतात. याचे राज्यभर मंथन चालले होते. काल त्यांनी काही उभ्या केलेल्या उमेदवारांची नावेही जाहीर केलेली होती. त्या उमेदवारांना पाठिंबाही दिला होता. पण रात्रभरात अशी काही कळ फिरली की, मनोज जरांगे यांनी चक्क निवडणुकीतून माघार घेतलेली दिसत आहे. जरांगे यांनी याबाबतीत दिलेले स्पष्टीकरण सर्वांनाच मानवेल असे नाही. पण त्यांनी घेतलेला हा निर्णय निश्चितच योग्य आहे. यात संशय नाही. जरांगे यांनी जी सामोपचाराची भाषा केली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. आताच्या निवडणुकीत प्रत्येक मतदारसंघात उमेदवारांची फौज उभी आहे. त्यामुळे येत्या पंधरा दिवसात कोणाचे घोडे मैदानामध्ये किती दौडतात, यावर सगळे गणित अवलंबून आहे. एक गोष्ट मात्र नक्की आहे. ती म्हणजे, अशी निवडणूक गेल्या दहा हजार वर्षात कधीच झाली नाही. म्हणूनच आम्ही म्हणतो की आजचा दिवस हा 'बडा दिवस' आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मनोज जरांगे पाटील यांची निवडणुकीतून माघार

■ वृत्तसंस्था, जालना, दि. ४ :
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुस्लिम आणि दलित समाजासोबत विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची घोषणा केली होती. मात्र, उमेदवारी अर्ज वापस घेण्याच्या दिवशी सकाळपर्यंत उमेदवार देण्याबाबत मित्र पक्षांची यादी आली नसल्याने आपण कोणत्याच मतदारसंघात उमेदवार देणार नसल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.



मराठा समाजाचे उमेदवार एका जातीवर निवडून येऊ शकत नाही त्यामुळे एका जातीवर लढणे शक्य नसल्याचे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला.

याला पाडा, त्याला पाडा, अशी भूमिका देखील घेणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. मात्र, मराठा समाजाचे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. निवडणूक झाल्यानंतर पुन्हा एकदा मराठा आंदोलन सुरू करणार असल्याचा इशारा देखील त्यांनी सरकारला दिला. मतदारसंघ निश्चित झाले होते. उमेदवारांची नावे देखील निश्चित झाली होती. उमेदवारांची यादी होती. मात्र, मित्र पक्षांनी त्यांची यादी पाठवली नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे एका जातीवर कसे लढणार? यामुळेच निवडणुकीतून माघार घेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडी असो की, महायुती असो, दोन्ही कडचे नेते हे सारखेच आहेत. त्यामुळे कोणाला पाठिंबा देत नाही किंवा कोणालाही निवडून आणा, असे देखील म्हणत नाही. केवळ माझे आंदोलन सुरू राहणार आहे. माझ्या आंदोलनात मला कोणी डिचवले तर मी त्याला सोडणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ही माझी माघार नसून हा गनिमी कावा असल्याचा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

## स्कॉर्पिओ खड्डयात, ८ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, बलरामपूर/छत्तीसगढ, दि. ४:
बलरामपूर जिल्ह्यातील राजपूर येथील लाडूवा गावाजवळ भरधाव वेगाने जाणारी स्कॉर्पिओ पलटी होऊन पाण्याने भरलेल्या खड्डयात घुसली. या अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला. अपघातात गंभीर जखमी झालेल्या चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रात्री उशिरा आणखी एका तरुणाचा मृतदेह खड्डयातून बाहेर काढण्यात आला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील चार जणांचा समावेश आहे.

ज्या खड्डयात स्कॉर्पिओ घुसली होती तो खड्डा झुडपांनी वेढला होता आणि सुमारे 10 फूट पाण्याने भरला होता. अपघातानंतर वाहनाचे सर्व गेट लॉक झाले होते, काचाही बंद होत्या, त्यामुळे कोणालाही बाहेर पडता आले नाही. फक्त ड्रायव्हरच्या गेटची काच उघडी होती. त्यानंतर पोलिसांना अपघाताची माहिती देण्यात आली.

दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ) द्वारा संचालित

AVBRH आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय | SMSC शालिनीताई मेघे सुपरस्पेशालिटी सेंटर | SGMCH सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल

सावंगी (मेघे), वर्धा, महाराष्ट्र - 442 004

स्पेशालिटी
- जनरल मेडिसिन विभाग
- जनरल सर्जरी विभाग
- नेत्ररोगशास्त्र विभाग
- प्रसूती आणि स्त्रीरोग विभाग
- अस्थिरोग विभाग
- बालरोग विभाग
- नाक, कान, घसा रोग विभाग
- मानसोपचार विभाग
- त्वचाविज्ञान विभाग
- श्वसनरोग विभाग
- वंध्यत्व निवारण (आयव्हीएफ) विभाग
- रेडिओ डायग्नोसिस अँड इमेजिंग

सुपर स्पेशालिटी
- मेंदूच्या शस्त्रक्रिया (न्यूरोसर्जरी)
- मेंदू शास्त्र (न्यूरोलॉजी)
- हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी शस्त्रक्रिया
- हृदयरोग चिकित्सा
- इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी
- गॅस्ट्रोएंटेरोलॉजी
- पेन मॅनेजमेंट
- मूत्ररोग विज्ञान (युरोलॉजी)
- मूत्रपिंड रोग (नेफ्रोलॉजी)
- क्रिटिकल केअर
- नवजात शिशु शास्त्र (निओनेटोलॉजी)
- प्लास्टिक आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी
- बालरोग शस्त्रकिया
- अवयव प्रत्यारोपण
- एंडोक्रायनोलॉजी
- संधिवातशास्त्र
- केश प्रत्यारोपण
- कर्करोग उपचार
  - किमोथेरपी
  - रेडिएशन थेरपी
  - ब्रॅकीथेरपी
  - सर्व प्रकारच्या कर्करोगाच्या शस्त्रक्रिया

दीपोत्सवाच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा



अत्याधुनिक आणि विश्वासार्ह
उपचार देणारे एकमेव सुपरस्पेशालिटी रुग्णालय

डायबेटिक क्लिनिक 5000+
सीव्हीटीएस 6102
किमोथेरपी 9148
युरो शस्त्रक्रिया 4580
एक्सटर्नल बीम रेडिओथेरपी 1148
प्लास्टिक शस्त्रक्रिया 8000
रोबोटिक्स सर्जरी 55
मूत्रपिंड प्रत्यारोपण 113
ऑन्को-सर्जरी 2025
व्हॉल्व बदलण्याची शस्त्रक्रिया 984
मिनिमल इनवेसिव्ह सर्जरी 5000
पेन क्लिनिक 2000+
यकृत प्रत्यारोपण 02
इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी 7441
कॉक्लियर इम्प्लांट्स 06
ओपन हार्ट सर्जरी 4500
अँजिओग्राफी 8290
आयव्हीएफ 351
इम्युनोथेरपी 250
स्माईल ट्रेन प्रकल्प शस्त्रक्रिया 2570
न्यूरो सर्जरी 4150
अँजिओप्लास्टी 3376

सर्व TPA / विमा / कॅशलेस शासकीय योजनांचा लाभ.

24/7 Emergency Services 9209054476

सावंगी मेघे, वर्धा - 442 001 9513252322 | 9513253110
www.avbrhsawangimeghe.com info@avbrhsawangimeghe.com

# महेश बालदी यांनी आगरी समाजाची जाहीर माफी मागावी

**पनवेल, दि. ४ : प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभेच्या निवडणुका होवू घातल्या आहेत, त्या निडणुकीमध्ये अखिल आगरी समाज परिषद राजकारणापासून अलिप्त आहे असे असताना उरण विधानसभेतील उमेदवार महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत मी अखिल भारतीय आगरी समाज परिषदेच्या निवडणूकीला उभा नसून, विधान परिषदेच्या निवडणूकीला उभा आहे, असे वक्तव्य करून आगरी समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. हे त्यांचे वक्तव्य निषेधार्थ असून आगरी समाजाची त्यांनी जाहीर माफी मागावी. असे अखिल आगरी समाज परिषदेने त्यांना सुचविले आहे.

अखिल आगरी समाज परिषद ही राजकारण विरहित सामाजिक काम गेले अनेक वर्ष करीत आहे. या परिषदेसाठी कॉ. जि.एल. पाटील, ग. ल. पाटील, वाजेकर शेठ, सोनूभाऊ बसवंत, अॅड. दत्ता पाटील, प्रभाकर पाटील, व दि.बा.पाटील यांनी फार मोठे योगदान दिले आहे. दि.बा. पाटील यांनी १९८८ ते २०१३ पर्यंत या परिषदेचे समर्थ नेतृत्व केले आहे. त्यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याची मागणी केली जात आहे. यासाठी अखिल आगरी समाज परिषदेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, पूणे आदि जिल्हयातील प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्रांची सर्व पक्षीय लढा दिला. त्यामुळे या लढयाची दखल घेवून, राज्यसरकारने या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजुर केला व तो पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. लवकरच या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव जाहीर करण्यात येईल. असे आश्वासन केंद्रीय नागरी हवाई वाहतुक मंत्री नायडू यांनी सर्व पक्षीय कृती समितीला दिले आहे. असे असतांना महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत अदानी विमानतळाशी चर्चा केली असल्याचे सांगितले. हे ही त्यांचे वक्तव्य चुकीचे व दि.बा. पाटील यांच्या नावाला विरोध करणारे असल्याची समज आगरी समाजात पसरली आहे. बालदी यांच्या या वक्तव्यामुळे भूमीपुत्रांच्या अस्मितेला धक्का पोहोचला आहे.

या दोन्ही वक्तव्यासंबंधी महेश बालदी यांनी जाहीर माफी मागावी असे अखिल आगरी समाज परिषदेने त्यांना सुचविले आहे.

# ठाण्यात दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ

## गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत प्रदुषणात घट झाल्याचा पालिकेचा दावा

**ठाणे, दि. ४ : प्रतिनिधी**

ठाणे महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी दिवाळीनिमित्ताने फटाक्यांची आतषबाजी करण्यात येत असल्यामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक १९० वर पोहचला आहे तर, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली आहे. यामुळे ठाण्यातील हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याची बाब पुढे आली आहे. दरम्यान, गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत हवा आणि ध्वनी प्रदुषण कमी झाल्याचा तसेच हरित फटाके फोडण्याचे प्रमाण वाढल्याने धुलीकणांचे प्रमाण घटल्याचा दावा पालिकेच्या प्रदुषण नियंत्रण विभागाने केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात दरवर्षी दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ होते. यंदाच्या दिवाळीतही हे चित्र कायम आहे. या काळात फटाके वाजण्याच्या प्रमाणात देखील वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. शहरात दिवाळीपुर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२७ इतका होता. दिवाळी काळात मात्र त्यामध्ये वाढ झाली असून शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १९० एवढा नोंदवण्यात आला आहे. या काळात, आवाजाची पातळी ८४ डेसिबल एवढी सर्वाधिक मोजण्यात आली. दिवाळी पूर्व काळात ती ७१ डेसिबल एवढी होती. मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आणि ज्युनियर केमिस्ट निर्मिती साळगावकर यांच्या पथकाने दिवाळी पुर्व आणि दिवाळी कालावधीत हवेची गुणवत्ता तपासण्याबरोबरच ध्वनीचे मापन केले. त्यामध्ये शहरात दिवाळी काळात हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याचे समोर आले.



गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर फटाके फोडले. हरित फटाक्यांचा वापर वाढला आहे. या वर्षीच्या तपासणीत दिवाळीच्या काळात ध्वनी आणि वायू या दोन्हीत वाढ नोंदवली गेली आहे. मात्र हे प्रमाण गेल्या दोन वर्षपेक्षा कमी आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक १९० पर्यंत वाढला असला तरी ठाण्याची हवा मध्यम प्रदूषित स्तरावर आहे, असा दावा पालिकेने केला आहे. शहरात हवेतील धूलीकणांचे प्रमाण १६५ मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतके आढळले आहे. २०२२ मध्ये धुलीकणांचे प्रमाण २४५ मायक्रोग्राम प्रति घनमीटर तर, २०२३ मध्ये २३० मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतके होते. त्यामुळे गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा धुलीकणांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. हवा गुणवत्ता तपासणीदरम्यान, शहरात हरित फटाके फोडण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले असून यामुळेच शहरात धुलीकण प्रमाणात घट झाल्याचा दावा पालिकेने केला आहे.

ठाणे शहरात २०२२ मध्ये दिवाळी पुर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १३५ तर, दिवाळी काळात १९७ इतका होता. २०२३ मध्ये दिवाळी पुर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक ११५ तर, दिवाळी काळात १८७ इतका होता. तर, २०२४ मध्ये दिवाळी पुर्व काळात हवेचा गुणवत्ता निर्देशांक १२७ तर, दिवाळी काळात १९० इतका नोंदविण्याच आला आहे. तसेच शहरात २०२२ मध्ये दिवाळी पुर्व काळात ध्वनी पातळी ६७ डेसीबल तर, दिवाळी काळात ८९ डेसीबल इतकी होती. २०२३ मध्ये दिवाळी पुर्व काळात ध्वनी पातळी ६८ डेसीबल तर, दिवाळी काळात ७० डेसीबल इतकी होती. तर, २०२४ मध्ये दिवाळी पुर्व काळात ध्वनी पातळी ७१ डेसीबल तर, दिवाळी काळात ८४ डेसीबल इतकी आहे.

# अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

मुंबई - नाशिक रोडने भरधाव वेगाने भिवंडीच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीस्वाराची गाडी घसरल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नारपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बॉम्बे धाब्याच्या समोर बुधवारी घडली आहे.याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.समीर खान (२० रा. नारपोली ) असे अपघातात मयत पावलेल्याचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३० ऑक्टोबर रोजी मयत समीर हा दुचाकी क्र. एम.एच.०५ एफ.एस. ५७५५ ने मुंबई - नाशिक रोडने भिवंडीच्या दिशेला वेगात जात असताना तो बॉम्बे धाब्याच्या समोर आला असता समीरची दुचाकी अचानकपणे घसरल्याने दुचाकीचा अपघात झाल्याने समीरच्या डोक्यातून अतिरिक्त स्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे.पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदनाकरिता येथील शासकीय रुग्णालयात पाठवला असून याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.पुढील तपास पोउनि नवनाथ पांढरे करीत आहेत.

# काळमांडवीत दोघे बुडाले

**जव्हार, दि. ४ : प्रतिनिधी**

जव्हार तालुक्यातील केळीचापाडा येथील काळमांडवी धबधब्यात बोईसर हून आलेले पाच तरुणांनपैकी दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी दुपारी घडली. बोईसर येथील फायनान्स क्षेत्रातील पाच तरुण दिवाळीची सुट्टी म्हणून मौज मस्तीसाठी काळमांडवी येथे आले होते यातील अखिलेश मिश्रा वय 27 व खुर्शीद अहमद नाईक वय 31 हे दोन तरुण पोहण्यासाठी पाण्यात उतरले, दोघेही पोहत असताना एकाने दुसऱ्यावर उडी मारली यात दोघे तरुण खाली गेले, मात्र ते वर आलेच नाही. स्थानिकांच्या मदतीने या दोन्ही तरुणांचे मृतदेह काढण्यात स्थानिकांना यश आले असून, आकस्मिक मृत्यूची नोंद जव्हार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# वावंजे ग्रामपंचायत सरपंच डी. बी. म्हात्रे यांची आगळी वेगळी दिवाळी

**पनवेल, दि. ४ : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यामधील शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असलेल्या वावंजे ग्रामपंचायतीचे सन्माननीय सरपंच डी.बी. म्हात्रे यांनी आपल्या ग्रामपंचायती मधील बांधवांची दिवाळी सुखाची आणि समाधानाची जावी यासाठी ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक नागरिकांना मिठाई, उठणे, आणि सुगंधी मोती साबणाचे वाटप करून परिसरातील नागरिकांचे मने जिंकले आहेत. वावंजे ग्रामपंचायतीचे सरपंच डी. बी. म्हात्रे हे 2019 साली ग्रामपंचायतीचे सरपंच झाल्यापासून आपल्या ग्रामपंचायतीचा विकास कसा होईल यासाठी वेळोवेळी प्रयत्न करत असतात. तसेच ग्रामपंचायती मधील नागरिकांचे जे प्रश्न आहेत त्या प्रश्नाकडे जातीने लक्ष टाकून ते सोडवत आहेत. गावातील गोरगरीब नागरिकांना ते नेहमीच अडीअडचणीच्या काळात मदत करत असतात मात्र या गोष्टीचा ते कुठेही गवगवा करत नाहीत. हे सर्व करत असताना त्यांना कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य मच्छिंद्रनाथ पाटील आदींचे मार्गदर्शन आणि सहकार्य नेहमीच त्यांच्या पाठीशी असते. तसेच वावंजे ग्रामपंचायत मधील शेतकरी कामगार पक्षाचे तरुण कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून त्यांच्या या कार्याला साथ देत आहेत.

# दिवाळीनिमित्त दिव्यांगांना फराळाचे साहित्य वाटप

**सफाळे, दि. ४ : प्रतिनिधी**

दिव्यांगांनी दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वावलंबी बनण्यासाठी छोट्या मोठ्या व्यवसायाकडे वळणे आवश्यक असून स्वावलंबनातून प्रगतीकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन वंदे मातरम अंध अपंग सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विनोद राऊत यांनी केले.




वंदे मातरम् अंध अपंग सेवा भावी संस्थेच्या दिव्यांगांचा स्नेह मेळावा पालघर येथील म.नी. दांडेकर विठ्ठल रखुमाई मंदिर सभागृहात गुरुवारी (ता. ३१) मोठ्या उत्साहाने पार पडला. या मेळाव्याच्या अध्यक्षपदी विनोद राऊत होते. राऊत यांनी सांगितले की, आज वंदे मातरम संस्थेकडे सातशे पेक्षा अधिक दिव्यांगांची नोंदणी असून संस्थेच्या वतीने दिव्यांगांसाठी अनेक उपक्रम आयोजित केले जात आहेत. येत्या डिसेंबर महिन्यात दिव्यांगांचा सामुदायिक विवाह सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी इच्छुकांनी नोंदणी करावी असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लायन्स क्लब ऑफ सफाळेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, रोटरी क्लब ऑफ पालघरचे अध्यक्ष अरुण पाटील, विधाता ग्राफिक्स चे मालक सुरेश सावला, पालघर येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. राजेंद्र चव्हाण, लायन्स क्लबचे सॅटेलाइट कॉर्डिनेटर अतुल दांडेकर, सफाळे लायन्स क्लबचे सेक्रेटरी सचिन वर्तक, खजिनदार जतिन कदम, वंदे मातरम अंध अपंग सेवाभावी संस्थेच्या सचिव नीता तामोरे, तसेच लायन्स क्लब ऑफ सफाळे व रोटरी क्लब ऑफ पालघर चे पदाधिकारी आणि सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या तेरा वर्षांपासून जिल्हयातील अंध अपंग लोकांसाठी वंदे मातरम अंध अपंग सेवा भावी संस्थेच्या माध्यमातून गोड दिवाळी स्नेह मेळावा आयोजित केला जातो. या मेळाव्यात दिव्यांगांना दिवाळी सणासाठी लागणाऱ्या विविध फराळाच्या साहित्याबरोबरच सामुदायिक भोजनाचा कार्यक्रम होतो. या कार्यक्रमासाठी पालघर जिल्ह्यातील वसई,पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड, वाडा आदी तालुक्यातील दिव्यांग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्याचे सूत्रसंचालन योगेश पालेकर यांनी केले. या मेळाव्यासाठी विरार येथील एन एस एस च्या स्वयंसेवकांनी विशेष सहकार्य केले.

# पत्रकारांनी चांगले काम करून समाजात आदर्श निर्माण केला आहे-प्रीतम म्हात्रे

**पनवेल, दि. ४ : प्रतिनिधी**

सतत २४ तास निस्वार्थीपणे काम करणारा पत्रकार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. पनवेल उरण आणि नवी मुंबई मधील पत्रकार चांगले काम करीत आहेत. पत्रकारांनी चांगले काम करून समाजात चांगला आदर्श निर्माण केला आहे त्यामुळे पत्रकारांप्रती आदर प्रेम बाळगत एक कुटुंब म्हणून म्हात्रे कुटुंबातर्फे दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी दिली. शनिवार दिनांक २ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता रंजना बंगला, श्री जे. एम. म्हात्रे साहेब यांचे निवास स्थान, कोपर गाव, सेक्टर ८, उलवे येथे पत्रकारांसाठी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रितम म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याचवेळी पत्रकार आप्पासाहेब मगर यांच्या जनसभा या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक जे. एम. म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायणशेठ घरत यांनीही पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले आणी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पत्रकारांचे प्रतिनिधी म्हणून जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील, जेष्ठ पत्रकार मंदार दोंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत एका चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगत जे. एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांचे मनःपूर्वक आभार मानले. या प्रसंगी सर्वच पत्रकारांनी जे. एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे व त्यांच्या कुटुंबियांना दिवाळी तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या दिवाळी फराळ कार्यक्रमात पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते. दिवाळी फराळ कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

# उल्हासनगर येथील मतदार आमदार कुमार आयलानी यांना नाकारणार

**उल्हासनगर, दि. ४ : प्रतिनिधी**

उल्हासनगर विधानसभेचे आमदार कुमार आयलानी हे एक निष्क्रिय आमदार असुन त्यांच्या कार्यकाळात शहरात कोणते ही विकासाचे कामे झाली नाहीत. के बी रोड ची दुरुस्ती अद्याप झाली नाही. या रोडच्या मध्ये काही दुकाने अद्याप ही तशीच आहेत. आयलानी यांनी या रोड च्या कामासाठी कोणता ही निधी दिली नाही . तर शहरातील एक ही रोड चांगला बनवला नाही. दरम्यान भाजपाचे शहर अध्यक्ष प्रदिप रामचंदानी यांनी जे गद्दार असतात ते मुख्यमंत्री होतात असे वक्त्यव्य केल्याने शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी आक्रमक झाले असुन कुमार आयलानी यांनी माफी मांगावी अन्यथा आयलानी यांचे काम करणार नाही असे शिंदे गटाने जाहीर केले असल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या असुन यावेळी उल्हासनगर ( १४१) विधानसभेच्या निवडणुकीत कुमार आयलानी यांना येथील मतदार नाकारणार आहेत. उल्हासनगर विधानसभेच्या (१४१) निवडणुकीत चौरंगी लढत होणार आहे . भाजपा कडुन निष्क्रिय आमदार कुमार आयलानी , राष्ट्रवादी कॉंग्रेस कडुन ( एस पी ) ओमी कलानी , भाजपातुन आलेले व आता वंचित बहुजन आघाडी कडुन उभे असलेले संजय गुप्ता तर मनसे कडुन आर पी आय मधुन हकालपट्टी झालेले भगवान भालेराव यांच्यात लढत होणार आहे. दरम्यान विद्यमान आमदार कुमार आयलानी यांचा पाच वर्षाचा कार्यकाळ असाच गेला असुन त्यांना कोणते ही ज्ञान नसल्याने दैनिक पेपरला ते पत्रा बोलतात. त्यांचे आमदारकीच्या कालावधीत अनेक जोग्स तयार झाले आहेत. तर शहर विकासा साठी कोणते ही भरीव काम केले नसल्याने यावेळी हे आमदार घरी बसणार आहेत. शहर लहान असताना सुध्दा त्यांना शहराचा विकास करता आला नाही . कोणता ही एखादा मोठा प्रकल्प त्यांना शहरात आणता आला नाही. दरम्यान पुन्हा आयलानी विधानसभेत जाण्यासाठी गुडघ्याला बांशिंग बांधुन बसले आहेत. मात्र येथील मतदार सुज्ञ असुन यावेळी ते कुमार आयलानी यांना नाकारणार आहेत.

# उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात भरारी पथकामार्फत 17 लाखांची रोकड जप्त

**उल्हासनगर, दि. ४ : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १४१ उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीची आदर्श आचारसंहिता पालन करण्यासाठी विविध पथके कार्यरत असून, त्याअंतर्गत कार्यरत भरारी पथक क्र. ६ ने दि.३१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री सुमारे २ वाजता मोठी कारवाई केली. कल्याणकडून मुरबाडकडे वाहन क्र. एम एच ०४ डी झेड ९९११ हे जात असताना संशयास्पद वाटल्याने या वाहनाची तपासणी केली.दरम्यान त्यावेळी त्या वाहनात रु.१७ लाख रोख रक्कम असल्याचे निदर्शनास आले. या संबंधित वाहनचालकाची विचारणा केली असता, त्यांनी कोणताही ठोस पुरावा दिला नाही. त्यामुळे ही रक्कम जप्त करून ती कोषागरात भरणा करण्यात आली आहे . व या बाबत आयकर विभागाला कळविले असून या प्रकरणी सखोल तपासणी सुरु आहे, अशी माहिती १४१ उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री.विजयानंद शर्मा आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती कल्याणी कदम यांनी दिली आहे.

# उल्हासनगर विधानसभेच्या निवडणुकीत महायुती बॅकफुटवर

**उल्हासनगर, दि. ४ : प्रतिनिधी**

उल्हासनगर विधानसभेच्या निवडणुकीला आता रंगत येणार आहे. महायुतीचे उमेदवार कुमार आयलानी हे असुन त्यांच्या कोणत्या ही न केलेल्या विकासामुळे येथील नागरिक नाराज आहेत. काल एका कार्यक्रमात भाजपाच्या जिल्हा अध्यक्षाने मुख्यमंत्र्यावर केलेल्या टिकेचा परिणाम या निवडणुकीत दिसुन येणार आहे. त्यामुळे महायुती बॅकफुटवर आली आहे. उल्हासनगर विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराला सुरवात झाली आहे. काल साई पक्षाने भाजपाला समर्थन दिले असुन या बैठकीत भाजपाचा जिल्हा अध्यक्ष प्रदिप रामचंदानी यांनी जे गद्दारी करतात ते मुख्यमंत्री होतात असे वादग्रस्त वक्त्यव्य केले. त्यामुळे येथील शिंदे गटाचे शिवसैनिक चिडले असुन आज टाऊन हॉल मध्ये झालेल्या मेळाव्यात शिवसैनिकानी राडा केला आहे. हा राडा रविंद्र चव्हाण यांच्या समोरच झाला असल्याने कुमार आयलानी यांची सीट धोक्यात आहे.उल्हासनगर विधान सभा क्षेत्रात आमदार कुमार आयलानी हे अकार्यक्षम ठरले आहेत. आता शहराला एका चांगल्या आमदाराची गरज आहे. मात्र जे ही उमेदवार आहेत ते शहराला चांगले प्रतिनिधीत्व देवु शकत नाहीत.

# क्षुल्लक वादातून रिक्षा चालकास भोसकले

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

रिक्षा चालक त्याच्या सासुरवाडीतून पत्नी व मुलांना भेटून घरी जात असताना त्याने घराजवळील ओळखीच्या तरुणांना तुम्ही गांजा ओढत आहात असे विचारल्याने या रागातून तिघांनी आपसात संगनमताने रिक्षा चालकास बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना धुंगटनगर मधून समोर आली आहे. याप्रकरणी तिघांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून एकास अटक करण्यात आली आहे. सुलतान उर्फ सोनू अफाकउल्ला अन्सारी (२८), शाबीर उर्फ फलटा, शाहीद इस्माईल शेख अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून यातील सुलतानाला अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सात वाजेच्या सुमारास रिक्षा चालक दिलशाद नईम अन्सारी हे त्यांची पत्नी व मुले सासुरवाडीत असल्याने त्यांना भेटून घरी येत असताना त्याच्या ओळखीतील वरील तीन आरोपी काहीतरी नशा करीत असल्याचे दीलशाद यास निदर्शनास आल्याने त्याने तिघांना गांजा ओढत आहेत का ? असे विचारल्याच्या रागातून तिघांनी आपसात संगनमत करून दीलशाद यास बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले आहे.याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून सुलतानला अटक केली आहे . पुढील तपास सपोनि झोले करीत आहेत.

# दिवाळीत मध्यरात्री पहाटेपर्यंत नवी मुंबईत केलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेची नागरिकांकडून प्रशंसा

**नवी मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

दिवाळी सणात नागरिक विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असल्याने बाजारपेठा व दुकाने गजबजून गेलेली असतात, त्यामुळे कच-याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. या अनुषंगाने स्वच्छ, पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करण्याचे दिवाळीपूर्वीच आवाहन करणाऱ्या महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीच्या मध्यरात्री पहाटेपर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विशेष स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच नवी मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. मिलींद भारंबे यांच्याकडूनही या मोहिमेची विशेष दखल घेत प्रशंसा करण्यात आली आहे.

दिवाळीच्या दिवसात मोठया प्रमाणात फटाकेही वाजविले जात असल्याने रस्त्यावरील कच-यात नेहमीपेक्षा अधिक भर पडल्याचे निदर्शनास येते. यादृष्टीने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाके वाजविण्याचे प्रमाण जास्त असल्याने नमुंमपा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, लक्ष्मीपूजनाच्या रात्री नवी मुंबई महानगरपालिका परिसरात बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार तसेच व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ 1 उपायुक्त डॉ.अजय गडदे व परिमंडळ 2 उपायुक्त श्री.संतोष वारुळे यांच्या नियंत्रणाखाली, 1 नोव्हेंबर रोजी रात्री 11 पासून 2 नोव्हेंबर रोजी पहाटे 4 वाजेपर्यंत स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली.



या विशेष स्वच्छता मोहीमेकरिता आठही विभाग कार्यालय क्षेत्रात 400 हून अधिक सफाईमित्रांची व पर्यवेक्षकांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. 12 रिफ्युज कॉम्पॅक्टर वहाने आणि 15 मिनी टिपर वहाने यांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीमेत गोळा करण्यात आलेला प्रामुख्याने फटाक्यांच्या कच-यासह इतर कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी त्वरित वाहून नेण्याच्या नियोजनाची पद्धतशीर अंमलबजावणी करण्यात आली.

नवी मुंबई शहरात आठही विभागांमधील मुख्य रस्ते, मुख्य चौक, वर्दळीची ठिकाणे, बाजारपेठा अशा नागरिकांची गजबज असलेल्या स्थळांवर तसेच फटाके वाजवतात अशा मोकळ्या ठिकाणी रात्री 11 ते पहाटे 4 या कालावधीत राबविलेल्या या विशेष साफसफाई मोहीमेमध्ये हार, फुले. खादयपदार्थ यांचा 10 टन 500 किलो ओला कचरा तसेच विशेषत्वाने फटाके,कागद, पुठ्ठे, कापड यांचा 20 टन 600 किलो सुका कचरा गोळा करून एकुण 31 टन 100 किलो कचरा स्वतंत्र वाहनांमध्ये तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतच्या कालावधीत सकाळी दिवस उजाडण्याच्या आत ही विशेष साफसफाई मोहीम राबविल्याने सकाळी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांनी स्वच्छ रस्ते, चौक व जागा पाहून महानगरपालिकेच्या 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' या संदेशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली. पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे यांनीही महानगरपालिकेच्या या विशेष दिवाळी स्वच्छता मोहिमेची दखल घेतली. मध्यरात्री व पहाटेपर्यंत ही विशेष स्वच्छता मोहीम नियोजनबद्ध रितीने राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होत असलेली साफसफाई नेहमीप्रमाणेच सुरु असल्याने नागरिकांनी कौतुक करीत समाधान व्यक्त केले.

# अमरावती रेल्वे स्थानकाचा मध्य रेल्वेच्या सुंदर स्थानकांत समावेश

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :

मध्य रेल्वेच्या सुंदर रेल्वे स्थानकामध्ये अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकाचा समावेश असून या स्थानकाचे सौंदर्य आणखी वाढावे यासाठी अमृत दोन योजनेंतर्गत मध्य रेल्वे आणखी सुमारे २७ कोटी रु. खर्च करणार आहे. बाहेरून हे रेल्वे स्थानक एखाद्या महालाची प्रतिकृती वाटते. त्याचप्रमाणे प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी भुयारी मार्ग असलेले हे देशातील मोजक्या रेल्वे स्थानकांपैकी एक आहे.

विशेष बाब अशी की, कार्यालयीन कामासाठी या रेल्वे स्थानकावर पूर्णतः सौर ऊर्जेचा वापर केला जात आहे. दोन्ही द्वारांमध्ये तिकीट काऊंटर, चार प्लॅटफॉर्म या स्थानकावर आहेत. अमरावती रेल्वे स्टेशन हे हावडा-नागपूर-मुंबई मार्गावरील बडनेरा रेल्वे स्थानकाशी जोडलेले आहे. हे टर्मिनल स्टेशन आहे. मुंबई, पुणे, तिरुपती, जबलपूर, सुरत, नागपूरसाठी गाडी अमरावतीहून निघते. हे अमरावती शहरातील तीन रेल्वे स्थानकांपैकी मुख्य स्थानक आहे. राज्य व देशातील काही महानगरांसोबत जोडलेले असल्यामुळेच अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकावर विविध आधुनिक सुविधा देण्याचा मध्य रेल्वेद्वारे प्रयत्न सुरू आहे. प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी लिफ्टची सुविधा देण्यात आली असून लवकरच एस्केलेटरही येथे बसवले जाणार आहे. देशातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबई ते ठाणे असा प्रवास करत होती. मे १८५४ पर्यंत, ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेची बॉम्बे-ठाणे लाईन कल्याणपर्यंत वाढवण्यात आली.

भुसावळ रेल्वे स्थानक १८६० मध्ये स्थापन करण्यात आले आणि १८६७ मध्ये जीआयपीआर शाखा



नागपूरपर्यंत वाढवण्यात आली. १३८ किलोमीटर (८६ मैल)-लांब ५ फूट ६ इंच ब्रॉडगेज बडनेरा-नरखेड मार्ग २०१२ मध्ये पूर्ण झाला. नवी अमरावती अकोली रेल्वे स्टेशन याच ट्रॅकवर आहे. १९९३-९४ मध्ये अमरावती परिसरातील रेल्वेचे विद्युतीकरण करण्यात आले. २ किमी लांबीची अमरावती कॉर्ड लाइनचे २०११-१२ मध्ये विद्युतीकरण करण्यात आले.

अमरावती रेल्वे स्थानकावरील सुविधांमध्ये संगणकीकृत आरक्षण कार्यालय आणि प्रतिक्षालय आहे. अमरावती मॉडेल रेल्वे स्थानक. अमरावतीहून इतर शहरांसाठी सुटणाऱ्या रेल्वे गाड्या पुणे-अमरावती एसी सुपरफास्ट एक्स्प्रेस, अमरावती-पुणे दैनंदिन एक्सप्रेस, मुंबई सीएसएमटी-अमरावती, अंबा सुपरफास्ट एक्सप्रेस, तिरुपती-अमरावती एक्सप्रेस, सुरत-अमरावती एक्सप्रेस, अमरावती-अजनी इंटरसिटी एक्सप्रेस, अमरावती-जबलपूर सुपरफास्ट एक्सप्रेससह बडनेरा -अमरावती शटल, अमरावती- वर्धा पॅसेंजर, नागपूर -अमरावती पॅसेंजर या स्थानकावरून सुटते.

## फराळ, फटाक्यांचे वाटप करून वंचितांची केली दिवाळी साजरी



■ महासागर प्रतिनिधी
मेहकर, दि. ४ :

येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वंचितांना फराळ, मिठाई व फटाके वितरित करून दिवाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव मानवतकर होते.

व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष सिद्धेश्वर पवार, नगर पालिकेचे माजी उपाध्यक्ष जयचंद बाठीया, प्रदीप जोशी, प्रवीण गायकवाड, संतोष मलोसे, गजानन देशमुख, प्रा. जुगराज पठ्ठे, ज्ञानेश्वर इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते. शहरासह परिसरात भटकंती महिला, पुरुष व मुलांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते फराळाचे पाकिट, गोड पदार्थांसह फटाके वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष रफिक कुरेशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण गायकवाड यांनी केले. इरफान शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर पालावरील अनाथ मुलीचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

## ५ लाख ७६ हजार रुपयांच्या गांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. ४ :

पुसदच्या ग्रामीण पोलिसांची महागाव तालुक्यातील घोंसरा शेत शिवारात ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास गांजाची शेती करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाई ५ लाख ७६ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. रात्री उशिरापर्यंत पोलिस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

बनसिंग किसन राठोड, वय ३३ वर्ष असे कारवाई झालेल्या युवकाचे नाव आहे. ग्रामीण पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, घोंसरा येथील शेत शिवारात कापूस व तुरीच्या पिकामध्ये मोठ्या प्रमाणात गांजाची शेती होत असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांच्या मार्गदर्शनात एपीआय राऊत, रवी गावंडे, कैलास ससाणे, शेख मसूद, अशोक जाधव, पोलिस हवालदार रवी गावंडे, धम्मानंद केवटे, सुनील माथणे, रणजीत रबडे, पोलिस शिपाई महेश बाबर योगेश आळणे यांनी धाड टाकून कारवाई केली आहे. धाडीमध्ये एकूण ५ लाख ७६ हजार रुपयांचा ३० किलो गांजा जप्त केला आहे.

## बहिणी-भावांनी साकारली शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती



■ महासागर प्रतिनिधी
नांदुरा, दि. ४ :

सध्या शाळांना दिवाळी सणाच्या सुट्या लागल्या आहेत. या सुट्यांचा आनंद घेत येथील देशमुख कुटुंबातील अर्णव, आरूही, अद्वीक व त्यांच्या सवंगडयांनी सुट्यांचा सदुपयोग करत महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि जगभरातील अनेकांचे स्फूर्ती स्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म ज्या किल्ल्यावर झाला तो ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेला शिवनेरी किल्ला साकारला आहे.

शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती बनवणे हे केवळ कलेचे प्रतीक नाही तर ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपण्याचा सुद्धा या बाल मावळ्यांचा प्रयत्न आहे. अर्णव देशमुख, आरूही देशमुख, अद्विक देशमुख व त्यांचे मित्र दरवर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये किंवा शिवजयंतीला किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारतात. या वर्षी सुद्धा त्यांनी शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती बनवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. त्यांनी दगड, विटा, माती, कापड, कागद, नैसर्गिक रंग, कामठी यांचा वापर करून सुरेख असा किल्ला साकारला आहे. किल्ल्यावर महादरवाजा, पीर दरवाजा, परवानगीचा दरवाजा, हत्ती दरवाजा, शिपाई दरवाजा, शिवाई देवीचे मंदिर, लेण्या, बदामी तलाव, गंगा व यमुना टाकं, अंबारखाना, धान्याचे कोठार, कोळी चौथरा, पाण्याच्या टाक्या, यांसह शिवरायांचा जन्म ज्या वास्तूत झाला ती शिवजन्म स्थळाची वास्तू साकारण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. कुटुंबीयांच्या मार्गदर्शनात आणि इंटर नेट व पुस्तकांमधून मिळालेल्या माहितीच्या आधारे या बाल मावळ्यांनी उत्कृष्ट असा किल्ला साकारल्यामुळे परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

## थंडीची चाहूल; उबदार कपड्यांचे मार्केट गरम

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ४ :

दिवाळी सण संपतानाच हळूहळू थंडी वाढत आहे. त्यामुळे बाजारात स्वेटर, शाल, कानटोपी या उबदार कपड्यांच्या खरेदीसाठी बाजारात हळूहळू गर्दी वाढताना दिसत आहे.



दरवर्षीप्रमाणे यंदाही थंडीपासून संरक्षण करणारे तिबेटियन स्वेटर उपलब्ध झाले आहेत. गुलाबी, आकाशी, लाल असे विविध रंगांतील स्वेटर आकर्षक डिझाइनमध्ये पाचशे ते एक, दोन हजार रुपयांपर्यंत विकले जात आहेत. यापेक्षाही जास्त किंमतीत असलेले फॅन्सी जॅकेट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. स्वेटर्स सोबत लोकरीचे मऊ असे स्टोल्स, जॅकेट, कानपट्टी, टोपी यांनाही सध्या मोठी मागणी आहे. फॅन्सी आणि स्टायलिश स्वेटर खरेदी करण्याकडे तरुणांचा कल आहे, तर महिलावर्ग मात्र जिन्स आणि पंजाबी सुटवर वेगवेगळ्या स्टाइलचे स्वेटर खरेदी करत आहेत. शहरात ३५ पेक्षा जास्त स्वेटर्स विक्रेते आहेत.

लहान मुलांचे स्वेटर २५० ते ८००, ९०० प्रिंट स्वेटर ३५० ते ६५० स्वेट शर्ट ४०० ते १००० फर आणि फोमचे जॅकेट ६०० ते २००० शॉल ३०० ते २००० साधे स्वेटर २५० ते ५००/ ७०० फॅन्सी स्वेटर ६०० ते २००० मफलर २०० ते ५०० कार्डिगन ५०० ते २००० टू इन वन जॅकेट ५०० ते १५०० रुपये

## नॅचरल शुगरचे ८ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित

■ महासागर प्रतिनिधी
महागाव, दि. ४ :

तालुक्यातील गुंज येथील नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. युनिट नं. २ च्या विस्तारीत नवव्या गळीत हंगामाचा शुभारंभ नुकताच पार पडला. या वेळी मागील गळीत हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी वाहतूक करणारे कंत्राटदार स्वनील पंजाबराव कदम व त्यांच्या पत्नी संध्या स्वनील कदम यांच्या हस्ते बॉयलरअग्नि प्रदिपन करण्यात आले.

कृषीरत्न भैरवनाथ ठोंबरे, चेअरमन व कार्यकारी संचालक नॅचरल उद्योग समुह यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच कृषिभूषण पांडुरंग आवाड, संचालक, संभाजीराव रेड्डी, संचालक यांच्या उपस्थितीत धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर हा शुभारंभ सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला परिसरातील गणमान्य अतिथी, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी हजेरी लावली. यावर्षी शेतकऱ्यांनी कारखान्याकडे एकूण १० हजार ४०० हेक्टरच्या ऊस नोंदी केल्या आहेत. एकूण आठ लाख




मे.टन गाळपाचे टार्गेट निश्चित बॉयलरच्या शुभारंभ कार्यक्रमात मशिनरी पुरवठादार, सिव्हील कॉन्ट्रेक्टर यांचा वेळेत काम केल्याबद्दल ठोंबरेंच्या हस्ते सत्कार कराण्यात आला.

प्रास्ताविक संचालक कृषीभूषण पांडुरंग आवाड व आभार प्रदर्शन संभाजीराव रेड्डी यांनी केले. या प्रसंगी चितांगराव कदम, सविता कदम, ख. वी. संघाचे अध्यक्ष विशाल पवार, गोविंदराव देशमुख आदी उपस्थित होते.

दररोज किमान पाच हजार पाचशे मे. टन ऊसाचे गाळप होणार आहे. कारखान्याचा येत्या गळीत हंगामाचा प्रत्यक्ष शुभारंभ शासन धोरणाप्रमाणे १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यंदा कारखान्याची गाळप क्षमता वाढल्यामुळे यापुढे शेतकऱ्यांनी कितीही ऊसाची लागवड केली तरी संपूर्ण ऊसाचे गाळप वेळेत करण्याचा प्रयत्न राहील, असे यानिमित्ताने सांगण्यात आले.

## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा कलाविष्कार फाउंडेशनतर्फे सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
मेहकर, दि. ४ :

येथील कलाविष्कार फाउंडेशनच्या वतीने पाडव्यानिमित्त शनिवार, दि. २ नोव्हेंबर रोजी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या मान्यवरांच्या सत्कार आणि गीत गायन कार्यक्रम पार पडला. वेदिका लॉन येथे आयोजित या कार्यक्रमास न्यायाधीश मनोज बनचरे व सरकारी अभियोक्ता ॲड. राजेश रेखे, पत्रकार वसंतराव पाराशर, डॉ.सुभाष खुरद, डॉ. पवन मंत्री यांची प्रमुख उपस्थिती होती.

कलाविष्कार फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र वानखेडे यांनी प्रास्ताविकात कलाविष्कार फाउंडेशन स्थापनेचा उद्देश आणि फाउंडेशनच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी कवी तथा गझलकार प्रा. सुभाष मगर आणि शरीर सौष्ठव स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विजेते श्याम कामे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कलाविष्कार फाउंडेशनच्या सदस्यांनी गीत गायन केले. सूत्रसंचालन ॲड. संदीप वाघमारे यांनी केले. विवेक बारड यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रदीप शेळके, दीपक सास्ते, किशोर बाजड, विशाल जोशी, धीरज इंगळे, नंदू सावजी, अनिल वऱ्हाड, वैभव सावजी, खोडके, वारकरी यांनी पुढाकार घेतला

## वंदे मातरम, तपोवन, क्रांती नवनिर्मितीकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेशासह वाटप

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :

सार्थक दीपावली या आवाहनाला अनुसरुन शहरातील काही सेवाभावी व स्वयंसेवी संस्थांनी वंचितांना मदत करीत त्यांच्या जीवनाश प्रकाश देण्याचे कार्य केले. दीपोत्सवानिमित्तच्या या उपक्रमात वंदे मातरम्, तपोवन, क्रांती नवनिर्मिती संघटना, यावलीचे तरुण मित्र मंडळ, राष्ट्रमाता इंदिरा गांधी पोळी-भाजी केंद्र आदींनी सहभाग नोंदवला.

वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या तरुणांचा संच असलेल्या वंदे मातरम संस्थेने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मेळघाटातील सहा गावे आणि तांड्यांवरील विद्यार्थ्यांना गणवेशासह शालेय साहित्य आणि दिवाळीचा खाऊ पुरवला. हतरु आणि रायपूर येथे कार्यक्रम



आयोजित करुन त्यांनी या साहित्याचे वितरण केले. यावर्षी आणखी एक संस्था जोडण्याच्या क्रमात प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज यांच्या माधान येथील कस्तुरबा संस्थेद्वारा संचालित शाळेलाही मदत करण्यात आली. दुसरीकडे प्रफुल्ल कुकडे यांच्या नेतृत्वातील क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटनेने दिवाळीचे औचित्य साधून समाजसेवी व्यक्ती आणि बेघरामध्ये संवाद घडवून आणला. बडनेरा येथील निवारा केंद्रात थांबलेल्या व्यक्तींना आवश्यक त्या साहित्यांसह मिष्ठान्न पुरवण्यात आले. यावेळी संयोजक विवेक वाडेकर, सहसंयोजक धर्मेंद्र भांडारकर, संघर्ष संस्थेचे दिगंबर मेश्राम तसेच क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटनचे समन्वयक दिलीप लाडे उपस्थित होते.

यावली (शहीद) येथील राष्ट्रसंत मोक्षधाम अर्थात स्मशानभूमीत आगळीवेगळी दिवाळी साजरी करण्यात आली. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव असलेल्या यावलीतील काही तरुणांनी स्मशानभूमीत सकाळपासूनच साफसफाईला सुरुवात केली होती. दरम्यान सायंकाळी ठीक ६. ३० वाजता लक्ष्मीपूजनाच्या वेळी झेंडूची २५ किलो फुले तसेच ५०० दिव्यांची आरास लावून परिसर सुशोभित करण्यात आला. आकर्षक सजावट, आजूबाजूचा हिरवागार परिसर यामुळे या जागेचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. यासाठी मनोज चौधरी, गंगाधर श्रीखंडे, अक्षय भोपळे, सुनील देशमुख,अरुण तडस, राजेश सरकटे, मनोज आवारे यांनी परिश्रम घेतले.

## प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात दिवाळी सण साजरा

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ४ :

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयांमध्ये दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिवाळी हा सण ब्रह्माकुमारी संस्थानचा स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवाळीला संस्थेला ८९ वर्ष पूर्ण झाली आहेत. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून रणजितसिंग राजपूत, ॲड. अपूर्वा बाफना, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग मनोज मेरत, तालुका तंत्रज्ञान अधिकारी इंगळे, अरुण जैन, सुनील तिजारे, नितीन कानडजे आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची प्रस्तावना सेवा केंद्र संचालिका बीके उर्मिला दीदी यांनी केली. कार्यक्रमाची सुरुवातीला परी उगले हिने दिवाळीवर आधारित स्वागत नृत्य सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाला आलेले अतिथी गण यांनी दीप प्रज्वलन करून दिवाळी सण साजरा केला. कार्यक्रमामध्ये आलेल्या पाहुण्यांचे स्वागत ब्रह्माकुमारी पूनम बहन यांनी एक छोटेसे रोपटे देऊन केले. या कार्यक्रमांमध्ये रणजितसिंग राजपूत व अपूर्वा बाफना यांनी माउंट अबू येथील आपला अनुभव सर्वांसोबत शेअर केला.

## लक्ष्मीपूजनाला कबड्डी मैदानाचे केले पूजन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :

एकिकडे इमारतींच्या जंगलात शहरातील मैदाने नामशेष होत असताना खेळाडूंसाठी काही मैदानं शिल्लक असावीत या भावनेतून लक्ष्मी पूजनाच्या दिवशी एक दिवा मैदान रक्षणासाठी लावण्याचा संकल्प करून कबड्डीवर विशेष प्रेम असलेले क्रीडा शिक्षक व कबड्डी तज्ज्ञ संदीप इंगोले व त्यांच्या सहकाऱ्यांनी कबड्डी मैदानाचे पूजन केले. मैदान स्वच्छ करून त्यावर सडा टाकण्यात आला. त्यानंतर ते रांगोळ्यांसह फुलांच्या पाकळ्यांनी सजवण्यात आले. नंतर त्यावर दीपक लावून त्याचे विधीवत पूजन करण्यात आले. या मैदानावर अनेक खेळाडू घडले. अनेकांची कारकीर्द घडली. त्यामुळे मैदानाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक,



क्रीडा शिक्षकांना विशेष आपुलकी वाटते. या आपुलकीतूनच मैदानाचे पूजन करण्यात आले. मैदान ही आमचे दैवत असून तीच आमची कर्मभूमी आहे. त्यामुळे दिवाळीत जर या दैवताला विसरलो तर दिवाळी खऱ्या अर्थी साजरी केली असे वाटणारच नाही. त्यामुळे आम्ही एकत्र येत दिवाळी मैदानात साजरी केली. त्याचा आनंदच काही और होता. मैदानालाच लक्ष्मी समजूनच आम्ही येथे दिवाळी साजरी केली. त्याचे मनस्वी समाधान मिळाले. मैदानावर नारळ फोडून नैवेद्य, प्रसाद वितरित करण्यात आल्याची माहिती संदीप इंगोले व सहकाऱ्यांद्वारे देण्यात आली.

शहरात बोटावर मोजता येतील इतपत मैदाने शिल्लक आहेत. सायन्सकोर मैदान, नेहरू मैदान, दसरा मैदान, सावता मैदान, बडनेरा, नवसारी अशी काही खेळण्यास उपयुक्त जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मालकीची सार्वजनिक मैदानं असून अन्य मैदानं ही खासगी महाविद्यालये, संस्था, मंडळ व शाळांच्या मालकीची आहेत. मैदानांचे संरक्षण करण्यासाठी क्रीडाप्रेमी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करून सर्वसामान्यांचे लक्ष वेधत असतात.

## माहेश्वरी मंडळातर्फे अन्न कूट उत्सव उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. ४ :

माहेश्वरी मंडळाच्या वतीने पाडव्या निमित्त शनिवार, दि. २ नोव्हेंबर रोजी बुलडाणा अर्बन वेद विद्यालयातील राधाकृष्ण मंदिरात अन्न कूट उत्सव व दीपावली स्नेह मिलन उत्साहात पार पडले.



दिवाळी सणातील गोवर्धन पूजेनिमित्त गिरीराजांसह भगवान श्रीकृष्णाची पूजा करण्यात आली. सर्वप्रथम वेद विद्यालयातील ब्रह्मवृंदाच्या हस्ते नैवेद्य आरती करण्यात आली. जानेफळ येथील रमेशचंद्र गट्टाणी यांचा राष्ट्रपती जल पुरस्कार मिळाल्याबद्दल यावेळी बुलडाणा अर्बनचे संस्थापक राधेश्याम चांडक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना अन्न कूट प्रसाद वितरीत करण्यात आला. यावेळी राजेश देशलहरा, ॲड. जितेंद्र कोठारी, चित्तरंजन राठी, कमलनयन लाहोटी, अनंता देशपांडे, धनंजय देशपांडे, अध्यक्ष महेंद्र झंवर, माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा भारती झंवर आदींची उपस्थिती होती.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ZEENAT ABDUL NAZIR SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ZEENAT FIRDOUS RABBANI MOHD ISHTIAQUE KHAN.**
**ADD :** PLOT NO.30, AHBAB COLONY, BEHIND POLICE LINE TAKLI, NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **VIJAY VISHNUPRASAD AGRAWAL.** NOW MY NEW NAME IS **VIJAYKUMAR VISHNU AGRAWAL.**
**ADD :** TIRUPATI BIDWIKAR CHAWL ROAD, GANESH NAGAR, GONDIA - 441601

MY OLD NAME WAS **NISHAD PARVIN SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **NISHAT NIRSHAD SHEIKH.**
**ADD :** PLOT NO.385, BABULBAN GAROBA MAIDAN NEAR MASJID NAGPUR

MY OLD NAME WAS **VRUSHABH TENILAL BISEN.** NOW MY NEW NAME IS **RUSHABH TENILAL BISEN.**
**ADD :** LAKHEGAV GONDIA 441911

MY OLD NAME WAS **MINAKSHI AJAY TIRPUDE.** NOW MY NEW NAME IS **MEENAKSHI AJAY TIRPUDE.**
**ADD :** HOUSE NO. 691, CIRCLE NO. 15/21, NEAR L.B. THAKUR MIRCHI KANDAP MACHINE, LASHKARIBAG, NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **RUBEENA PARVEEN.** NOW MY NEW NAME IS **RUBINA ASIF KHAN.**
**ADD :** PLOT NO.462 DARSHAN COLONY NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **RAJENDRA KUMBHARE.** NOW MY NEW NAME IS **RAJESH MAROTRAO KUMBHARE.**
**ADD :** HARDE KIRANA STORES, BHUTESHWAR NAGAR, MAHAL, NAGPUR 440002

# पोटभर जेवायचे असेल तर....




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

मुंबई हे एक असे शहर आहे जिथे अनेक जाती धमार्चे अनेक प्रांताचे लोक येऊन एकोप्याने राहायचे. एका मुंबईत संपूर्ण भारताचे दर्शन होत असे. मुंबईवर कुठलेही संकट किंवा आपत्ती आली तर सर्व लोक मिळून एकत्रितपणे त्यावर मात करत असत. मोठमोठ्या आलिशान उत्तुंग इमारती व मोठमोठ्या बंगल्यात राहणारे श्रीमंतातले श्रीमंत लोक तर चाळी व झोपडपट्ट्यात राहणारे गरीबातले गरीब लोक अशी विभिन्न संस्कृती फक्त मुंबईतच पहावयास मिळते. पण आता गरीबांना केली जाणारी मदतही धर्मावर आधारित असेल, तर आपला देश नेमका कुठे चालला याबाबतचा परामर्श करणारा लेख.....

---------------------

जगातील महागातल्या महाग गाड्यातून ते ट्रेनमध्ये लटकत व पायी प्रवास करणारे लोक सुद्धा इथे मुंबईत दिसतात. सेव्हन स्टार हॉटेल पासून अगदी रस्त्यावरच्या चहा टपरीपर्यंत व मोठ्यात मोठ्या मॉल पासून ते छोट्यात छोट्या पान टपरी पर्यंत व्यवसाय करणारे लोक ह्या मुंबईत आहेत. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. मुंबई जरी महाराष्ट्राची राजधानी असली तरी भारतातील कुठल्याही ठिकाणी व कुठल्याही कोपऱ्यात राहणाऱ्या प्रत्येकाला ती कधी परकी वाटली नाही.

एक वेगळ्याच प्रकारे देशातील प्रत्येक नागरिकांसोबत मुंबईचे एक वेगळेच नाते निर्माण झालेले आहे. मुंबईशी प्रत्येकाची एक एक वेगळीच नाळ जोडली गेलेली आहे. पण हळूहळू परिस्थिती बदलत गेली. बाबरी मशीद तोडल्यानंतर मुंबईत मोठी दंगल उसळली व त्यानंतरचे बॉम्ब ब्लास्ट ज्यामुळे हळूहळू लोकात दुरावा निर्माण होत गेला. लोक एकमेकांकडे संशयाने पाहू लागले व त्यानंतरच्या गेल्या दहा वर्षांमध्ये तर एवढी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे की, धर्मांधतेच्या विषाचे बीज आज प्रत्येकाच्या मनात मूळ धरू लागले आहे.

हिंदू- मुस्लिम प्रत्येकाचे सण एकोप्याने साजरे करणारे आता एकमेकांकडे बघायलाही तयार नाहीत. हे सर्व लिहिण्या मागचे कारण नुकतेच परेळ येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल समोर घडलेली एक घटना. टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये अनेक लोक आपापल्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या पेशंट सोबत येत असतात. तिथे बाहेर काही सेवाभावी संस्था ह्या येणाऱ्या लोकांसाठी फुकट जेवणाची व्यवस्था करतात आणि हे अनेक वर्ष चालू आहे.

परंतु नुकतीच एक विचित्र व मुंबईच्या संस्कृतीला न शोभणारी घटना तिथे घडली. तिथे जेवणाचे वाटप करणा?या हिंदू व्यक्तीने पाहिले की, त्या लाईन मध्ये एक मुस्लिम महिला पण उभी आहे. हे पाहिल्यावर त्याने प्रत्येकाला जेवणाचे ताट देण्यापूर्वी 'जय श्रीराम' बोलण्याची सक्ती सुरू केली व सांगितले की तुम्ही "जय श्रीराम" बोलाल तरच तुम्हाला जेवण मिळेल अथवा मिळणार नाही. त्या बाईने "जय श्रीराम" बोलण्यास नकार दिल्यामुळे तिला अक्षरशः त्या लाईनीतून बाहेर काढले गेले. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये व जगातील प्रत्येक धर्मामध्ये अन्नदान हे सर्वात मोठे पुण्य मानले गेले आहे. ते अन्नदान करताना धर्माची अट ठेवणे यासारखे मोठे पाप कुठले नाही. धर्म व त्याबद्दलची आस्था मनातून स्वयंभू असली पाहिजे.

कुठल्याही धर्मातील माणसाने ताकदीच्या जोरावर किंवा त्या व्यक्तीच्या मजबुरीचा फायदा घेत स्वतःच्या धमार्चा जयजयकार दुसऱ्या धमार्तील व्यक्तीकडून करूवून जरी घेतला, तर तो रहीम असो किंवा राम ह्यांना मंजूर होणार आहे का? थोड्यावेळासाठी जबरदस्ती करणाऱ्याला आनंद जरूर मिळू शकतो, पण त्या आनंदाची व्याख्या विकृतीकडे झुकणारी असेल. भारत हा जगातील सर्वात जास्त व सर्वात मोठा लोकशाही असणारा धर्मनिरपेक्ष देश आहे. कदाचित आता होता म्हणावा लागेल. त्यामुळे भारताची शान जगातील प्रत्येक देशापेक्षा जास्त होती.

लोकशाही व धर्मनिरपेक्षता ह्यासाठी संपूर्ण जग भारताचे उदाहरण द्यायचे. पण तो काळ आता हळूहळू काही कट्टरतावाद्यांमुळे मागे पडत चालला आहे. कुठलाही देश जो धर्मावर आधारित असतो, त्याची प्रगती कधीच होत नाही. आपल्या शेजारी असणाऱ्या बांगलादेश व पाकिस्तानचे ज्वलंत उदाहरण आपल्यासमोर आहे.



भारतातील अनेक मुसलमान पाकिस्तानात एवढ्यासाठीच गेले नाहीत, कारण त्यांनी स्वतःला इस्लामिक देश म्हणून घोषित केले होते. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र नेपाळ, त्यांना सुद्धा कालांतराने स्वतःला धर्मनिरपेक्ष देश म्हणून जाहीर करावे लागले. देशाला एका ठराविक धर्माच्या नावाने ओळखले गेल्यामुळे आजच्या जागतिक स्पर्धेमध्ये तो देश मागे पडू शकतो. परदेशी गुंतवणुका थांबू शकतात. पाकिस्तान व बांगलादेश ह्याच कारणामुळे पिछाडीवर राहिले की, त्यांनी स्वतःला इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित केले.

परदेशी गुंतवणूक तिथे अत्यल्प प्रमाणात आल्या. काही बाबतीत आज तर भारताचा नंबर पाकिस्तान व बांगलादेशच्याही खाली आला आहे. भारताच्या विरोधात अमेरिकेने जरी नेहमी पाकिस्तानला साथ दिलेली असली तरी त्यांनी आपल्या गुंतवणूकदारांना कधीही पाकिस्तानमध्ये गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला नाही. अरब देशांमध्ये सुद्धा तेल मिळाल्यामुळे त्यांच्याकडे भरपूर पैसा आहे, पण मोठ-मोठ्या इंडस्ट्रीज, परदेशी गुंतवणूक असे तिथे काहीही आलेले नाही व हे सर्व पाहूनच जगातील जेवढे अरब देश ज्यांना आम्ही इस्लामिक देश म्हणतो, त्यांची पावले सुद्धा आता हळूहळू धर्मनिरपेक्षेकडे वळू लागली आहेत. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे अबुधाबी, दुबई येथे उभारली गेलेली हिंदू मंदिरे. युरोपमधील अनेक देश हे ख्रिश्चन आहेत. त्यांचा राष्ट्रीय धर्म ख्रिश्चन आहे. परंतु त्यांच्या देशात सुद्धा अनेक धर्मातील लोक राहतात व त्यांची आपापल्या धर्मानुसार प्रार्थना मंदिरे सुद्धा तिथे आहेत.

त्यांनी स्वतःला कधीही ख्रिश्चन राष्ट्र म्हणून घोषित केलेले नाही. सिख धर्मात त्यांच्या गुरुद्वारामध्ये अखंडपणे अन्नदान चालू असते. परंतु त्यांनी कधीही कोणाला त्यांच्या ग्रंथसाहेबा समोर डोकं टेकवण्याची, किंवा "वाहेगुरू की जय" असे म्हणण्याची जबरदस्ती केली नाही. मुस्लिम धर्मामध्ये सुद्धा प्रत्येक दर्ग्याजवळ अन्नदानाचा कार्यक्रम चालू असतो. परंतु तिथे सुद्धा कधीही धर्म विचारला जात नाही किंवा "अल्लाहू अकबर" म्हणण्याची जबरदस्ती केली जात नाही. प्रत्येक मोठमोठ्या दर्ग्यांच्या बाहेर काही ठराविक हॉटेल्स आहेत. त्याच्या बाहेर गरीब लोक रांग लावून बसलेले असतात. तुम्ही घरून काही बनवून तिथे नेऊन वाटू शकत नसाल, तर त्यांच्यासाठी ही सोय आहे.

तिथे वेगवेगळ्या डिशेसचे पॅकेज व रेट लिहिलेले असतात. तुम्हाला जेवढ्या लोकांना जेवण द्यावयाचे असेल व जे पॅकेज निवडायचे असेल त्यानुसार काऊंटर पैसे दिल्यानंतर हॉटेलचा वेटर तेवढी माणसे आतमध्ये सोडतो व तुम्ही दिलेल्या पैशाप्रमाणे त्या लोकांना त्या डिशेस वाढल्या जातात. त्या लाईनीत सर्व प्रकारचे व सर्व धर्माचे गरीब लोक असतात, परंतु कोणालाही धर्मानुसार निवडून सोडले जात नाही.

देशात ज्या ज्या वेळेला आपत्ती आली आहे, त्या त्या वेळेला मुसलमानांनी फार मोठ्या प्रमाणामध्ये अन्नदानाचे व अत्यावश्यक जीवनोपयोगी असणाऱ्या सामानाचे वाटप नेहमीच केलेले आहे. उदाहरणार्थ २६ जुलै २००५ रोजी मुंबईमध्ये आलेल्या पुराच्या वेळी, महाडमध्ये ज्या वेळेला पूल कोसळला होता व ज्यामध्ये अनेक गाड्या कोसळल्या होत्या, त्यावेळी मुंबईतून अनेकांचे नातेवाईक आपल्या प्रियजनांचे शव मिळते का त्यासाठी महाडला पोचले होते. त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था ही तेथील मुस्लिम संस्थेने केली होती. काश्मीर मध्ये पूर आला त्यावेळेला सुद्धा कुठलाही धार्मिक भेदभाव न बघता मुस्लिम तरुणांनी प्रत्येकाच्या घरी अन्नधान्याची पाकीटे पोचवली.

तीन वर्षांपूर्वी कोकणात जेव्हा पूर आला होता तेव्हा सुद्धा मुंबईवरून रोज पाच- पाच, दहा-दहा ट्रक भरभरून सामान पोचवले गेले. नुकताच जेव्हा गुजरात मध्ये पूर आला तेव्हा सरकारी मदत पोचण्याआधी तेथे सुद्धा कुठलाही धर्म न पाहता प्रत्येकाकडे मुस्लिम स्वयंसेवकांनी जीवनोपयोगी वस्तू पोहोचवल्या. कोरोना मध्ये ज्या वेळेला पोटची मुलं प्रेत घ्यायला तयार नव्हती, त्यावेळेला काही मुस्लिम युवक पुढे आले व त्यांनी अनेक हिंदू व्यक्तींचे अंत्यविधी केले. लॉकडाऊन मुळे पायी प्रवास करून आपल्या गावी जाणाऱ्या असंख्य लोकांना स्वतःच्या पोटाला चिमटा मारून जेवण पुरवले.

कोरोना काळात दिल्लीत लॉकडाऊन जाहीर होण्यापूर्वी धार्मिक कार्यक्रमासाठी मुस्लिम समाज एकत्र आला होता व नंतर अचानक लॉक डाऊन डिक्लेअर झाल्यामुळे ते तिथेच अडकून राहिले व त्यावरून किती मोठे राजकारण खेळले गेले हे अख्ख्या जगाने बघितले. पण नंतर कोरोना झालेल्या लोकांना ज्या ज्या वेळेला प्लाज्माची अत्यावशकता पडली, त्या त्या वेळेला धर्म न पाहता त्याच मुसलमानांनी पुढे होऊन आपला प्लाज्मा त्या रुग्णांना दिला. नुकतेच एका हायफाय सोसायटीमध्ये एक मुस्लिम शिक्षक सोळाव्या माळ्यावर आपल्या विद्याथ्यार्ला उर्दू शिकवण्यासाठी जात होता, त्याच वेळेला तिथे राहणारी एक व्यक्ती लिफ्टपाशी आली.

मुस्लिम वेशभूषा पाहिल्यावर त्या व्यक्तीने त्याला अनेक प्रश्न विचारले. त्या मुस्लिम व्यक्तीने सांगितले की, मी या बिल्डिंग मधील सोळाव्या मजल्यावर उर्दू शिकवण्यासाठी येतो. तेवढ्यात लिफ्ट खाली आली. लिफ्टमध्ये गेल्यावर तेथील रहिवासी व्यक्तीने त्या व्यक्तीला जबरदस्ती "जय श्रीराम" बोलण्याची सक्ती केली. त्याने नकार दिल्यावर पहिल्या मजल्यावर लिफ्ट थांबल्यावर त्याला लिफ्ट मधून बाहेर फेकले व शिवीगाळ केली. सदर बातमी सर्वत्र पसरल्यानंतर पोलिसांनी त्या बिल्डिंग मधल्या रहिवाशावर थातूरमातूर कारवाई करून त्याला सोडून दिले. अनेक ठिकाणी काही गुंडांची झुंडशाही विकोपाला गेली आहे. एकट्या दुकट्या मुसलमानांना धरून त्यांना "जय श्रीराम" म्हणण्याची जबरदस्ती करतात व त्यांनी नकार दिल्यास त्यांचा जीव घेतला जातो. हा कुठला धर्म आहे?

यूपीमध्ये तर ह्यापेक्षा भयानक घटना घडली. एका हिंदू व्यक्तीची आई आजारपणामुळे सरकारी हॉस्पिटलमध्ये ?डमिट होती. तिला रक्ताची अत्यंत गरज होती. डॉक्टरने तिच्या मुलाला तसे सांगितले, त्याच्या आईचा ब्लड ग्रुप सुद्धा रेअर होता, जो फार कमी लोकांमध्ये असतो. तो कुठल्याही ब्लड बँक मध्ये सुद्धा उपलब्ध नव्हता. त्या मुलाला आठवले की, त्याचा एक मित्र आहे व त्याचा ब्लड ग्रुपपण असाच आहे. म्हणून तो धावत त्याच्याकडे जातो व आपल्या आईला रक्त देण्याची विनंती करतो. तो तयार होतो व आपल्या मित्रासोबत हॉस्पिटलला येतो.

रक्त चाचणी प्रयोगशाळेचा अधिकारी रक्तदानासाठी आलेल्या व्यक्तीचे नाव, वय विचारतो. त्यावेळेला त्या अधिकाऱ्याला समजते की, रक्तदान करण्यास आलेली व्यक्ती ही मुस्लिम आहे. त्यामुळे सदर अधिकारी मुस्लिम व्यक्तीचे रक्त घेण्यास नकार देतो व सांगतो की हिंदूंना फक्त हिंदूचेच रक्त दिले जाईल. याचे रक्त आम्ही घेणार नाही. तो गरीब मुलगा आपल्या आईला वाचवण्यासाठी अनेक विनवण्या करतो. पण काही केल्या तो अधिकारी ऐकत नाही. शेवटी तो मुलगा म्हणतो की, तुम्ही मला हे लिहून द्या तर तेही तो देत नाही.

शेवटी त्याच्या आईला रक्त न मिळाल्यामुळे तिचा मृत्यू होतो. नंतर ही गोष्ट बाहेर फुटल्यावर त्या अधिकाऱ्याची तिथून तात्पुरती बदली केली जाते व थातूर-मातूर चौकशी लावली जाते. पण ज्या मुलाच्या आईचा मृत्यू झाला त्या मुलाला त्याची आई परत मिळेल का?

ज्या सरकारने धर्मांधतेचे विष लोकांच्या मनात पेरले, खत पाणी घालून रुजवले ते सरकार त्या मुलाला त्याची आई परत आणून देईल का? वेळेवर रक्त न मिळाल्यामुळे शेवटी मृत्यू झाला तो एका हिंदू स्त्रीचा. आई विना पोरका झाला तो एक हिंदू मुलगा. आज अनेक गुजराती व जैन सोसायट्यांमध्ये महाराष्ट्रीयन हिंदूंना सुद्धा घरे घेण्यास मज्जाव करण्यात येतो. अशा घटना मुंबईमध्ये घडलेल्या आहेत. अरब देशात अनेक भारतीय कामाला आहेत. त्यात मुस्लिम सुद्धा आहेत व अनेक हिंदू सुद्धा आहेत. भारताचे परदेशी चलन बहुसंख्य प्रमाणात अरब देशातून भारतात येणाऱ्या पैशांवर अवलंबून आहे.

उद्या जर अरब देशांनी प्रत्येकाला जबरदस्तीने इस्लाम कबूल करण्यास सांगितले किंवा "अल्लाहू अकबर" बोलण्यास भाग पाडले व असे न केल्यास काम सोडून परत जाण्यास सांगितले, तर त्याचे किती विपरीत परिणाम देशावर होतील ह्याचा कधी विचार केला आहे का? पंतप्रधान देशात मुसलमानांच्या विरोधात गरळ ओकतात व अरब देशात जाऊन तेथील मुस्लिम राज्यकर्त्यांना मिठ्या मारतात हे यांना चालते का?

नियोजित दौऱ्यावरून येताना अचानक विमान फिरवून नवाज शरीफला त्याच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी विमान वळवून पाकिस्तानात पोहोचतात हे ह्यांना चालते का? बीजेपीचा कुठलाही हिंदुत्ववादाचा अजेंडा नाही. स्वतःच्या फायद्यासाठी सरड्या सारखे रंग बदलणारे हे लोक आहेत. दुर्दैवाने आपल्या देशात साक्षरता व शिक्षणाच्या कमतरतेमुळे अशिक्षित व अडाणी जनता आणि ज्यांना हुल्लडबाजीची अतोनात हौस आहे अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे अनेकांचे फावले आहे. त्यातच त्यांनी काडीचेही धार्मिक ज्ञान नसणारे व निव्वळ देखाव्यासाठी भगवे वस्त्र घातलेले अनेक व्यभिचारी साधू, महंत, बाबा यांना राजाश्रय दिला व वाट्टेल तशी गरळ ओकण्यास मोकाट सोडले.

ह्या जाती व धर्ममध्ये द्वेष पसरवणाऱ्या राजकारण्यांचे खरे रूप बहुसंख्येने असणाऱ्या हिंदूंना समजावून सांगण्याची आता अति आवश्यकता आहे. त्यासाठी विचारवंत व सुशिक्षित हिंदूंनाच संघटित होऊन पुढे यावे लागेल.

मराठीत एक म्हण आहे "विनाशकाले विपरीत बुद्धी" या देशात असणारा बहुसंख्य हिंदू जर वेळीच जागा झाला नाही, तर त्याची स्थिती वरील म्हणी प्रमाणे होण्यास जास्त वेळ लागणार नाही. कारण या हिंदुत्ववादी संघटनांना सुद्धा स्वतःच्या स्वार्थापलीकडे हिंदू धर्माबद्दल जरा सुद्धा प्रेम किंवा आपुलकी नाही हे अनेक वेळेला सिद्ध झाले आहे. खऱ्या मनाने रामाला मानणाऱ्या लोकांमध्ये मायावी रूप घेऊन सामील झालेले हे रावणी दानव आहेत. भारतातील समस्त हिंदू बांधवांनो अजूनही वेळ गेलेली नाही.

वेळीच डोळे उघडा, सजग व्हा. नाहीतर तुम्हीच आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा मारून घ्याल. जर तुम्ही व्यवस्थित अभ्यास केला तर तुम्हाला समजून येईल की, या धर्मांधतेमुळे सर्वात जास्त नुकसान हिंदूंचे झालेले आहे. जिव सुद्धा सर्वात जास्त हिंदूंचे गेलेले आहेत. परंतु मीडिया ही खरी परिस्थिती तुमच्यासमोर कधीच येऊ देणार नाही व चैनल वर येणा?या बातम्यांवरून आपणास असेच चित्र दाखविले जाईल की, फक्त मुसलमानांचेच नुकसान होत आहे. पण हे सत्य नाही. खोलात जाऊन अभ्यास करा. समस्त भारतीयांनो उठा जागे व्हा व अंतर्गत यादवी पासून आपल्या देशाला वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा!

# मराठी नाटक : मनोरंजन आणि प्रबोधन!

**(५ नोव्हेंबर- महाराष्ट्र रंगभूमी दिवस विशेष.)**

दरवर्षी यादिवशीच रंगभूमीची प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या कलावंताला विष्णुदास भावे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. मागील काही काळात रंगभूमीवर पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मनोरंजनपर, रहस्यमय असे वेगवेगळे विषय हाताळले जाता आहेत. १७० वषार्ची ही मराठी नाटकाची परंपरा येत्या काळात आणखीनच वृद्धिंगत होत राहो ही सदिच्छा!

------------------

प्रकाशात उजळलेला भला मोठा रंगमंच.. लाल मखमली पडदा.. म्युझिकचा मंद स्वर, नेपथ्याची लगबग.. तिसरी घंटा.. आणि तुमची परीक्षा घेण्यासाठी समोर बसलेले प्रेक्षक, हे वातावरण डोळ्यासमोर येताच कोणत्याही रंगकर्मीच्या अंगावर काटा आल्यावाचून राहणार नाही. मागील कित्येक वर्षांपासून मनोरंजन आणि प्रबोधन यांची सांगड घालत नाटक संस्कृतीचा वारसा मनोरंजन विश्वात रुजत आहे. या रुजलेल्या बीजाची एक फांदी म्हणजे मराठी नाटक. सन १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाच्या रूपात सुरु झालेला हा प्रवास अलीकडच्या संगीत देवबाभळी, अनन्या, अलबत्त्या गलबत्त्यापर्यंत दिवसागणिक आणखीनच प्रगल्भ होत चालला आहे.

मराठी रंगभूमीच्या सेवेत रुजू असणाऱ्या प्रत्येक रंगकमीर्साठी ५ नोव्हेंबर हा दिवस अतिशय महत्वाचा आहे. या दिवशी मराठी रंगभूमी दिन साजरा केला जातो, हे तर सर्वांना ठाऊक आहेच पण त्यामागील कारण आपण जाणता का?

सन १८४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी ५ नोव्हेंबर १८४३ रोजी सीता स्वयंवर या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाटकांच्या पवार्ला सुरुवात झाली. सन १९४३ साली या दिवसाच्या स्मरणार्थ म्हणून या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा केला. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते.

याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून घोषित करण्यात आला होता.

दरवर्षी यादिवशीच रंगभूमीची प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या कलावंताला विष्णुदास भावे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. ज्याला रंगभूमी माहिती अशा प्रत्येकासाठी जागतिक रंगभूमी दिन महत्त्वाचा आहे. मराठी रंगभूमीला जवळ जवळ १७० हुनही जास्त वर्षांची परंपरा आहे. सन १८४३ ला नाटकाला डोक्यावर घेतलेल्या प्रेक्षकाने आजही त्याचा भार वाजत गाजत मिरवत पुढे आणला आहे.

दरवर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. विष्णूदास भावे यांनी १८४३ साली सीता स्वयंवर हे पहिले नाटक सांगली येथे रंगभूमीवर सादर करून मराठी नाट्यसृष्टीचा पाया घातला. १९४३ साली या घटनेचे स्मरण म्हणून राज्यातील या क्षेत्रातील सर्व नामवंत एकत्र आले आणि सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला.

या निमित्ताने ५ नोव्हेंबर रोजी नाट्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापण्यात आली. चिंतामणराव पटवर्धन यांनी दिलेल्या जागेवर विष्णूदास भावे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या नाट्यमंदिराची कोनशिला बसविण्यात आली. या महत्त्वाच्या क्षणी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस जाहीर केला. मराठी रंगभूमी दिनी सांगलीची अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती सन १९६० सालापासून विष्णूदास भावे यांच्या स्मृत्यर्थ मराठी रंगभूमीवर दीर्घकाळ सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला विष्णूदास भावे गौरवपदक देऊन त्यांचा सन्मान करते. गौरव पदक, ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

मराठी रंगभूमी दिन ५ नोव्हेंबर रोजी का साजरा केला जातो? मागील कित्येक वर्षांपासून मनोरंजन आणि प्रबोधन यांची सांगड घालत नाटक संस्कृतीचा वसा सुरू आहे. या वटवृक्षाचे एक देखणे मुळ म्हणजे मराठी नाटक. सन १८४३ मध्ये सीता स्वयंवरने सुरू झालेला हा प्रवास आजही किमान १७० वषानंतरही सुरूच आहे. सीता स्वयंवर, संगीत शारदा, संगीत सौभद्र, ती फुलराणी, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवा न्यूज आहे, एका लग्नाची तिसरी गोष्ट आणि आणखीन.गेले कित्येक वर्ष नाटक कधी थांबलं नाही कारण प्रेक्षकांनी ते थांबू दिलं नाही; काहीतरी नवं बघायला प्रेक्षक कुचारला पण म्हणून त्याने नाटकाचा हात कधी सोडला नाही. दि.५ नोव्हेंबर हा रंगभूमीवर काम करणा?या प्रत्येकासाठीच फार महत्त्वाचा आहे. १८४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी दि.५ नोव्हेंबर १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाटकांच्या पवार्ला सुरुवात झाली. सन १९४३ साली या दिवसाच्या स्मरणार्थ या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा केला. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते.

याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून घोषित करण्यात आला होता. !! सर्व रंगकर्मींना मराठी रंगभूमी दिनाच्या सप्ताहभर हार्दिक शुभेच्छा !!



एन.कृष्णकुमार
रामनगर, गडचिरोली.
9423714883.

# हॅप्पी बर्थडे किंग कोहली!

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस.

क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता.

आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत.

कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन -चार - वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणा?या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे, अशी अपेक्षा आहे.

-----------------

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५

# स्वादच नाही तर आरोग्यासाठी फायदेशीर स्ट्रॉबेरी



स्ट्रॉबेरीमध्ये व्हिटॅमिन सी, मँगनीज, फोलेट आणि पोटेशियम मुबलक प्रमाणात आहे. तसेच स्ट्रॉबेरीमध्ये एंटीऑक्सिडेंट्ससुद्धा असतात. यामुळे आरोग्य अधिक चांगले राहते. प्रसिद्ध न्यूट्रीशनिस्ट निखिल वत्स यांनी हा फळ सेवन करण्याचे फायदे सांगितले.

स्ट्रॉबेरीमध्ये फायबर, फ्लेव्होनॉइड्स आणि पोटॅशियम सारखे पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. ज्यामुळे हृदयविकाराचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो. यामध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स हृदयासाठीही फायदेशीर मानले जातात.

स्ट्रॉबेरी व्हिटॅमिन सीचा समृद्ध स्रोत आहे. त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास मदत होते. परिणामी व्हायरल इन्फेक्शनशी लढण्यास आणि संपूर्ण आरोग्य सुधारण्यास मदत होते. तुमच्या आहारात रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या पदार्थांचा समावेश करून तुम्ही अनेक आजार टाळू शकता.

स्ट्रॉबेरीमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्ससारखे इतर पोषक घटक आहे. ज्यामुळे डोळ्यांची दृष्टी सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. स्ट्रॉबेरीचे नियमित सेवन केल्याने वय-संबंधित मॅक्युलर डिजनरेशनचा धोका कमी होतो आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते.

स्ट्रॉबेरीमध्ये खूप कमी कॅलरीज आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. तुम्ही एक स्ट्रॉबेरी खाल्ली तरी जास्त वेळ भूक लागणार नाही. वजनावर हळूहळू नियंत्रण मिळवता येईल. हे नियमित खाल्ल्याने तुमची फिटनेसही चांगले राहील.

## अशोकायन

### बंडोबा

बंडोबांना शांत करण्याचे
प्रयत्न ठेवा जारी
यश मिळाले तरच
नौका लागेल पैलतीरी..!

साम दाम दंड भेदपैकी
कोणती मात्रा पडेल लागु
हे हेरुनी प्रयत्न करता
ठेवता येईल त्यांच्यावर काबू

केले नाही शांत बंडोबा
तर ते करतील खेळ खंडोबा
जिंकण्याची क्षमता नसेलही
पण पाय ओढणे सोपं हायबा



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## वाचक लिहितात

### ही मंडळी जबाबदारी घेणार आहेत का?

यावर्षी दिवाळीच्या साधारणतः महिनाभर आधीपासून काही संघटना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करीत असताना काही धर्मांध (?) संघटना मात्र पर्यावरणवाद्यांचे ऐकू नका.. दिवाळीत फटाके फोडायचे नाही तर काय करायचे? असे सांगून माथी भडकवण्याचे कारस्थान करताना दिसून आले.

विविध वृत्तपत्रांमध्ये आणि समाजमाध्यमांवर त्यांचे आवाहन प्रकाशित, प्रसारीत होत असताना, अनेक ठिकाणी जिहाद या शब्दाचा हेतुपुरस्सर वापर केला जात होता. या अशा संघटना व त्यांच्या पदाधिकाऱ्यांना नेमके काय साधायचे आहे? दिवाळीत फटाक्यांमुळे प्रदुषण वाढले, आता विविध आजार जडण्याची प्रकरणे समोर येतील. रस्त्यावर फटाक्याच्या कागदाचे ढीग साचले आहेत. कोण स्वच्छ करणार. पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असताना या अशा संघटना अनेकदा चिथावणी देण्याचे काम करतात. त्यांना आवरणे अत्यावश्यक आहे.

■ विनोद देशकर, नागपूर.

### विकल्या गेलेल्यांपासून सावध असावे...

विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता चित्र स्पष्ट झाले आहे. कमीअधिक संख्येने उमेदवार प्रत्येक मतदारसंघात आहेत? पक्षाने ज्यांच्यावर अन्याय केला असे काही बंडखोर मैदानात आहेत तर काहीजण पैसे घेवून केवळ मतांचे विभाजन करण्यासाठी रिंगणात कायम आहेत. काही लाख रूपये घेवून हे उमेदवार मतदारांची थट्टाच करणार असतील तर आता मतदारांनीही अशा विकाऊ पासून सावध असायला हवे. निवडणुका आता पूर्णतः जात, धर्म, पंथ, मार्ग, समाज या आधारावर लढल्या जात असल्याचे दिसते. ज्यांनी यापूर्वी कधीही निवडणुकीत भाग घेतला नाही, वार्डात निवडून येण्याची कुवत नाही, असेही अनेकजण मैदानात आहेत. मते फोडण्यासाठी विकले जाणारे हे उमेदवार एकतर निवडून येत नाही आणि आलेच तर मतदारसंघाचा विकास करणार की आपले घर भरणार? मतदारांनी जागरूक राहून विचार करावा.

■ शुभम वासनिक, नागपूर.

# बीएफएसआयवर भर देणाऱ्या व्हर्चुअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेड या Sass या कंपनीतर्फे एनएसई ईमर्जमध्ये डीआरएचपी दाखल


■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ०४ :** वर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेड (व्हीजीआयएल किंवा कंपनी), बीएफएसआय क्षेत्राला सेवा देणारी आघाडीची हायब्रिड सास (Sass ) आणि एंटरप्राइझ सॉफ्टवेअर कंपनी आहे. आज कंपनीने एनएसई इमर्जकडे आपले ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केले आहे. कंपनीच्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावामध्ये (पब्लिक ऑफरिंग) ६६,६०,००० इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू असून, प्रत्येक शेअरचे दर्शनी मूल्य रु. १० आहे. स्मार्ट होरायझन कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड हे या ऑफरचे एकमेव बुक रनिंग लीड मॅनेजर असून, माशीटला सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड हे रजिस्ट्रार आहेत. व्हीजीआयएल ही Sass उत्पादन-केंद्रितकंपनी आहे, जी कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सोल्यूशन्स, आयटी सोल्युशन्स, ईआरपी इम्प्लिमेंटेशन आणि कस्टमाइज्ड सॉफ्टवेअर सोल्यूशन्स डेव्हलपमेंटसह आयटी सेवा पुरवते. बीएफएसआय, ईआरपी आणि ई-गव्हर्नन्सक्षेत्रांसाठी ही सेवा पुरवली जाते. कंपनी मुख्यतः सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्सचा विकास, कस्टमायझेशन, इन्स्टॉलेशन आणि इम्प्लिमेंटेशन मध्ये कार्यरत आहे. त्यासोबतच, ती अंमल बजावणी पश्चात सपोर्ट, मॉनिटरिंग, आणि मेनटेनन्स सेवा देखील पुरवते.

डीआरएचपीनुसार, आयपीओमधून मिळणाऱ्या निधीपैकी ३४.२६ कोटी रुपये नागपूरमध्ये अतिरिक्त विकास सुविधा उभारण्यासाठी कार्यकारी भांडवल खर्चासाठी वापरण्याचा व्हीजीआयएलचा मानस आहे. कंपनीने घेतलेल्या काही कर्जाच्या परतफेडीसाठी/पूर्व-परतफेडीसाठी ३ कोटी रुपये वापरण्यात येणार आहेत. डेटा सेंटरमध्ये जीपीयू, सर्व्हर आणि स्टोरेज सिस्टम खरेदीसाठी ५.०५ कोटी रुपये वापरले जातील. विद्यमान उत्पादनांचा विस्तार, देखभाल आणि सुधारणा यांसाठी १८.९ कोटी रुपये खर्च केले जातील. व्यवसाय विकास आणि मार्केटिंग उपक्रमांसाठी निधी म्हणून १४.०६ कोटी रुपये वापरले जातील. उर्वरित भांडवल सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरले जाईल.

नागपूर मुख्यालय असलेल्या कंपनीने जुलै २०२४ मध्ये प्री-आयपीओ फंडिंग फेरी यशस्वीरित्या पूर्ण केली असून, प्रमुख गुंतवणूकदारांकडून २१.४४ कोटी रुपये उभारले आहेत. या गुंतवणूकदारांमध्ये देवनाथन गोविंद राजन (माजी व्यवस्थापकीय संचालक, रारे एंटरप्राइझ), जयरामन विश्वनाथन (माजी संचालक, इलेक्ट्रा पार्टनर्स आशिया फंड), असित ओबेरॉय (माजी सीओओ आणि सीएफओ, येस बँक), उमेश सहाय आणि अभिषेक नारबारिया (ईएफसी चे सहसंस्थापक), दर्शन गंगोळी (माजी कार्यकारी संचालक, अल्टिको कॅपिटल), अभिषेक मोरे (संस्थापक आणि सीईओ, डिजिकोअर स्टुडिओज), अमित मामगाईन (वरिष्ठ उपाध्यक्ष, इक्विटी सेल्स, एएमएसईसी), एम. श्रीनिवास राव (माजी व्यवस्थापकीय संचालक, बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशन, इंडिया), शशांक मिश्रा (संस्थापक आणि सीईओ, झोलोपॅक इंडिया), इंडिया इमर्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँड पीई ग्रुप आणि नोव्हा कॅपिटल अपॉर्च्युनिटीज फंड, मॉरिशस यांचा समावेश आहे. व्हीजीआयएल विविध प्रकारची सॉफ्टवेअर उत्पादने पुरवते. यात बँका, सोसायट्या आणि नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपन्यांसाठी (एनबीएफसी) डिझाइन केलेली कोअर बँकिंग सिस्टिम आहे. आयबीएस-ईआरपी हे एक सर्वसमावेशक ईआरपी सॉफ्टवेअर आहे, जे वित्त, मानव संसाधन, उत्पादन, सेवा, पुरवठा साखळी आणि खरेदी यांसह मुख्य व्यवसाय कार्ये एका एकत्रित प्रणालीत एकत्र आणते. ई-एपीएमसी हे वेब-आधारित प्लिकेशन आहे, जे कृषी उत्पादन बाजार समित्यांच्या (एपीएमसी) विविध गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. ई-ऑटोप्सी हे पोस्टमॉर्टम विभागांसाठी खास डिझाइन केलेले वेब-आधारित एंड-टू-एंड सोल्यूशन आहे. व्ही-पे हे सर्व प्रकारच्या डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी एक सर्वसमावेशक प्लॅटफॉर्म म्हणून कार्य करते. १९९७ मध्ये पहिल्या पिढीतील तंत्रज्ञ अविनाश नारायणराव शेंडे आणि सचिन पुरुषोत्तम पांडे यांनी व्हीजीआयएलची स्थापना केली. व्हीजीआयएलतर्फे अखंडित इंटिग्रेटेड बँकिंग व वित्तीय इकोसिस्टीममध्ये सुरक्षित कोअर बँकिंग सोल्यूशन्स पुरविण्यात येतात. २६ वर्षांहून अधिक अनुभव आणि सुमारे ३२९ कर्मचाऱ्यांची समर्पित टीम असलेली ही कंपनी, व्यावसायिक बँका, राज्य सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी सोसायट्या, एनबीएफसी आणि बचत आणि क्रेडिट सहकारी सोसायट्या (सॅकोस) यांना प्रगत सॉफ्टवेअर सेवा पुरवते. सध्या व्हीजीआयएल भारतातील १५ हून अधिक राज्यांमध्ये ग्राहकांना सेवा देत आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात देखील विस्तार केला आहे, ज्यात आफ्रिकेतील टांझानिया आणि मलावी यांचा समावेश आहे. व्हर्चुअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेडने ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष २०२५च्या पहिल्या सहामाहीत ७१.६ कोटी रुपयांचे ऑपरेशनल उत्पन्न आणि १८.९ कोटी रुपयांचा करोत्तर नफा (Sass ) नोंदवला आहे. हे उत्पन्न आणि नफा आर्थिक वर्ष २०२४ मधील ६१.४६ कोटी रुपये इतके उत्पन्न आणि १६.३ कोटी रुपये इतक्या करोत्तर नफ्याच्या (-तुलनेने

## भरत अहलावत सांगत आहे झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमधील त्याची ऑनस्क्रीन बहिण सेहज राजपूतसोबतच्या नात्याबद्दल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ०४ :**
झी टीव्ही आपली नवीन मालिका जाने अनजाने हम मिलेच्या सुरूवातीसाठी सज्ज आहे. ही मालिका रोचक अशा आटा साटा लग्न परंपरेबद्दल असून ही चाल अजूनही गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशात अस्तित्वात आहे. हे बोल्ड कथानक कुटुंबावरील प्रेमाचा आधार असलेल्या नातेसंबंधांच्या जटिल डायनॅमिक्सकडे अपारंपारिक दृष्टीने पाहते. ह्या मालिकेतून दोन आधुनिक आणि खंबीर मनाची प्रमुख जोडी, स्वतंत्र आणि हजरजबाबी अशी पत्रकार रीत (आयुषी खुराणा) आणि दिसायला कठोर स्वभावाचा तरी मनाने मात्र घायाळ राघव (भरत अहलावत) यांची ओळख करून दिली जाईल, जिथे रीत प्रेमासाठी नाही तर आपल्या भावाच्या आनंदासाठी ती एक गॅरंटी बनून लग्न करण्याचा धक्कादायक निर्णय घेते. परिवाराचा हिस्सा असल्याबद्दल कर्तव्य म्हणून घेतलेल्या अपेक्षांच्या ओझ्याखाली निर्माण झालेल्या लग्नामध्ये काय खरंच प्रेम फुलू शकते का याचा शोध ह्या मालिकेतून घेण्यात येईल. एका कलाकारासाठी ऑनस्क्रीन केमिस्ट्री निर्माण करणे



एक समाधानकारक अनुभव असू शकतो, खासकरून तेव्हा जेव्हा सहकलाकारासोबत काम करणे अगदी नैसर्गिक असेल तर प्रत्येक दृश्य अगदी सहजपणे साकारले जाऊ शकते. भरत अहलावतचे अगदी हेच आहे. तो ह्या मालिकेत सेहज राजपूत साकारत असलेल्या उन्नतिचा तिचे रक्षण करणाऱ्या मोठ्या भावाच्या रूपात आहे. भरतने सांगितले की सेहजसोबत भावाचे नाते साकारणे अगदी नैसर्गिक वाटते कारण त्याला खरी धाकटी बहिण आहे आणि त्यामुळे भावाबहिणीचे नाते तो व्यवस्थित जाणतो. भरत आणि सेहज यांच्यातही भावाबहिणीसारखेच नाते निर्माण झाले असून ते ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीनही चमकत आहे.

भरत म्हणाला, जेव्हा मी पहिल्यांदा सेहजला भेटलो तेव्हाच आमच्यामध्ये लगेचच मैत्री झाली. जसा माझ्या घरी मी माझ्या बहिणीची काळजी घेतो, तसाच सेटवर सेहजचीही काळजी घेतो. तिची मस्ती, तिची विनोदबुद्धी, सेटवर ज्याप्रकारे ती मला त्रास देते, त्या सगळ्या गोष्टींमुळे मी माझ्याच बहिणीसोबत काम करत असल्याची भावना मनात निर्माण होते. आम्ही जेव्हा भावाहिणीची दृश्ये साकारत असतो, तेव्हा आम्हांला फारशी मेहनत घ्यावी लागत नाही. ती दृश्ये अगदी नैसर्गिकपणे चित्रीत होतात. जेव्हा कॅमेरा रोल व्हायला सुरूवात होते, आम्ही सेटवर खूप मजा करतो आणि जेव्हा चित्रीकरण करत नसतो, तेव्हा आम्ही एकत्र हसतो, खातो, आमच्या ब्रेक्समध्ये कॉफी प्यायला जातो आणि आमचा एकत्र समय छान व्यतीत करतो. माझ्या बहिणीप्रमाणे मी सेहजसाठीसुद्धा कायम असेन आणि मला आशा आहे की ह्या मालिकेसोबत आमच्यातील मैत्रीही उत्तरोत्तर वाढत जाईल.

## २०२५ पर्यंत येऊ शकतो जिओचा आयपीओ रिटेल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ०४ :** जिओ, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड चे दूरसंचार युनिट, पुढील वर्षी म्हणजे २०२५ पर्यंत लॉंच करू शकते. तर, कंपनी रिटेल बिझनेसचा आत्तासाठी पुढे ढकलू शकते. वृत्तसंस्था रॉयटर्सने आपल्या एका वृत्तात या प्रकरणाशी परिचित लोकांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. तज्ज्ञांच्या मते, जिओचे मूल्यांकन १०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. अलिकडच्या वर्षांत, आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती, अंबानी यांनी डिजिटल, दूरसंचार आणि किरकोळ व्यवसायांसाठी जनरल अटलांटिक आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी यांसारख्या कंपन्यांकडून एकत्रितपणे २५ अब्ज उभे केले आहेत. मात्र याबाबत कंपनीकडून अधिकृतपणे कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

**जिओचे ४७ कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत**

त्याच वेळी, एअरटेलचे ३८.४९ कोटी ग्राहक आहेत आणि व्होडाफोन आयडियाचे २१.४० कोटी ग्राहक आहेत. तर सरकारी कंपनी बीएसएनएलचे ९.१० कोटी ग्राहक आहेत. वापरकर्त्यांचा हा डेटा वायरलेस ग्राहकांचा आहे.

**आयपीओमुळे रिलायन्सचे शेअर्सही वाढतील**

मीडिया रिपोर्ट्सनुसार, जिओच्या चा च्या शेअर्सवर सकारात्मक परिणाम होईल. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या शेअर्सची किंमत ७%-१५% वाढवू शकते. रिलायन्सचे शेअर्स या वर्षात आतापर्यंत फ्लॅट राहिले आहेत. तर, या समभागाने गेल्या ६ महिन्यांत ८.५३% आणि १ महिन्यात ६.३५% नकारात्मक परतावा दिला आहे. आज रिलायन्सचे शेअर्स ३.००% च्या घसरणीसह रु. १,२९८.५० वर बंद झाले.

रिलायन्सचा वित्तीय सेवा व्यवसाय २०२३ मध्ये सूचीबद्ध झाला

यापूर्वी, रिलायन्सचा वित्तीय सेवा व्यवसाय जुलै २०२३ मध्ये त्याच्या मूळ कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पासून विभक्त झाला होता. डिमर्जरनंतर, जिओ फायनान्शिअलच्या शेअरची प्राइस डिस्कवरी मॅकेनिज्म अंतर्गत २६१.८५ रुपये निश्चित करण्यात आली. यानंतर, २१ ऑगस्ट रोजी, कंपनीचे शेअर्स बॉम्बे स्टॉक एक्सचेंज वर २६५ रुपयांवर सूचीबद्ध झाले. त्याच वेळी, नॅशनल स्टॉक एक्सचेंज वर शेअर २६२ रुपयांवर सूचीबद्ध झाला. सूचीबद्ध केल्यानंतर, त्या दिवशी जेएफएसएल शेअर्समध्ये घसरण झाली. वर ५% च्या लोअर सर्किटसह स्टॉक रु. २५१.७५ वर बंद झाला. त्याच वेळी, वर देखील शेअर ५% च्या कमी सर्किटसह २४८.९० रुपयांवर बंद झाला.

**जिओच्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ नफ्यात वार्षिक १४% वाढ झाली आहे**

आर्थिक वर्ष २०२४-२५च्या दुसऱ्या तिमाहीत, रिलायन्स जिओचा निव्वळ नफा वार्षिक आधारावर १४% ने वाढून ६,२३१ कोटी रुपये झाला आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत ते ५,४४५ कोटी रुपये होते. त्याच वेळी, कंपनीचा महसूल वार्षिक आधारावर ७.०%

# दिवाळीमध्ये पात्रांची निघाली दिवाळखोरी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ०४ :**
एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन' आणि भाबीजी घर पर है'मधील धमाल व विनोदी एपिसोड्ससह दिवाळी सणाला अधिक खास व मनोरंजनपूर्ण बनवा. एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन'मधील दिवाळी स्पेशल एपिसोडबाबत दरोगा हप्पू सिंग ऊर्फ योगेश त्रिपाठी म्हणाले, दिवाळी सणाच्या तयारीला जल्लोषात सुरूवात झाली आहे आणि घरातील सर्वजण हप्पूला (योगेश त्रिपाठी) महागड्या गिफ्ट्सबाबत विचारत आहेत. गिफ्ट्सच्या खर्चाबाबत चिंतित हप्पूला सर्वांसाठी कशाप्रकारे गिफ्ट्स खरेदी करेल याबाबत प्रश्न पडला आहे. पोलिस स्टेशनला जात असताना हप्पू बेनीला (विश्वनाथ चॅटर्जी) भेटतो, जो त्याच्या आर्थिक अडचणींबाबत सांगतो आणि शेवटचा पर्याय म्हणून जुगार खेळण्याचा सल्ला देतो. पोलिस स्टेशनमध्ये हप्पूचा गॅम्बलर व त्याच्या पत्नीशी सामना होतो. गॅम्बलरची पत्नी हप्पूला तिच्या पतीला योग्य मार्गदर्शन करण्याची आणि जुगार खेळण्याची सवय दूर करण्याची विनवणी करते. हप्पू गॅम्बलरला कस्टडीमध्ये घेऊन जातो, पण त्याऐवजी गॅम्बलर हप्पूला बेटिंग टिप्स शिकवतो, ज्यामुळे हप्पूमध्ये जुगार खेळण्याबाबत उत्सुकता जागृत होते. त्यानंतर, हप्पू बेनीला त्याच्यासोबत सामील करून घेतो आणि दोघे गॅम्बलिंग डेनला भेट देतात, जेथे जीजी नावाचा गॅम्बलर हप्पूला सुरूवातीला काही राऊंड्समध्ये जिंकायला देतो. पण, लवकरच बेनी त्याचे पैसे गमावतो. हे समजल्यानंतर बिमलेश (सपना सिकरवार) राजेशला (गीतांजली मिश्रा) त्याबाबत सांगते आणि कुटुंब हप्पूला जाब विचारतात. हप्पू बेनीला गॅम्बलिंग डेनमध्ये घेऊन जातो, पण जीजी फसवणूक करून त्यांचे सर्व पैसे घेतो. कटोरी अम्मा हिमानी शिवपुरी) हप्पूचा अपमान करते. दुसऱ्या दिवशी, हप्पू व मलायका (सोनल पनवार) पैसे परत मिळवण्याची योजना आखतात. आफ्रिकन किंग व क्वीन म्हणून वेषांतर करत ते डेनमध्ये



जातात, ज्यामागे त्यांचा जीजीला हरवण्याचा मनसुबा असतो.'' मालिका भाबीजी घर पर है'मधील दिवाळी एपिसोडबाबत विभुती नारायण मिश्रा ऊर्फ आसिफ शेख म्हणाले, मॉडर्न कॉलनीमध्ये दिवाळीसाठी तयारी जल्लोषात सुरू आहे. अंगूरी (शुभांगी अत्रे) विभुतीला (आसिफ शेख) घराची साफसफाई करण्यास सांगते. पण, तिवारी (रोहिताश्व गौड) जमिनीच्या वादामुळे तणावात असतो. दरम्यान, चहाच्या टपरीवर टीका (वैभव माथूर) व टिल्लू (सलिम झैदी) अभिमानाने त्यांच्या नवीन व्यवसाय उद्यमाबाबत घोषणा करतात. हा व्यवसाय ताबा मिळवलेल्या जमिनीवर पुन्हा दावा करण्यामध्ये विशेषीकृत असतो. हे ऐकल्यानंतर तिवारी त्यांना स्वत:च्या विवादित जमिनीचे प्रकरण सोडण्यास नियुक्त करतो. टीका व टिल्लू तिवारीच्या जमिनीवर ताबा मिळवलेला गॅंगस्टर चीचूकडे जातात, पण वाटाघाटी करण्याऐवजी चीचू व त्याचे गुंड त्यांना मारहाण करतात. त्यानंतर, प्रेम (विश्वजीत सोनी) व विभुती जवळून जात असतात आणि त्या दोघांना जखमी अवस्थेत पाहतात. चौकशी केल्यानंतर टीका व टिल्लू घडलेल्या प्रकाराबाबत सांगतात. प्रेम सांगतो की चीचू त्याचा जुना मित्र आहे, त्याने एकदा त्याला मदत केली होती. हे एकून विभुतीला कल्पना सुचते. तो अनितासमोर (विदिशा श्रीवास्तव) प्रस्ताव मांडतो की ते स्वस्तात जमिन खरेदी करतील, त्यानंतर प्रेम ती जमिन सोडण्यासाठी चीचूला समजावेल, ज्यामुळे त्यांना . लाख रूपयांचा फायदा होईल. . लाख रूपये बचत केलेली अनिता मान्य करते आणि ते तिवारीकडून जमिनी खरेदी करतात. प्रेम चीचूकडे जातो, जो त्याचे स्वागत करतो, पण तिवारीच्या जमिनीचा उल्लेख केल्यानंतर चीचू व त्याचे गुंड प्रेमला देखील मारहारण करतात. चिंतित अनिता तिवारीकडे तिचे पैसे परत मागते, पण तो सुरूवातीला नकार देतो. नंतर, दोषी वाटल्यानंतर तिवारी पैसे परत करतो, पण अनिता आग्रह करते की ते सर्व मिळून जमिनीचा ताबा पुन्हा मिळवतील.

## आजचे राशिभविष्य

**मेष:** आजचा दिवस तुमच्यासाठी आव्हानांनी भरलेला असेल. आज प्रकृतीत चंचलता राहील. आज ग्रह तुम्हाला कोणत्याही चुकीच्या कामात अडकण्याचे संकेत देत आहेत.

**वृषभ :** कोणतेही नवीन काम करण्यापूर्वी तुमच्या जोडीदाराचा किंवा वडिलांचा सल्ला अवश्य घ्या. आज तुम्हाला आकर्षक ऑफर मिळू शकतात. आज कोणाशीही वादात आणि अनावश्यक चर्चेत पडू नका.

**मिथुन :** व्यवसायाशी संबंधित लोकांची आर्थिक स्थिती बिघडेल. आरोग्य चांगले राहील आणि तुम्हाला बीपीच्या समस्येने त्रास होईल. बँकेच्या कामात फायदा होईल.

**कर्क :** आज जमीन, मालमत्ता, वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित प्रकरणांमध्ये लाभ होईल.तुम्ही तुमच्या मनातील भावना तुमच्या जोडीदारासोबत शेअर कराल. नोकरी आणि व्यवसायात यश मिळेल.

**सिंह:** आजचा दिवस चांगला जाईल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुमची सर्व कामे पूर्ण होतील. आज तुमच्या पत्नीच्या सहकार्याने आर्थिक स्थिती सुधारेल. आरोग्य चांगले राहील.

**कन्या :** नामांकित लोकांच्या मदतीने प्रत्येक गुंतागुंतीची समस्या सोडवाल. नोकरीत बढतीची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी सहका-यांचेपूर्ण सहकार्य मिळेल.

**तूळ :** आज तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. एखाद्या जुन्या मित्राची भेट होऊ शकते. आज तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक:** आजचा दिवस सामान्य असेल. आजची दुपार आव्हानात्मक असेल. आळस तुम्हाला घेरेल, सुट्टी आहे, थोडी विश्रांती घेणे चांगले. वेळेचा अपव्यय टाळा.

**धनु :** एखाद्या व्यक्तीच्या अत्यंतिक आहारी गेल्याने वैवाहिक जीवनात वादळ येतील. त्यामुळे सावध राहा. रागावलेली प्रिय व्यक्ती आज तुमच्याशी संवाद साधेल.

**मकर :** आज कल्पनेच्या महासागरात डुबकी मारणे थांबवा आणि वास्तवात पाऊल टाका. तुमच्या कल्पनेतून बाहेर पडून सर्जनशील कामासाठी वेळ द्या, त्याचा तुम्हाला फायदा होईल.

**कुंभ :** कन्स्ट्रक्शनच्या व्यवसायात असलेल्यांना आज फायदा होईल. तुमचा एखाद्याशी भावनिक बंध निर्माण होईल आणि यामुळे तुमच्या चिंता दूर होतील. क्षमतेच्या जोरावर नोकरीत यश मिळेल.

**मीन :** साहित्याकडे तुमचा कल राहील. कायदेशीर बाबींमध्ये व्यक्तीला आर्थिक लाभ होईल. मानसिक तणावामुळे आरोग्यावर परिणाम होईल. खरं प्रेम मिळेल.

## ६ कंपन्यांचे मूल्य रु.१.०७ लाख कोटींनी वाढले




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ०४ :** व्यापारानंतर, सेन्सेक्सच्या सर्व ३० समभागांपैकी २६ वर होते, तर ४ खाली होते. त्याच वेळी, निफ्टीच्या ५० पैकी ४२ समभागांमध्ये वाढ झाली आणि केवळ ८ समभागांमध्ये वाढ झाली. एका आठवड्याच्या व्यवहारानंतर, बाजार ३२१.८३ अंकांनी किंवा ०.४०% वाढला.

**बाजार भांडवल म्हणजे काय?**

मार्केट कॅप हे कोणत्याही कंपनीच्या एकूण थकबाकीदार समभागांचे मूल्य असते, म्हणजे ते सर्व शेअर्स जे सध्या तिच्या भागधारकांकडे आहेत. कंपनीच्या जारी केलेल्या समभागांच्या एकूण संख्येचा समभागाच्या किमतीने गुणाकार करून त्याची गणना केली जाते. मार्केट कॅपचा वापर कंपन्यांच्या शेअर्सचे वर्गीकरण करण्यासाठी गुंतवणूकदारांना त्यांच्या जोखीम प्रोफाइलनुसार निवड करण्यात मदत करण्यासाठी केला जातो. लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप कंपन्यांप्रमाणे.


## आज का अंदाज

**मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४**

जबरदस्त पास होणारे चान्सेस

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 8 | 9 | 2 | 3 | 6 | 7 |
| 129 | 690 | 800 | 199 | 255 | 490 | 123 | 467 |
| 246 | 780 | 558 | 388 | 366 | 580 | 268 | 890 |
| 589 | 500 | 440 | 577 | 499 | 670 | 790 | 115 |
| 24 | 54 | 81 | 91 | 21 | 31 | 68 | 75 |
| 26 | 56 | 83 | 93 | 20 | 39 | 64 | 78 |
| 20 | 50 | 87 | 97 | 29 | 30 | 65 | 74 |

मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४


सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 41 | 50 | 70 |
| 35 | 45 | 58 | 78 |
| 39 | 49 | 52 | 72 |

कल्याण व मुंबईकरिता आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार 9822486034


## शब्दकोडे क्रमांक १९६५



**आडवे शब्द :-**
१) कारण
४) नाजूक, कोवळा
६) कैद
८) सोपे
११) एकाग्र नजर
१२) न्याय
१३) सामान
१४) दह्याचे पातळसर पेय
१५) डीर
१६) एक काटेरी आंबटगोड कंद
१९) पवित्र
२२) अंगठा व तर्जनी या मधील अंतर
२३) रमापती
२५) प्रजाजन
२६) वाकलेला
२७) अथवा
२८) पुष्पदल
२९) जंगलातील प्राणी
३२) खानदान
३३) मीठाची चव
३४) श्रीकृणाचे एक नाव
३५) पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३८) गंध,
३९) विरोध, प्रतिबंध
४०) व्यापारी नफा
४२) शोभणारा
४४) पातक
४७) खटला
४८) श्रेष्ठ पुरुष
५०) एक गड्डा भाजी
५३) केविलवाणा
५५) बडबड त्रास
५६) रुची, स्वाद
५७) वसुंधरा
५८) केसांना लावण्याचा रंग
६०) एक मराठी महिना
६१) मृत्यू नसलेला
६३) नाश पावणारे
६४) इंद्र
६६) मत्सर
६७) अरण्यवास
७१) राबता,
७३) जनन
७४) सत्ता
७६) मनाचा ओढा
७७) काव्य करणारा
७८) उष्ण
७९) दारूचा एक प्रकार

**उभे शब्द :-**
२) मोठे डोळे
३) बगळा
५) चिंतन
६) शेराचा आठवा भाग,
७) अर्धवर्तुळाकार
९) वल्लरी
१०) तीव्र भूक, वखवख
१७) नाकावरील मोत्याचा दागिना
१८) बाजूला होणे
२०) वरपांगी
२१) मुलींच्या खेळण्यातील एक वसस्पतीचे फळ
२४) बनकर
२५) नृत्य
२६) मेणा, पालखी
२८) पारद
३०) नृत्यकलेचे दैवत
३१) मालाचे येणेजाणे
३२) मोठा हातोडा
३३) विशेष
३६) धातूचा धागा
३७) रममाण
३८) शाब्दिक चकमक
४१) जेव्हा (सं.)
४२) खोटे कारण लपविण्यासाठी केलेला प्रयत्न
४३) अरण्य
४४) एक चतुर्थांश
४५) पुन्हा पुन्हा
४६) एक उष्ण सुगंधी पेय
४९) धोबी
५०) अभिनेता
५१) लटकट ठेवणे, अधांतरी ठेवणे
५२) चमक, मुरगळा
५४) मऊ
५५) कारस्थान
५९) लाख, अवधान
६१) अवास्तव
६२) लबाडीचा हेतू
६५) शिक्षा
६८) दृष्टी
६९) मनाला टोचलेले दु:ख
७०) शपथ
७२) जपानी चलन
७५) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# चिखली मतदारसंघात, बसप उमेदवारावर हल्ला

## अडव्होकेट शंकर शेषराव चव्हाण यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा दि. ४ :
उमेदवारांची भाऊ गर्दी झालेल्या चिखली विधानसभा मतदारसंघातील बहुजन समाज पक्षाचे (बसपा)चे उमेदवार अडव्होकेट शंकर शेषराव चव्हाण यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. यामुळे ते जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी चिखली येथीलच एका खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. प्रकरणी चौघा युवकाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या हल्ल्यामागे राजकीय अथवा निवडणूक विषयक कारण नसल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी सांगितले आहे.मात्र असे असले तरी राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या चिखली शहर आणि मतदारसंघात खळबळ उडाली आहे.
याप्रकरणी बसपाचे उमेदवार शंकर शेषराव चव्हाण ( वय ४० वर्ष राहणार मेहकर फाटा चिखली, जिल्हा बुलढाणा) यांनी स्वतः फिर्याद दिली आहे. फिर्यादी चव्हाण यांच्या तक्रारी वरून चिखली पोलिसांनी हर्षल ओमप्रकाश इंगळे, आकाश इंगळे ,मनोज इंगळे आणि मयूर मुरडकर



(सर्व राहणार भानखेड) यांच्या विरुद्ध आज शनिवारी, २ नोव्हेंबर रोजी कारवाई केली आहे. चौघा आरोपी युवकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) (३), ३२४ (४), ३(५) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
फिर्यादीनुसार चव्हाण कुटुंबियाचे चिखली -देऊळगावराजा राज्य मार्गावर हॉटेल शंकर फौजी नावाचा ढाबा आहे. २ नोव्हेंबर च्या रात्री दीड वाजताच्या सुमारास हे युवक आरडाओरड आणि धामधूम करीत होते. यावेळी फिर्यादी (शंकर चव्हाण यांचे) वडील शेषराव चव्हाण यांनी त्यांना हटकले.तसेच अपरात्री हॉटेल समोर धिंगाणा करू नका असे म्हटले . यावेळी चार आरोपीनी शंकर चव्हाण यांना काठी, लोखंडी रॉड ने तर त्यांचे वडील शेषराव चव्हाण आणि हॉटेलचे कर्मचारी यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. एवढेच नव्हे तर हॉटेलमधील साहित्य आणि पदार्थांचे नुकसान करुन धमक्या दिल्या चे तक्रारीत नमूद आहे. या खळबळजनक घटनेचा तपास चिखली।पोलीस ठाण्याचे ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक शरद भागवतकर करीत आहे.

## भाजपच्या चार बंडखोर उमेदवारांनी तलवार म्यान करण्यास नकार दिला

# बंडखोरीमुळे महायुतीसमोर मतविभाजनाचा धोका कायम

**अमरावती जिल्ह्यात बंडखोरीमुळे महायुतीसमोर मतविभाजनाचा धोका**

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. ४ :
जिल्ह्यात अनेक बंडखोरांना रोखण्यात भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना यश आले असले, तरी भाजपच्या चार बंडखोर उमेदवारांनी तलवार म्यान करण्यास नकार दिला. त्यातच दर्यापूरमध्ये शिवसेनेच्या विरोधात (एकनाथ शिंदे) महायुतीतील घटक युवा स्वाभिमान पक्ष आणि मोर्शी मतदारसंघात भाजप तसेच राष्ट्रवादी समोरा-समोर आले आहेत. या बंडखोरीमुळे महायुतीसमोर मतविभाजनाचा धोका कायम आहे.
मोर्शीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) देवेंद्र भुयार यांच्या विरोधात भाजपने उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली. या ठिकाणी आता मैत्रिपूर्ण लढत होईल. मात्र, भाजपमध्ये उफाळून आलेली बंडखोरी रोखणे हे मोठे आव्हान होते. उमेश यावलकर यांच्या विरोधात भाजपचे अतिरिक्त विधानसभा प्रमुख अमित कुबडे, माजी विधानसभा प्रमुख डॉ मनोहर आंडे, राजेंद्र आंडे, श्रीधर सोलव आदींनी बंडाचा झेंडा हाती घेतला होता. या बंडखोरांची समजूत काढण्यात भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना बरेच परिश्रम घ्यावे लागले. या प्रमुख बंडखोर उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपला दिलासा मिळाला आहे. पण, महायुतीत फूट पडली आहे. अचलपूरमध्ये नंदकिशोर वासनकर, अक्षरा लहाने आणि ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांच्या बंडखोरीने भाजपसमोर संकट निर्माण केले होते. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड इत्यादी नेत्यांनी बंडखोरांशी संपर्क साधून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या मध्यस्तीनंतर नंदकिशोर वासनकर, अक्षरा लहाने यांनी माघार घेतली, पण ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांनी हिंदुत्वाचा नारा देत बंडाचा झेंडा कायम ठेवला आहे. या ठिकाणी मतविभाजनाची शक्यता आहे.
दर्यापूरमध्ये महायुतीत उभी फूट आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात




भाजपचे माजी आमदार रमेश बुदिले हे महायुतीचे घटक असलेल्या युवा स्वाभिमान पक्षातर्फे तंबू ठोकून आहेत. दुसरीकडे, बडनेरात युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर तुषार भारतीय हे आपल्या बंडखोरीच्या निर्णयावर अखेरपर्यंत ठाम राहिले. त्यामुळे रवी राणांच्या अडचणी कायम आहेत. अमरावतीत भाजपचे बंडखोर उमेदवार माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनीही लढतीत कायम राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महायुतीसमोरील आव्हाने संपलेली नाहीत. मेळघाटमध्ये भाजपचे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्या माघारीने महायुतीला दिलासा, पण भाजपच्या बंडखोर ज्योती सोळके यांची समजूत काढण्यात अपयश आल्याने चिंता अशी स्थिती आहे. तिवसातून भाजपचे बंडखोर उमेदवार रविराज देशमुख यांची प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आणि त्यांनी माघार घेतली.
महाविकास आघाडीतही बंडखोरी मेळघाटमध्ये काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मन्ना दारसिंबे यांनी माघार घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला असला, तरी मोर्शीतून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गिरीश कराळे यांच्या विरोधात विक्रम ठाकरे यांची बंडखोरी कायम आहे, तर बडनेरात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड लढतीत आहेत.

## मतदारसंघातील नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबध्द

### आमदार खोडके यांनी आशीर्वाद यात्रेत साधला संवाद

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. ४ :
ज्येष्ठांच्या आशिर्वाद रुपी पाठबळातून व महिलाशक्तीच्या साथीने महायुतीच्या उमेदवार सुलभा संजय खोडके यांची आशीर्वाद पदयात्रा अमरावती शहराच्या कानाकोपऱ्यात सुरू आहे.
भारतीय संविधान हे सर्वसमावेशक शासनाच्या भावनेचे भक्कम उदाहरण आहे. ते सर्वांना सोबत घेऊन विकासाच्या मार्गावर पुढे जाण्याची प्रेरणा आणि मार्गदर्शन करते. समाजातील शेवटच्या माणसाच्या कल्याणासाठी लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यावर आपला भर आहे. सध्याच्या काळात तंत्रज्ञान आणि संपर्क माध्यमे लोकांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनली असताना जनतेच्या वाढत्या आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नरत आहोत. शहराच्या सर्वसमावेशक विकासासाठी आपला सदैव प्रयत्न असल्याचे आमदार सुलभा खोडके यांनी सांगितले. दरम्यान शासन, सामाजिक प्रगती, आर्थिक वाढ आणि पर्यावरणीय शाश्वतता यातूनच सर्वसमावेशक विकास साधणार असल्याचेही सुलभा खोडके यांनी सांगितले.

# विद्यमान आमदार लखन मलिक यांचे तिकीट कापले

### तिकीट नाकारल्यानंतर लखन मलिक काय म्हणाले?

वाशीम मतदारसंघामधून मी चारवेळा आमदार झालो. त्यामुळे मला माझ्या पक्षावर विश्वास होता की, मला पक्ष तिकीट देईल. मला आताच समजलं की दुसऱ्यांना तिकीट देण्यात आलं. त्यामुळे मी आत्ता काही बोलणार नाही. पण सर्व कार्यकर्त्यांना बोलावून माझी भूमिका मी स्पष्ट करेन. मात्र, आमच्या नेत्यांनाच माहिती की मला उमेदवारी का दिली नाही? आम्ही इमानदारीने पक्षाचं काम केलं. त्यामुळे आम्हाला विश्वास होता की आम्हाला तिकीट मिळेल. पण आता माझ्यावर अन्याय झाला आहे. कारण मला संधी द्यायला हवी होती. मी कोणताही भ्रष्टाचार केलेला नाही. पक्षाला बदनाम केलेलं नाही. कोणालाही फसवलं नाही. त्यामुळे पक्षाने माझ्यावर थोडातरी विश्वास ठेवायला पाहिजे होता, असं आमदार लखन मलिक यांनी म्हटलं आहे.



**तिकीट नाकारल्यामुळे आमदार लखन मलिक ढसाढसा रडले**
म्हणाले, इमानदारीने काम केलं, पण वाशीम मतदारसंघात भाजपाने भाकरी फिरवली आहे. विद्यमान आमदार लखन मलिक यांचे पक्ष नेतृत्वाने तिकीट कापले आहे.

■ महासागर प्रतिनिधी,
वाशीम दि. ४ :
विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा निकाल लागणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच पक्षाच्या नेत्यांनी आपल्या पक्षाचे जास्त आमदार निवडून आणण्यासाठी कंबर कसली आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीसह महायुतीकडून उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यात येत आहेत. भारतीय जनता पक्षानेही उमेदवारांच्या दोन याद्या जाहीर करत आतापर्यंत १२१ उमेदवारांची घोषणा केली आहे. मात्र, यामध्ये काही विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे, तर काही ठिकाणी विद्यमान आमदारांचे तिकीट कापण्यात आले आहे. यामध्ये वाशीम मतदारसंघात भाजपाने भाकरी फिरवली आहे. विद्यमान आमदार लखन मलिक यांचे पक्ष नेतृत्वाने तिकीट कापले आहे. त्यांच्या जागी आता भाजपाने पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सचिव श्याम खोडे यांना वाशीममधून संधी दिली आहे. विद्यमान आमदार लखन मलिक यांचा पत्ता कट होताच त्यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. इमानदारीने पक्षाचं काम केलं. मी कोणताही भ्रष्टाचार केला नाही. पक्षाने माझ्यावर थोडातरी विश्वास ठेवायला पाहिजे होता, अशी प्रतिक्रिया देत आमदार लखन मलिक यांना अश्रू अनावर झाले होते. दरम्यान, वाशीम मतदारसंघ अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व आमदार लखन मलिक करीत होते. ते २००९ पासून सलग तिसऱ्यांदा या मतदारसंघामधून निवडून आले होते. तसेच त्याआधी १९९० मध्ये देखील ते विजयी झाले होते. वाशीममध्ये पक्षांतर्गत लखन मलिक यांच्याविषयी तीव्र नाराजी होती, त्यामुळे त्यांचे तिकीट कापण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# संजय राठोड यांना शह देण्यासाठी भाजपची खेळी?

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ दि. ४ : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्यपाल नामनिर्देशित आमदार म्हणून बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड यांनी मंगळवारी शपथ घेतली. ही खेळी खेळून भाजपने एकाच दगडात दोन पक्षी मारल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. बंजारा मतदारांना गोंजारण्यासोबतच, या समाजाचे नेते संजय राठोड यांना शह देण्याचा प्रयत्न भाजपने केल्याचे बोलले जाते. पोहरादेवी (जि. वाशीम) हे देशातील कोटींवर बंजारा समाजाचे श्रद्धास्थान. यवतमाळ व वाशीम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सातत्याने पुढाकार घेऊन पोहरादेवी येथे बंजारा विरासत नंगारा वास्तूसंग्रहालय निर्माण केले. ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संग्रहालयाचे लोकार्पण झाले. या कार्यक्रमास दोन लाखांच्यावर बंजारा समाजबांधव उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान मोदी बंजारा समाजाच्या प्रश्नांबाबत बोलतील, अशी अपेक्षा होती. मात्र, मोदी यांनी त्याबद्दल अवाक्षरही काढले नाही. त्यामुळे या कार्यक्रमानंतर बंजारा समाजात संतापाची लाट उसळली. यामुळे बंजारा समाज विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विरोधात जाण्याचा धोका निर्माण झाल्याने भाजपने थेट या समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराज यांनाच विधान परिषदेवर पाठवून समाजाची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला, असे बोलले जात आहे.
या निर्णयामुळे बंजारा समाज भापजसोबत जुळेल, हा विश्वास भाजपच्या नेत्यांना आहे.

# अमरावती जिल्हयात अनेकांच्या तलवारी म्यानपण, मात्र सात बंडखोर

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. ४ :उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक बंडखोरांनी आपल्या तलवारी म्यान केल्या. परंतु, बडनेरा, अमरावती, अचलपूर, दर्यापूर, मोर्शी मतदारसंघांमधील सात बंडखोर निवडणुकीच्या रणांगणात कायम आहेत.
जिल्ह्यातील बंडखोर उमेदवारांची समजूत काढण्याचे मोठे आव्हान महायुती आणि

**उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक बंडखोरांनी आपल्या तलवारी म्यान केल्या**
**अमरावतीत उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. मात्र भाजपचे बंडखोर उमेदवार माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता हे लढतीत कायम आहेत.**

महाविकास आघाडीच्या नेत्यांसमोर होते. वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या बंडखोर उमेदवारांना शांत करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न केला. यात काही ठिकाणी यश आले, पण अनेक उमेदवार बंडखोरीच्या निर्णयावर ठाम राहिले. अचलपूर मतदारसंघातून भाजपचे बंडखोर उमेदवार नंदकिशोर वासनकर, अक्षरा लहाने यांच्यासह ८ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले, त्यामुळे आता या ठिकाणी २२ उमेदवार रिंगणात आहेत. तरीही भाजपसमोरील संकट पूर्णपणे टळू शकले नाही. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आणि बंडखोर उमेदवार ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांनी लढत देण्याचा निर्णय घेतला आहे. मेळघाटमधील भाजपचे बंडखोर उमेदवार माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्यासह उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. मात्र भाजपच्या अन्य बंडखोर उमेदवार ज्योती सोळंके यांनी माघार न घेतल्याने भाजपसमोरील अडचणी कायम आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मन्ना दारसिंबे यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला आहे. अमरावतीत ७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. मात्र भाजपचे बंडखोर उमेदवार माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता हे लढतीत कायम आहेत. बडनेरा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये बंडखोरी झाली आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर तुषार भारतीय आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड लढतीत कायम आहेत. दर्यापूरमध्ये महायुतीतील फूट कायम आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर आमदार रमेश बुंदिले युवा स्वाभिमान पक्षातर्फे लढत आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार गुणवंत देवपारे, रामेश्वर अभ्यंकर यांनी माघार घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला आहे. मोर्शीतून भाजपचे बंडखोर उमेदवार डॉ. मनोहर आंडे, राजेंद्र आंडे, श्रीधर सोलव, अमित कुबडे यांनी माघार घेतली आहे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) बंडखोर विक्रम ठाकरे रिंगणात आहेत. जिल्ह्यात एकूण २४८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते.

# ड्रग्ज बनविणाऱ्या कारखान्यात पोलिसांचा छाप

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. ४ :
बार्शिटाकळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महागाव रोडवरील एका बंद जीनींग प्रेसींगमध्ये ड्रग्ज बनविण्याचा कारखानाच सुरु असल्याच्या माहीतीवरुन स्थानीक गुन्हे शाखेसह बार्शिटाकळी पोलिसांनी बुधवारी सायंकाळी छापा टाकला. या कारखाण्यातून ड्रग्ज बनिवण्याचा सुमारे एक कोटी रुपयांचा कच्चा माल पोलिसांनी जप्त केला आहे. या ठिकाणावरुन तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून रात्री उशीरापर्यंत ही कारवाइ सुरु होती.
बार्शिटाकळी ते महागाव रोडवर एक बंद पडलेली जीनींग प्रेसींग असून या ठिकाणी ड्रग्ज बनविण्यात येत असल्याची माहीती अकोला पोलिसांना मीळाली. या माहीतीवरुन पथकाने पाळत ठेउन बुधवारी सायंकाळी छापेमारी केली. या छापेमारीत सुमारे एक कोटी रुपयांच्यावर कींमत असलेला कच्चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर घटनास्थळावरुन तीन आरोपींनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



तीनही आरोपी बाहेर जिल्हयातील असल्याची माहीती पोलिसांनी दिली. बार्शिटाकळी तालुक्यात चक्क ड्रग्ज बनविण्याचा कारखानाच पोलिसांच्या या कारवाइने उघड झाल्याने अनेकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. या कारवाइमुळे जिल्हयात ड्रग्जची मोठया प्रमाणात तस्करी होत असल्याचे समोर आले आहे. ही कारवाइ पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात स्थानीक गुन्हे शाखा व बार्शिटाकळी पोलिसांनी केली.

**पदार्थांचे घेतले नमुणे**

बंद जिनींगमधून पोलिसांनी ड्रग्ज बनिवण्याचा कारखान्यावर छापा टाकल्यानंतर या ठिकाणावरुन सुमारे ८० विविध पदार्थांचे नमुणे जप्त केले असून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. या ८० नमुण्यांची तपासणी झाल्यानंतर तसेच अहवाल आल्यानंतर या प्रकरणाचा उलगडा होणार असल्याची माहीती आहे.
एमडी ड्रग्ज बनविण्याचा संशय
महागाव रोडवरील बंद पडलेल्या

**बार्शिटाकळी महागाव रोडवरील बंद जीनींगमधील प्रकार**

**एक कोटी रुपयांहून अधिक कच्चा माल जप्त**

जीनींग प्रेसींगमध्ये एम डी ड्रग्ज बनविण्यात येत असल्याचा प्राथमीक अंदाज पोलिसांचा आहे. गत काही काळात राज्यात विविध ठिकाणी छापे टाकून एम डी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. या प्रत्येक कारवाइत कोटयवधींचा आकडा समोर आला आहे. त्यामुळे जीनींग प्रेसींगमध्ये एम डी ड्रग्ज बनविण्याचा कारखानाच सुरु करण्यात आला होता अशी माहीती पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

**आकडा तीन कोटींच्या घरात जाण्याची शक्यता**

महागाव रोडवर पोलिसांनी केलेल्या कारवाइनंतर या ठिकाणावरुन जप्त करण्यात कच्चा मालाचे मोजमाप सुरु होते. एक कोटी रुपयांच्यावर हा आकडा तीन कोटींच्या घरात या ड्रग्जची कींमत आहे.

# मेळघाटच्या वारली पेंटिग्जची राष्ट्रपती यांनी केली प्रशंसा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. ४ :
वारली पेंटिग्ज आणि व्याघ्र प्रकल्पातील जंगल तसेच वन्यजीव संपदेला चित्राच्या माध्यमातून समाजापुढे आणणाऱ्या सुमित्रा आहकेला तब्बल १५ दिवस राष्ट्रपतींच्या अतिथी म्हणून दिल्लीच्या राजभवनात राहण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्यांच्या अंगी असलेल्या घरगुती कलेचा सन्मानही राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आला.
गौरखेडा कुंभी येथे मुख्यालय असलेल्या खोज संस्थेत कार्यरत सुमित्रा आहके या आदिवासी भगीनी उच्चशिक्षित आहेत. रेखाकला हा विषय त्यांनी शालेय शिक्षणापासूनच जपला. त्यामुळे आदिवासी संस्कृतीची ओळख करुन देणारे वारली पेंटिग्ज, जंगलातील राहणीमान, वाघाचे महत्व आदी बाबी त्यांच्या चित्रकलेतून नेहमीच समाजासमोर आल्या आहेत. समाजसेवेची आवड म्हणून त्या खोज संस्थेतील शैक्षणिक विभागात काम करतात. आदिवासी मुला-मुलींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे, बडबड गीते व इतर कलांच्या



माध्यमातून शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी मेळघाटातील धारणी व चिखलदरा या दोन्ही तालुक्यांतील खेडे व तांडे हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. राष्ट्रपती भवनात अलिकडेच दहा दिवसीय आवासीय कला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये देशभरातून सुमारे २०० आदिवासी प्रतिनिधींनी सहभाग घेतला. पुढे या प्रतिनिधींमधील निवडक १५ जणांची खास निवड करण्यात आली. विशेष असे की या खास निवडीतील जणांमध्ये सुमित्रा आहकेला गुणवत्तेच्या श्रृंखलेत दुसरे स्थान प्राप्त झाले. त्यांनी तयार केलेले वारली पेंटिंग्ज, गाव तसेच शहरातील फरक दर्शविणारे चित्र, देवस्वरुप मानला जाणारा वाघ आणि आदिवासी क्षेत्रातील लुप्त होत चाललेल्या कलाप्रकारांवर टाकलेला प्रकाश राष्ट्रपतींना खूप भावला. त्यामुळे निरोप समारंभावेळी सुमित्रा आहकेंना प्रमाणपत्र, चषक आणि भेटवस्तू देऊन सन्मानीत करण्यात आले. सुमित्रा आहके यांच्या यशामुळे अमरावती जिल्ह्याच्या सन्मानात मानाचा तुरा खोवला गेला असून या यशाबद्दल खोज संस्थेचे प्रमुख ड. बंड्या साने, सामाजिक कार्यकर्त्या ड. पूर्णीमा उपाध्याय, ब्रदर जोस आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



## मोगरा!

तप्त झळा सोसूनी
असा मोगरा फुलतो
सर्वदूर आसमंती
लोट सुगंधी वाहतो
इवलेसे शुभ्र फुल
परि दरवळ दिव्य
एक एका फुलापाशी
जणू उमलते काव्य



भर उन्हाळ्यात अशा ठिकाणी जायला कोणाला आवडणार नाही बरं!

# कॅलिडोस्कोप

## 'बॉस'च्या माणुसकीहीन उत्तरामुळे ट्रोल!



पुण्यातील एका मल्टीनॅशनल कंपनीत कामाच्या दबावाखाली येऊन एका सीए टॉपरच्या आत्महत्येने खळबळ उडाली होती. कामाचा प्रचंड ताण असल्याने तिने मृत्यूला कवटाळले होते. त्यानंतर कर्मचाऱ्यावर कंपनीतील कामाचा प्रचंड ताण हा विषय पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

कॉर्पोरेट संस्थांमध्ये वर्क कल्चरबाबत अनेकदा वाद होतात. अनेक वेळा कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण इतका जबरदस्त असतो, की 'माणुसकीची'ही लाज वाटू लागते. अशाच एका प्रकरणाने लोकांचे लक्ष वेधले आहे. ज्यामध्ये बॉसला आपल्या कर्मचाऱ्याने कार अपघात झाल्याचे कळवूनही बॉसला दया आली नाही. माणुसकी तर सोडाच; पण बॉसने असे काही मेसेज पाठवले, ते पाहून कोणालाही संताप येईल. इन्स्टाग्रामवर kirawontmiss या अकाऊंटवरून एक किस्सा शेअर करण्यात आला आहे. त्यात एका कर्मचाऱ्याला ऑफिसला जाताना अपघात झाला. यानंतर कर्मचाऱ्याला उशीर होऊ लागल्यावर त्याने त्याच्या तुटलेल्या कारचा फोटो त्याच्या बॉसला पाठवला. त्यामुळे गंभीर अपघात झाल्याचे स्पष्ट झाले;परंतु त्यानंतरही साहेबांनी दिलेले उत्तर पाहून लोक संतापले. मॅनेजरने चिंता व्यक्त करण्याऐवजी कर्मचाऱ्याला स्वतःबद्दलचे अपडेट्स देत राहण्यास सांगितले.

मॅनेजरने कर्मचाऱ्याला मेसेज लिहिला आणि म्हणाला,'तुम्ही ऑफिसला किती वाजता पोहोचता, त्याचे अपडेट मला देत राहा.' दिवसभरानंतरही प्रतिसाद न आल्याने मॅनेजरने दुसरा संदेश पाठवला. ज्यात त्यांनी लिहिले,' तुम्हाला उशीर का झाला हे समजण्यासारखे आहे; परंतु कुटुंबातील एखाद्याच्या मृत्यू तर झाला नाही ना? तसे असेल तरच सुट्टी मिळेल. ऑफिसला आलात नाही, तर कंपनी तुम्हाला माफ करणार नाही.' ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर 'सोशल मीडिया'वर यूजर्समध्ये नाराजी पसरली आहे. एका यूजरने लिहिले,मी अशा बॉससोबत काम करण्याऐवजी नवीन नोकरी शोधेन.

## 'जय श्रीराम' न म्हणणाऱ्या शिक्षकाशी असभ्य वर्तन




गाझियाबादच्या क्रॉसिंग रिपब्लिक भागात उर्दू शिक्षकासोबत असभ्य वर्तनाचे प्रकरण समोर आले आहे. येथे शिक्षकाला 'जय श्रीराम' म्हणण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पीडितेने विरोध केल्यावर त्याला लिफ्टमधून ढकलण्यात आले. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला अटक करून तपास सुरू केला आहे. त्याचबरोबर 'सोशल मीडिया यूजर्स'नी या प्रकरणावर प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही संपूर्ण घटना 'पंचशील वेलिंग्टन सोसायटी ऑफ क्रॉसिंग रिपब्लिक'मध्ये घडली. मोहम्मद आलमगीर नावाचे उर्दू शिक्षक येथे शिकवण्यासाठी गेले होते. सोसायटीत शिकवणीसाठी गेल्याचे त्यांनी सांगितले, ते वेटिंग एरियामध्ये लिफ्टची वाट पाहत असताना मनोज कुमार नावाचा रहिवासी तेथे आला आणि त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आधी मनोज त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहू लागला. यानंतर तुम्ही कुठे जात आहात, अशी विचारणा केली. आलमगीरने सोसायटीच्या १६ व्या मजल्यावर अरबी शिकवणी शिकवण्यासाठी जात असल्याची माहिती देताच मनोजने 'जय श्री राम' म्हणण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. शिक्षकाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले; पण त्याने त्याला सोडले नाही आणि त्याला टोमणे मारायला सुरुवात केली.

शिक्षक म्हणाले, 'त्याची कृती पाहून मला आश्चर्य वाटले; पण मी काहीच बोललो नाही. पहिल्या मजल्यावर लिफ्ट थांबल्यावर त्याने मला ढकलून दिले. यानंतर त्यांनी दुसऱ्या रहिवाशांना विचारले, की या सोसायटीत मुस्लिम कधीपासून येऊ लागले? अन्य एका रहिवाशानेही गैरवर्तन केले पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिताने सांगितले, की लिफ्टमध्ये उपस्थित असलेल्या अन्य रहिवाशानेही त्याच्याशी गैरवर्तन केले आणि त्याला १६व्या मजल्यावर जाण्यापासून रोखले; मात्र, काही लोकांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून परिस्थितीचे कारण देत त्यांना तेथून निघून जाण्यास सांगितले. यानंतर आलमगीरने विद्यार्थ्यांच्या पालकांना फोन करून या प्रकरणाची माहिती दिली. यानंतर मनोजने पुन्हा एकदा 'जय श्री राम' म्हणण्यासाठी दबाव आणला. पीडितेच्या म्हणण्यानुसार, जेव्हा त्याने प्रतिसाद दिला नाही, तेव्हा इतर रहिवाशांनी त्याला तळमजल्यावर नेले आणि त्याच्याशी गैरवर्तन करण्यास सुरुवात केली. यानंतर सुरक्षारक्षक आणि इतर रहिवाशांनी शिक्षकाचा नंबर घेतला. तसेच, त्याला सोसायटी सोडण्यास सांगितले. या प्रकरणी मनोज कुमारविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. घटनेच्या वेळी मनोज मद्यधुंद अवस्थेत असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपीने सांगितले की, त्याने शिक्षकाला काही प्रश्न विचारले होते, ज्याचे त्याने उत्तर दिले नाही. यामुळे तो संतप्त झाला. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले, त्यानंतर त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली.

## विमानात सामान ठेवण्यावरून मारामारी



बसपासून ते दिल्ली मेट्रोपर्यंत, प्रवाशांना अनेक वेळा शिवीगाळ करताना आणि भांडताना अनेकदा पाहिले असेल. आता असे दृश्य विमानांमध्येही दिसू लागले आहे. ताजे प्रकरण एका खासगी विमानाचे आहे, जिथे केबिनमध्ये सामान ठेवण्यावरून दोन प्रवासी एकमेकांशी भिडले. हे विमान मुंबईला जाणार होते. दोन प्रवाशांमधील बाचाबाची एवढी वाढली की दोघांनीही एकमेकांना बघून घेण्याची धमकी देण्यास सुरुवात केली आणि या वादात एकाने त्या व्यक्तीला चापटीही मारली.

प्रवाशांच्या दोन गटांमध्ये काही मुद्द्यावरून भांडण झाले, त्यानंतर विमानात गोंधळ झाला. संपूर्ण उड्डाणाचे वातावरण एकमेकांना ओरडणे आणि धमक्यांमध्ये बदलले. फ्लाइटमध्ये आपल्या कुटुंबासोबत प्रवास करत असलेल्या एका व्यक्तीचा समोरील प्रवाशासोबत काही मुद्द्यावरून वाद झाला. आता हा वाद इतका वाढला, की कुटुंबासह चालक दलातील सदस्यांना मध्यस्थी करावी लागली. यानंतरही हाणामारी थांबली नाही आणि एकमेकांना अपमानित करण्याचा टप्पा सुरूच राहिला. बँकॉक-इंडिया फ्लाइटमधील प्रवाशांमधील बॉक्सिंगचा संपूर्ण सामना पाहावा लागला. क्रू पूर्णपणे अनभिज्ञ आहे. चौघांनी मिळून खिडकीजवळ सीटवर बसलेल्या व्यक्तीवर थप्पड आणि ठोसे मारले. वादाच्या भरात आधी करड्या रंगाचा टी-शर्ट घातलेल्या व्यक्तीने आपला चष्मा काढला आणि नंतर समोरच्या व्यक्तीच्या तोंडावर चापट मारली. आरडाओरडा करत कर्मचाऱ्यांना बोलावले. चार जणांनी मिळून एकट्या व्यक्तीवर हल्ला केला, त्यांच्यासोबत असलेल्या महिलांनी लोकांना मारण्यास नकार दिला, मात्र असे असतानाही चार ते पाच जणांनी एकट्या व्यक्तीवर हल्ला करून आपले शौर्य सिद्ध केले!

## टी शर्टचाच टॅटू काढला

फुटबॉल चाहत्यांचं खेळाप्रती असलेलं वेड आपण जाणतो. आपल्या देशाचा संघ हरला की चाहते दु:खावेगात बुडून जातात तर जिंकल्यावर त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. आपल्या आवडत्या खेळाडूसाठी चाहते जीवाचं रानही करतात. ब्राझीलमध्येही फुटबॉलचं वेड असंच ओसंडून वाहत असतं. मॉरिसियो डॉस एंजॉस नावाच्या तरुणाला फुटबॉलने झपाटून टाकलं आहे. त्याने संपूर्ण शरीर फुटबॉल टीमच्या जर्सीसारखं रंगवून घेतलं आहे. ब्राझीलमध्ये फ्लेमिंगो नावाचा फुटबॉल क्लब आहे. तो या क्लबचा चाहता आहे. त्यामुळे त्याने या संपूर्ण शरीर संघाच्या जर्सीसारखं रंगवून घेतलं आहे. लांबून बघितलं तर त्याने संघाची जर्सी घातल्यासारखं वाटेल. खरं



तर त्याने शरीराला फक्त रंग लावलेले नाहीत तर टॅटू काढून घेतला आहे. त्याच्या शरीराचा ४० टक्के भाग टॅटूने व्यापला आहे. शरीरावर जर्सीसारखा टॅटू काढण्यासाठी त्याला ९० तास लागले. लहानपणापासूनच त्याला फुटबॉलचं वेड होतं. आपल्या आवडत्या फ्लेमिंगो संघाच्या जर्सीचा टॅटू त्याला काढायचा होता. पण वडिलांना आवडत नसल्याने त्याला ते जमत नव्हतं. पण १८ वर्षांचा झाल्यावर त्याने टॅटू काढायचा निर्णय घेतला. या टॅटूमुळे त्याच्या फॅन्सची संख्या वाढली आहे. सामना पहायला गेल्यावर लोक त्याच्यासोबत सेल्फी काढून घेतात.

## हाताचे पंजे नसताना

हातांचे पंजे नसतानाही तिने हस्ताक्षर स्पर्धा जिंकली! त्यामुळे तिचं सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. सारा हेन्स्ली असं या मुलीचं नाव. अवघ्या दहा वर्षांची सारा अमेरिकेतल्या मेरीलँडमध्ये राहते. तिला जन्मापासूनच हाताचे पंजे नाहीत. मात्र मध्यंतरी झालेल्या राष्ट्रीय स्तरावरच्या हस्ताक्षर स्पर्धेचं विजेतेपद तिने पटकावलं. साराला ५०० डॉलर आणि ट्रॉफी बक्षिस म्हणून देण्यात आली. यासोबतच या वर्षी १३ जून रोजी होणाऱ्या एका कार्यक्रमात सुंदर हस्ताक्षरासाठी तिला निकोलस मॅक्सिम पुरस्कारही देण्यात येणार आहे. सुदृढ व्यक्ती एका हाताने लिहू शकते. मात्र साराने दोन्ही हातांनी लिहिण्याचं कौशल्य आत्मसात केलं आहे. सारा याच वर्षी वेगळ्या पद्धतीने लेखन करण्याची कला शिकली. विशेष म्हणजे सारा निकोलस मॅक्सिम



पुरस्कार जिंकणारी शाळेतली पहिलीच विद्यार्थिनी असल्याचं मुख्याध्यापिका कॅथी स्मिथ सांगतात. हाताचे पंजे नसल्याचा विचार आपल्या मनाला शिवतही नसल्याचं साराचं म्हणणं आहे. आपल्यात काही तरी व्यंग आहे, असा विचार करण्यात काहीच अर्थ नसतो असं ती सांगते. अशी ही सुंदर हस्ताक्षर असलेली सारा मेरीलँडमध्ये

## अडीच हजार वर्षांपूर्वीची ममी

इजिप्त हा देश ममींसाठी प्रसिद्ध आहे. इजिप्तची राजधानी कैरोपासून १६५ मैल लांब असलेल्या अल घोरिफा इथल्या एका कब्रस्थानात अडीच हजार वर्षांपूर्वीची ममी सापडली आहे. यासोबतच बऱ्याच पुरातन वस्तूही सापडल्या आहेत. या वस्तू बघून पुरातत्त्व विभागातल्या लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. विशेष म्हणजे या संशोधनाचं थेट प्रसारणही करण्यात आलं. जॉस गेट्स आणि जाही हवास यांनी हे संशोधन केलं असून 'डिस्कव्हरी' वाहिनीवर ही सर्व प्रक्रिया थेट प्रसारित करण्यात आली. 'एक्सपिडिशन अननोन : इजिप्त लाईव्ह' असं या कार्यक्रमाचं नाव होतं. ही ममी सोन्यामध्ये मढवली होती. यासोबतच इतर दोन ममीही सापडल्या आहेत. एका कुटुंबाला इथे दफन करण्यात आल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. इथे चार ते पाच काचेच्या बाटल्या, कुत्र्याची हाडं, जुन्या काळातल्या खेळाची सामुग्री अशा काही वस्तू सापडल्या आहेत. या ममींवर काही संदेशही लिहिण्यात आले असून त्यावरून काही अंदाज बांधले जात आहेत. या ममींच्या शोधामुळे काही ऐतिहासिक घटनांबाबत माहिती मिळेल, अशी अपेक्षा आहे.



## म्हणून ते खातात स्वत:च्याच पिलांना

काही पक्षी आणि प्राणी आपल्याच पिलांना खाऊन टाकतात. यामागची नेमकी कारणं शोधण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न होता. आता त्यांना यात यश आलं आहे. ऑक्सफर्डच्या शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार जास्त झाली आहेत. भूक लागल्यावर प्राणी, पक्षी पिलांना खातात, असा शोध लावण्यात आला होता. मात्र आता याच्या कारणांवर अधिक प्रकाश टाकण्यात आला आहे.



प्रमाणात पिलांचा जन्म झाला तर भविष्यात त्यांना खाणं उपलब्ध करून देता येणार नाही हा विचार करून सजीव काही पिलांना खाऊन टाकतात. ससा, मासा, कोंबड्या आपल्याच पिलांना खातात. बोकाही आपल्या पिलांना खात असल्याचं ऐकीवात आहे. अनेकदा संकटकाळात पक्षी, प्राणी पिलांना खातात. पाण्यात ऑक्सिजनची कमतरता निर्माण झाली तर नर डेमसेलफिश आपल्या पिलांना खाऊन टाकतो. याआधीही याबाबत संशोधनं अमेरिकेतल्या टेनिसी विद्यापीठानेही याबाबत संशोधन केलं. या संशोधनासाठी शास्त्रज्ञांनी अंड्यातून पिलं बाहेर येईपर्यंतच्या प्रक्रियेची चाचणी केली. आपल्या इतर पिलांना वाचवण्यासाठी पक्षी, प्राणी काही पिलांचा त्याग करतात. काहींना दूर सोडून येतात. पिलांच्या वाढत्या संख्येमुळे त्यांना त्यांची नीट काळजी घेता येत नाही. त्यामुळे पिलं खाण्याचा पर्याय निवडला जातो.

## आईसारखं दिसायचंय!



बँकॉकमध्ये सध्या आई आणि मुलाची जोडी चांगलीच चर्चेत आहे. याचं कारण हा मुलगा आईसारखं दिसण्यासाठी तिच्यासारखेच कपडे घालतो. या दोघांचे एकत्रित फोटो चांगलेच व्हायरल झाले आहेत. त्यांचं एकत्रित इंस्टाग्राम खातंही आहे. त्यावर एक लाख २८ हजारपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. आईचं नाव ली तर मुलाचं नाव पेप्पी आहे. हे दोघं एकमेकांसाठी सारखेच कपडे खरेदी करतात. म्हणजे एकाच वेळी एकाच पद्धतीच्या कपड्यांच्या दोन जोड्या खरेदी केल्या जातात. लहानपणापासूनच पेप्पीला आईसारखं दिसायचं होतं. तरुणपणी आपलं हे स्वप्न पूर्ण झाल्याचं तो सांगतो. ली आणि पेप्पी मीडियाशी फार बोलत नाहीत. या दोघांनी नुकतीच पहिली मुलाखत दिली. इंस्टाग्रामवर अकाउंट सुरू केल्यानंतर आपण सारखे कपडे घालायला सुरूवात केल्याचं पेप्पी सांगतो. आईसारखं दिसण्याची कल्पना पेप्पीची होती. आईचे फॅशनेबल कपडे त्याला खूप आवडायचे. लहानपणी तो आईसारखं वागायचा, राहण्याचा प्रयत्न करत असे. हे दोघं फोटो शूट करून घेतात. त्यांच्या घरातच फोटो शूटचं आयोजन केलं जातं. घरातले नोकरचाकर त्यांचे फोटो काढतात. फोटो काढण्यासाठी आपण फार काही करत नसल्याचं पेप्पीचं म्हणणं आहे. आपण फार भपकेबाजी करण्याच्या फंदात पडत नसल्याचं तो सांगतो.

# विरोधात गेल्यास पक्षाचे दरवाजे कायमचे बंद

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा बंडखोरांना इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
या निवडणुकीत भाजपातही बंडखोरी झाली. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरूद्ध नाराजांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. अशा सर्व नाराजांची समजूत काढत अर्ज मागे घेण्यास सांगितले आहे. पक्षातील निष्ठावंत अर्ज मागे घेतील. पक्षाच्या विरोधात जावू नका, अन्यथा पक्षाचे दरवाजे कायमचे बंद होतील, असा इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे माध्यमांशी बोलताना दिला.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्रातील लाडकी बहीण, शेतकऱ्यांची वीज बिलमाफी या योजना चुकीच्या असून त्या सरकारला दिवाळखोरीकडे नेतील, असे विधान करून आपला महिला व शेतकरी विरोधी आकस उघड केला.

इतकेच नव्हे, लाडकी बहीण योजनेविरुद्ध कारस्थानही जनतेसमोर आले, असा आरोप बावनकुळे यांनी केला. काँग्रेसचे कारस्थान आम्ही हाणून पाडू. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणी आणि भाऊ त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही, असेही ते म्हणाले.



काँग्रेसने कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशमधील महिलांसाठी सुरू असलेल्या योजना बंद पाडल्या किंवा जाहीर करून त्या पूर्ण केलेल्या नाहीत. काँग्रेसने मतदारांची फसवणूक केली. महाविकास आघाडीचे नेते भाऊबीजेच्या दिवशी महिलांचा अपमान करीत असून, संजय राऊत याचे विधान महिलांचा अपमान करणारे आहे. महिलांचा अपमान करणाऱ्यांना महिलांनी चप्पल दाखविली पाहिजे, महिलांचा अपमान लाडक्या बहिणी कदापीही सहन करणार नाहीत. त्यांना निवडणुकीच्या माध्यमातून धडा शिकवतील, असेही बावनकुळे म्हणाले.

राहुल गांधी यांनी अमेरिकेत जावून भारतातील एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण संपविण्याची भाषा केली आहे. नाना पटोले हे त्यांचे समर्थन करतात. देशाला आरक्षणाची गरज नाही असे म्हणणाऱ्या राहूल गांधी यांना आम्ही जाब विचारू. मागासवर्गीयांची मते घेण्यासाठी राहुल गांधी नागपुरात येत असून त्यांचा खोटारडेपणा आम्ही खोडून काढणार आहोत.

आव्हाड विकासाबद्दल बोलू शकत नाही. अडीच वर्षे जुन्या घटनांवर बोलून सहानभुती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. गोपाळ शेट्टी यांचे संपूर्ण आयुष्य भाजपामध्ये गेले. ते उद्यापर्यंत निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या विकासाला साथ देतील. दादाराव केचे यांचे आभार मानतो, असेही ते म्हणाले.

# रश्मी शुक्ला भाजपसाठीच काम करत होत्या

## आघाडीचा हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४:
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.



निवडणूक आयोगाचा रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. पण झारखंड व पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर लगेचच तेथील पोलिस महासंचालकांची बदली झाली होती. पण रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात एवढा विलंब का लागला? हा प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहे, असे ते म्हणालेत.

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यावर फोन टॅपिंगचे गंभीर आरोप होते. त्यामुळे काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांची पोलिस महासंचालक पदावरून हटवण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज सोमवारी निवडणूक आयोगाने त्यांच्या बदलीचे आदेश जारी केलेत.

पटोले म्हणाले, मी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे स्वागत करतो. झारखंड व पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतरच लगेचच तेथील पोलिस महासंचालकांची बदली करण्यात आली होती. पण रश्मी शुक्ला यांची बदली करण्यासाठी एवढा विलंब का लागला? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. यापुढे निवडणुकीच्या कोणत्याही कामात त्यांचा हस्तक्षेप राहणार नाही याची काळजी निवडणूक आयोगाने घ्यावी.

रश्मी शुक्ला या स्पष्टपणे भाजपसाठीच काम करत होत्या. त्या विरोधकांचे फोन टॅप करत होत्या. त्यांच्यावर गुन्हा दाखल आहे. राज्य सरकारने स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी त्यांना या पदावर बसवले होते. आम्ही निवडणूक आयोगाने यासंबंधी एकदा नव्हे तर तिनदा तक्रार केली होती. त्यानंतरही सरकारने त्यांना दोन वर्षांची अवैध मुदतवाढ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचा दबाव असल्यामुळेच असे करण्यात आले.

**रश्मी शुक्लांना मुदतवाढ देण्याची कोणती मजबुरी होती? -वडेट्टीवार**

विजय वडेट्टीवार यांनीही निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. महायुतीचे सरकार बेईमानी करत होते हे आज स्पष्ट झाले. गंभीर स्वरूपाचे आरोप असलेल्या पोलिस अधिकारी रश्मी शुक्ला यांना मुदतवाढ देण्याची अशी कोणती मजबुरी महायुती सरकारची होती? असा सवाल त्यांनी केला.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक पारदर्शक पद्धतीने होऊ नये म्हणून त्यांना सरकारने त्यांना मुदतवाढ दिली होती. मर्जीतील अधिकाऱ्यांना मुदतवाढ देऊन सत्तेचा दुरुपयोग महायुती सरकारने केला होता, असे वडेट्टीवार म्हणाले.

अंबादास दानवे यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. रश्मी शुक्ला यांनी निवडणुकीच्या तोंडावर केलेल्या बदल्या तत्काळ रद्द करावी, शुक्ला यांना निवडणुकीशी निगडित कोणत्याही कामात ठेवू नये, तसेच निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी केलेल्या बदल्यांचा पुनर्विचार होऊन त्या रद्द करण्यात याव्यात, असे ते म्हणालेत.

# सात बंडखोर मैदानात

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ४:
उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक बंडखोरांनी आपल्या तलवारी म्यान केल्या. परंतु, बडनेरा, अमरावती, अचलपूर, दर्यापूर, मोर्शी मतदारसंघांमधील सात बंडखोर निवडणुकीच्या रणांगणात कायम आहेत.

जिल्ह्यातील बंडखोर उमेदवारांची समजूत काढण्याचे मोठे आव्हान महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांसमोर होते. वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या बंडखोर उमेदवारांना शांत करण्याचा सवोतोपरी प्रयत्न केला. यात काही ठिकाणी यश आले, पण अनेक उमेदवार बंडखोरीच्या निर्णयावर ठाम राहिले.

अचलपूर मतदारसंघातून भाजपचे बंडखोर उमेदवार नंदकिशोर वासनकर, अक्षरा लहाने यांच्यासह ८ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले, त्यामुळे आता या ठिकाणी २२ उमेदवार रिंगणात आहेत. तरीही भाजपसमोरील संकट पूर्णपणे टळू शकले नाही. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आणि बंडखोर उमेदवार ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांनी लढत देण्याचा निर्णय घेतला आहे.

मेळघाटमधील भाजपचे बंडखोर उमेदवार माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्यासह ९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. मात्र भाजपच्या अन्य बंडखोर उमेदवार ज्योती सोळंके यांनी माघार न घेतल्याने भाजपसमोरील अडचणी कायम आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मन्ना दारसिंबे यांनी उमेदवारी मागे घेतला आहे.

अमरावतीत ७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. मात्र भाजपचे बंडखोर उमेदवार माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता हे लढतीत कायम आहेत. बडनेरा मतदार संघात महायुती आणि आघाडीमध्ये बंडखोरी झाली आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर तुषार भारतीय आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड लढतीत कायम आहेत. दर्यापूरमध्ये महायुतीतील फूट कायम आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर आमदार रमेश बुंदिले युवा स्वाभिमान पक्षातर्फे लढत आहेत.

## जरांगेंच्या लढ्याला पाठिंबा - राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:
मराठा आंदोलनक मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यांच्या या निर्णयावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सर्वात आधी प्रतिक्रिया दिली आहे. जरांगेचा संघर्ष समाजासाठी आहे. समाज त्यांच्या पाठिशी आहे. त्यांच्या लढ्याला आमचा पाठिंबा आह, असं संजय राऊत म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांचा सातत्याने महाराष्ट्रात जो संघर्ष सुरू आहे, तो त्यांच्या समाजाच्या विकासासाठी, उद्धारासाठी आहे. आणि त्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली, हे मान्य केलं पाहिजे. समाज त्यांच्या पाठिशी एकसंघपणे उभा आहे.

निवडणुकीसंदर्भात काय भूमिका घ्यावी हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांचा जो लढा आहे तो राजकीय नव्हे, सामाजिक आहे अस आम्ही मानतो. ती एक सामाजिक चळवळ आहे. त्यामुळे जरांगे यांनी काय आणि कशी भूमिका घ्यावी, याचं मार्गदर्शन आम्ही करणार नाही. त्यांच्या लढ्याला आमच्या कायम शुभेच्छा आणि पाठबळ असेल, असं राऊत म्हणाले.

मुस्लीम आणि दलित समाजाच्या प्रतिनिधींकडून यादी न आल्याने आपण लढणार नाही, असं जरांगे यांनी सांगितलं. आमच्या मित्र पक्षाची आणखी यादी आली नाही. लढायचं जमेल का? यादीच नाही म्हणल्यावर एका जातीवर कस निवडून यायचं, त्यामुळे नाईलाज आहे. यादी न आल्यामुळे नाईलाजाने एका जातीवर जिंकणे शक्य नाही त्यामुळे थांबून घेतलेलं बरं राहीन, असं मनोज जरांगे म्हणाले होते.

23 तारखेला ॲटम बॉम्ब कशाला पाहिजे अणू बॉम्ब फुटू दे ना ! ॲटम बॉम्ब फुटेल म्हणजे काय करणार ? अजून काय करणार? मोदी त्यांच्या गटात प्रवेश करणार आहेत का? असा टोला त्यांनी शिंदे यांना हाणला.

# आयोगाचा चांगला निर्णय

## रश्मी शुक्लांच्या बदलीवर शरद पवारांची प्रतिक्रिया

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४:
पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली.

यांप्रकरणावर आता राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय योग्य आहे. त्यांचा कालखंड संपलेला आहे. निवडणूक आयोगाने चांगला निर्णय घेतला. आता त्या कोणत्याही पदावर असू नये, असे शरद पवार म्हणाले.



मनोज जरांगे पाटील यांनी उमेदवार उभे केले असते तर त्याचा फायदा भाजपला झाला असता, असे शरद पवार म्हणाले.

**७ नोव्हेंबरपासून दोन दिवस विदर्भ दौऱ्यावर**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी शरद पवार दोन दिवसाच्या विदर्भ दौऱ्यावर येत आहेत. ७ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता पूर्व नागपूर, दुपारी २.३० वाजता तिरोडा येथे सभा घेतील. 8 नोव्हेंबर सकाळी 11 ला हिंगणघाट व दुपारी 3 वाजता जिंतूर तसेच सायंकाळी 7 वाजता वसमत येथे सभा घेणार आहेत.

# आव्हाड - मिटकरी वाद पुन्हा पेटला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:
आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका जाहीर सभेला संबोधित करताना अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले. अजित पवारांचा गट ही पाकिटमारांची टोळी असल्याचं आव्हाड म्हणाले होते.

यावर आता अजित पवार गटाचे अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, खालच्या भाषेत बोलण्याची जितेंद्र आव्हाडाची संस्कृती आहे. विंचवाची नांगी तैसें दुर्जन सर्वांगी, या अभंगा'तील ओळीप्रमाणे हा (जितेंद्र आव्हाड) दुर्जन व्यक्ती आहे. त्याच्या नसानसांमध्ये विष भरलं आहे. आव्हाड याला आता त्याच भाषेत उत्तर दिलं पाहिजे, अशा शब्दात मिटकरी यांनी रोष व्यक्त केला.

## आज मंगळवारी उघडणार सॅजिलिटी इंडिया लिमिटेडचा आयपीओ

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ४:
सॅजिलिटी इंडिया लिमिटेडने प्रति इक्विटी समभाग २८ ते ३० बँड निश्चित केला आहे. हा प्रस्ताव १० चे दर्शनी मूल्य असलेल्या समभागांचा आहे. कंपनीचा आयपीओ मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४ रोजी उघडणार असून गुरुवार, ७ नोव्हेंबर रोजी बंद होईल.

गुंतवणूकदारांना किमान ५०० इक्विटी समभागांसाठी आणि त्यानंतर ५०० समभागांच्या गुणाकारात बोली लावता येईल. ही आयपीओ विक्री पूर्णतः ऑफर फॉर सेलच्या स्वरूपात आहे. पात्र कर्मचाऱ्यांसाठी दोन रुपयांची सूट देखील आहे. सॅजिलिटी इंडिया लिमिटेड हे आरोग्य सेवा केंद्रीत सेवा पुरवणारे आहे, ज्यांचे क्लायंट मुख्यतः यू.एस. आरोग्य विमा कंपन्या (पेयर्स) आणि हॉस्पिटल्स, डॉक्टर, आणि डायग्नॉस्टिक कंपन्या (प्रोव्हायडर्स) आहेत.

## वंचितचे डॉ. झिशान यांची माघार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ४:
अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या मतदारसंघात वंचितने काँग्रेसचे युवा नेते तथा महापालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते डॉ. झिशान हुसेन यांना ऐनवेळी उमेदवारी दिली होती. मात्र, आज त्यांनी माघार घेतली. काँग्रेसने अकोला पश्चिम मतदारसंघातून महापालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते साजिद खान पठाण यांच्यावरच विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी दिली.



गंभीर गुन्ह्यांमध्ये पठाण यांचे नाव असल्याने त्यांच्या उमेदवारीबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. डॉ. झिशान यांनी माघार घेतल्याने काँग्रेसचा मार्ग मोकळा झाल्याचे बोलले जात आहे.

# विवेक फणसाळकर यांच्याकडे महासंचालक पदाचा अतिरिक्त पदभार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:
निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलिस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. ते पुढील आदेश येईपर्यंत या पदाचा कारभार पाहतील.



निवडणूक आयोगाने सोमवारी सकाळी काँग्रेस व इतर पक्षांच्या तक्रारींवर कारवाई करत महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तत्काळ प्रभावाने बदली करण्याचे आदेश दिले होते. तसेच राज्याच्या मुख्य सचिवांना रश्मी शुक्ला यांचा पदभार तत्काळ सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, रश्मी शुक्ला यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची बदली केल्यानंतर त्यांच्या जागी नियुक्ती करण्यासाठी सेवाज्येष्ठतेनुसार 3 अधिकाऱ्यांची नावे मागितली आहेत. ही नावे मुख्य सचिवांना 5 नोव्हेंबर रोजी दुपारी 1 वाजेपर्यंत द्यावयाची आहेत. सरकार मुख्य सचिव यासंबंधी कोणत्या अधिकाऱ्यांची शिफारस करणार? हे कळले नाही. पण पोलिस महासंचालक पदाच्या शर्यतीत संजय वर्मा (डीजी कायदा व तंत्रज्ञान), रितेश कुमार (डीजी होमगार्ड) व संजीवकुमार सिंघल (डीजी एसीबी) हे 3 अधिकारी असल्याची माहिती आहे. पण त्याची पुष्टी झाली नाही.

विवेक फणसाळकर हे भारतीय पोलिस सेवेच्या 1989 च्या बॅचचे अधिकारी आहेत. ते सध्या मुंबईचे पोलिस आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. फणसाळकर हे पोलिस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत. ते मुंबई पोलिस दलातील 50 हजार पोलिसांचे नेतृत्व करतात.

## १८७ कोटींची मालमत्ता ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४:
विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता काळात राज्यात विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत आतापर्यंत सुमारे १८७ कोटी रुपयांची मालमत्ता ताब्यात घेण्यात आल्याची माहिती राज्य निवडणूक विभागाचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

राज्यात स्थिर व फिरते पथक मिळून सुमारे पाच हजार पथके कार्यरत आहेत. शिवाय पोलिस, दारू, उत्पादनशुल्क विभाग व इतर विभागांनी ही कारवाई केली आहे. राज्यात सी-विजील ॲपवर १६४८ आचारसंहिता भंगाच्या तक्रारी आल्या असून, पैकी १ हजार ६४६ तक्रारींवर १०० मिनिटांच्या आत कारवाई झाल्याचेही त्यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीत हजार पुरुषांमागे ९३६ स्त्री मतदार आहेत. तृतीय पंथीय मतदारांनी या निवडणुकीत मतदान करून मुख्य प्रवाहात येणे गरजेचे आहे. काही देशांत शासन निवडण्याचा अधिकार जनतेला नाही. येथे मतदानाचा अधिकार लोक बजावत नाहीत, हे दुर्दैव असल्याचे ते म्हणाले.

पान १ वरून...

## बस दरीत कोसळली...



ही बस गढवाल मोटर्स ओनर्स युनियन लिमिटेडची असल्याचे पोलिसांनी सांगितले. बसची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

## रश्मी शुक्ला यांची बदली...

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांची पोलिस महासंचालक पदावरून हटवण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज सोमवारी निवडणूक आयोगाने त्यांच्या बदलीचे आदेश जारी केलेत.

निवडणूक आयोगाने काँग्रेस व इतर पक्षांच्या तक्रारींवर कारवाई करत महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तत्काळ प्रभावाने बदली करण्याचे आदेश दिलेत. आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना रश्मी शुक्ला यांचा पदभार तत्काळ सेवाज्येष्ठतेनुसार वरिष्ठ आयपीएस अधिका?याकडे सोपवण्याचे निर्देश दिलेत. एवढेच नाही तर पोलिस महासंचालकपदी नव्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी 5 नोव्हेंबर रोजी दुपारी 1 वाजेपर्यंत 3 आयपीएस अधिकाऱ्यांचे एक पॅनेल पाठवण्याची सूचनाही मुख्य सचिवांना करण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी यापूर्वीच आपल्या आढावा बैठका व राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या घोषणेवेळी अधिकाऱ्यांना निवडणूक केवळ निष्पक्ष व तटस्थपणेच नव्हे तर आपल्या कर्तव्याचे पालन करतानाही योग्य व्यवहार करण्याचा इशारा दिला होता, असे वृत्तसंस्थेने सूत्रांचा दाखला देत म्हटले होते. उल्लेखनीय बाब म्हणजे महाविकास आघाडीने विशेषतः काँग्रेसने विधानसभा निवडणुकीपूर्वी रश्मी शुक्ला यांची बदली करण्याची मागणी केली होती.

## यवतमाळ जिल्ह्यात ७७ जणांची माघार

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ४:
जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघात ७७ उमदेवारांनी नामांकन अर्ज मागे घेतल्याने आता निवडणूक रिंगणात १०२ उमेदवार आहेत. यवतमाळ, पुसद, आर्णी येथील महाविकास आघाडी आणि महायुतीतील बंडखोरांनी अर्ज मागे घेतले. मात्र वणी व उमरखेड येथे बंडखोरी रोखण्यात महाविकास आघाडीला अपयश आले.

यवतमाळ, दिग्रस, पुसद, उमरखेड, आर्णी, राळेगाव व वणी या सात मतदारसंघात १७९ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. आज नामांकन परत घेण्याच्या अखेरच्या दिवशी यापैकी ७७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. यवतमाळ मतदारसंघात १३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने आता २२ उमेदवार रिंगणात आहेत. वणी मतदारसंघात चार उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. येथे आता १२ उमेदवार रिंगणात आहेत.

राळेगावमध्ये सात जणांनी माघार घेतल्याने ११ जण निवडणूक लढवित आहेत. दिग्रसमध्ये चार जणांनी माघार घेतली. येथे १३ उमेदवार रिंगणात आहेत. आर्णीमध्ये सात उमदेवारांनी माघार घेतल्याने १४ उमेदवारांमध्ये लढत होईल. पुसदमध्ये १७ उमेदवारांनी माघार घेतली.

# सदा सरवणकर लढणारच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :
सदा सरवणकर यांनी आज सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांची भेट घेण्यास सांगितले होते. त्यानुसार सदा सरवणकर यांचे सुपुत्र समाधान सरवणकर आणि सहकारी राज ठाकरे यांची भेट घेण्यासाठी शिवतीर्थावर गेले होते. मात्र, राज ठाकरे यांनी त्यांची भेट घेण्यास नकार दिला. त्यामुळे सदा सरवणकर यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.










महासागर वृत्तसागर
नागपूर
■ मंगळवार, दि. ५, नोव्हेंबर २०२४ ■

# स्वीमिंग पूलमध्ये बुडून तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

स्वीमिंग पूलमध्ये पोहोताना अचानक फिट आल्याने तरुण पाण्यात बुडाला. घटनास्थळी उपस्थित लोकांनी त्याला बाहेर काढून रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. ही घटना सिव्हील लाईन्स परिसरात व्हीसीए स्टेडियमसमोरील स्वीमिंग पूलमध्ये घडली. अमित प्रदीप बॅनर्जी (28) रा. चैतन्यनगर, वाठोडा, असे मृताचे नाव आहे.

अमित हा आर्किटेक्ट होता. त्याचे आई-वडील रेल्वेत नोकरीला आहेत. त्याला फिट येण्याचा आजार होता. सकाळी 8 वाजताच्या सुमारास अमित व्हीसीए स्टेडियमजवळील रेल्वेच्या स्वीमिंग पूलमध्ये पोहायला गेला होता. पाण्यात उतरून पोहोत असताना अचानक त्याला फिट आली. तो बेशुद्ध होऊन पाण्यात बुडाला. स्वीमिंग पूल बाहेर उपस्थित लोकांचे त्याच्याकडे लक्ष गेले. कोणतीही हालचाल दिसत नसल्याने लोकांना संशय आला. काही लोकांनी तत्काळ पूलमध्ये उडी घेत त्याला बाहेर काढले. उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून अमितला मृत घोषित केले. या प्रकरणी सदर पोलिसांनी अमितचा मोठा भाऊ भानूप्रतापच्या सूचनेवरून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या घटनेने बॅनर्जी कुटुंबाला मोठा मानसिक आघात बसला आहे.

# परिवर्तन महाशक्ती पक्षाचे १२१ उमेदवार विधानसभेसाठी लढणार : बच्चु कडू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

महाराष्ट्राचे विधानसभा निवडणुकांमध्ये परिवर्तन पक्षाच्या 121 उमेदवार महाराष्ट्रातून लढणार असून पश्चिम महाराष्ट्रात अनेक सिटावर दावा केला असून विदर्भातही मोठ्या प्रमाणावर परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार निवडून येतील अशी माहिती प्रेस पत्रकार क्लब नागपूर येथे पत्रकारांशी बोलतांना माजी खासदार राजू शेट्टी यांनी सांगितले




नऊ पक्षाचे सहभागातून एकत्र येऊन परिवर्तन महासक्ती पक्ष निर्माण झाला आहे. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग अशा विविध समस्यांना सामोरं घेऊ निवडणूक लढणार असल्याचे मत स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्राचे राजकीय संस्कृती देखील खूप मोठे बदल झाले असून दर महिन्याला 12शेतकरी आत्महत्या करत आहेत, असे मत माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

कामगार, मजदूर यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असून आरोग्य सेवक यांची स्थिती सुद्धा गंभीर झालेली असून कंत्राटी पद्धतीने विविध विभागात नोकर भरती प्रक्रिया शासन राबवित आहे. 3 हजार ३०० विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप स्थगित आहे. त्यावेळी पत्रकार परिषदेत उपस्थित प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू, स्वराज्य पक्षाचे संभाजी राजे भोसले आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, वामनराव चटप यांची उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांच्यासह अनेक समविचारी नेत्यांची नागपूर येथे एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीतच 121 उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. परिवर्तन महाशक्तीमध्ये चांगल्या पार्श्वभुमीचे नेते एकत्र आले आहेत.

# पिस्तूलासह व्हीडीओ व्हायरल करणे भोवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

एका युवकाने समाजमाध्यमावर पिस्तूलासह स्वतःचा व्हीडीओ व्हायरल केला. हा व्हीडिओ अजनी ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीनचंद्र राजकुमार यांच्यापर्यंत पोहोचला. त्यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली. तत्काळ व्हीडीओ टाकणा्याचा शोध घेण्याचे निर्देश दिले. तरुणाला ठाण्यात आणून चौकशी केली असता ती पिस्तूल नसून फटाके फोडण्याची बंदूक असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, या घटनेतून अजनी पोलिस सतर्क असल्याचे दिसून आले.

दिवाळीनिमित्त फटाके फोडणारी व खेळण्यातील बंदूक मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. अलिकडे खेळण्यातील तसेच फटाके फोडण्यासाठी असलेल्या बंदूकांची बनावट खऱ्या पिस्तूलासारखी असल्याने त्यांना प्रचंड मागणी आहे. अजनी ठाण्यांतर्गत राहणाऱ्या 23 वर्षीय युवकाच्या मित्राने दिवाळीनिमित्त फटाके फोडण्यासाठी दिल्लीहून खेळण्यातील बंदूक मागवली होती. ती बंदूक हाती घेवून गंमत म्हणून तरुणाने पाच सेकंदाचा व्हीडीओ तयार करून समाजमाध्यमांवर प्रसारित केला. त्यावर अनेकांच्या प्रतिक्रिया आल्या. विविधप्रकारच्या प्रतिक्रिया येत असल्याने युवक घाबरला, त्याने 24 तासांच्या आत तो व्हीडीओ डिलीट केला. मात्र तोपर्यंत या व्हीडीओची लिंक अजनी पोलिसांपर्यंत पोहोचली होती. वपोनि नितीनचंद्र राजकुमार यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली. लगेच एक पथक तयार करून व्हीडीओ टाकणाऱ्याचा शोध घेण्याचे निर्देश दिले. पथकाने काही तासातच युवकाचा शोध घेतला. त्याला घरूनच ताब्यात घेत ठाण्यात आणले. त्याची सखोल चौकशी केली असता ती खेळण्यातील फटाके फोडणारी बंदूक असल्याचे आणि त्याने गंमत म्हणून व्हीडीओ प्रसारीत केल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी त्याला 168 अन्वये नोटीस बजावून सोडले आहे.

# ७ अवैध दारू विक्रेत्यांवर धाड

**नागपूर :** विधानसभा निवडणुकी दरम्यान अवैध धंद्यांची लगाम कसण्यासाठी पोलिसांकडून धाडसत्र राबविण्यात येत आहे. गत 24 तासांमध्ये पोलिसांनी 7 अवैध दारू विक्रेत्यांवर धाड टाकून माल जप्त केला. कळमना पोलिसांनी आजरी-माजरीच्या देवीनगरात राहणाऱ्या संगीता संतोष वर्मा (40) या महिलेला देशी दारूसह पकडले. एमआयडीसी पोलिसांनी रमाबाई आंबेडकरनगर, जयताळा परिसरात राहणाऱ्या तुळसाबाई दुर्योधन धनविजय (60) हिच्यावर कारवाई केली. तहसील पोलिसांनी भानखेडा परिसरात धाड टाकून शिवकुमार गिरधारीलाल बहोरिया (44) याला मोहाच्या दारूसह पकडले. जुनी कामठी पोलिसांनी भिलगावच्या दोफन कुवर पटेल (34) आणि गौतमनगर कामठी येथील मनोज श्यामलाल बरसे (59) ला पकडून देशी दारू जप्त केली. वाडी पोलिसांनी सुराबर्डीत साहेबराम बाजीराव केवट (58) याच्याकडून माल जप्त केला. गिट्टीखदान पोलिसांनी गोरेवाडा वस्तीत धाड टाकून अरविंद उर्फ बंडू खेमराज कोथरे (57) याला दारूसह पकडले.

# वीज वितरण यंत्रणेजवळ कचरा जाळू नका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :



वीज वाहिन्या, वितरण रोहीत्र, फीडर पीलर किंवा वितरण पेट्यांजवळ कचरा जाळण्याच्या प्रकारामूळे वीजयंत्रणेला धोका निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांसोबतच विज वितरण कंपनीलाही नाहक मनः स्ताप सहन करावा लागत असल्याने वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू नये आणि त्यास जाळूही नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

प्रकाशोत्सावासाठी अनेकांच्या घरात झालेल्या साफसफाई सोबतच दिवाळिनिमित्त फोडलेल्या फटाक्यांचा कचरा साचल्याचे चित्र सर्वत्र आहे. यात न जळालेल्या फटाक्यांचा देखिल समावेश असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक ठिकाणी हा कचरा वीजवाहिन्या, फिडर पीलर, वितरण रोहीत्र, वितरण पेटी किंवा डी.पी. अशा वीज यंत्रणेजवळील उघडयावर असलेल्या जागेत टाकण्यात आला आहे.

वीज यंत्रणेजवळ साठवलेला हा कचरा पेटविल्याने किंवा इतर कारणामुळे कचरा जळाल्याने विजेच्या भूमिगत केबल व इतर वीजयंत्रणा आगीमुळे नादुरुस्त झाल्याच्या घटना यापुर्वी देखील घडल्या आहेत. पयार्याने संबंधीत परिसरातील वीजपुरवठाही खंडित झालेला आहे. सध्या दिवसाचे तापमानही अधिक असल्याने कच-यास आग लागण्याची शक्यता आहे.

वीजयंत्रणाही उन्हामुळे तापलेली असल्याने अशातच वीजवितरण यंत्रणेजळचे तापमान अश्या आगीमुळे वाढल्यास यंत्रणेलाही त्याचा फटका बसतो. उपरी वीजवाहिन्याखाली असलेल्या कच-याचे ढीग पेटल्यामुळे किंवा त्याला आग लागल्यामुळे वीजतारा वितळून वीज खंडित होण्याचा धोका अधिक असल्याने जिल्हयातील नागरिकांनी उघडयावर असलेल्या वीजयंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. फेकलेल्या कचरा पेटविल्याने वीजयंत्रणेला आग लागल्याचे आढळल्यास १९१२/१९१२०/१८००-२१२-३४३५/१८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर माहिती देण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

अज्ञात भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत एका महिलेचा गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मुक्ता विकास चोरे (50) रा. दीनदयालनगर, असे मृत महिलेचे नाव आहे. गत 30 ऑक्टोबरच्या सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास मुक्ता काही सामान घेण्यासाठी दुकानात जात होत्या. घरापासून काही अंतरावर जाताच भरधाव असलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. मुक्ता गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या डोक्याला जबर मार लागला. तत्काळ त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. उपचारादरम्यान मुक्ता यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी त्यांचे पती विकास यांच्या तक्रारीवरून कलमांमध्ये वाढ केली आहे. आसपासच्या परीसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज पाहून आरोपीचा शोध घेतला जात आहे.

# बापाने मुलावर गोळी झाडली, तरी न्यायालयाकडून हत्येचा गुन्हा रद्द

**नागपूर :** नागपूरमध्ये एका बापाने रागाच्या भरात आपल्या परवाना असलेल्या बंदूकीतून मुलाच्या पायावर गोळी झाडली. यात मुलगा गंभीररित्या जखमी झाला. याप्रकरणी सुनेने आपल्या सासऱ्यांविरोधात पोलिसात तक्रार केली. हत्येचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपास पूर्ण करत आरोपी वडिलांविरोधात आरोपपत्रही दाखल केले. मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले.

नागपूरच्या बेसा परिसरातील चिंतामणीनगर येथे ६९ वर्षीय वडील राहतात. त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा आणि सूनही राहते. वडील आणि मुलामध्ये एका विषयावरून जोरदार भांडण झाले. यानंतर वडिलांनी रागाच्या भरात त्यांच्याकडे असलेली परवानाधारक बंदूक बाहेर काढली आणि मुलाच्या पायावर गोळी झाडली. या घटनेत मुलगा गंभीररित्या जखमी झाला.

सुनेने या प्रकरणाची तक्रार पोलिसांकडे केली. अजनी पोलिसांनी याप्रकरणी भारतीय दंड संहितेचे कलम १०९ आणि शस्त्र कायद्याचे कलम २५ नुसार वडिलांविरोधात गुन्हा दाखल केला. उच्च न्यायालयात याप्रकरणी न्या.विनय जोशी आणि न्या.अभय मंत्री यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली.



नागपूर : उत्तर भारतीयांचा सण असलेल्या छट पुजेनिमित्त नागपूर येथील अंबाझरी तलावावर भाविकांची गर्दी उसळणार आहे. त्यानिमित्त संबंधित जागेची स्वच्छता करण्यात येत असुन या उत्सवाची जोरात तयारी सुरु आहे.

# आजपासून विकास ठाकरे यांची जन आशीर्वाद यात्रा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

पश्चिम नागपूरचे विद्यमान आमदार आणि नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस समितीचे अध्यक्ष विकास ठाकरे मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४ रोजी पश्चिम नागपूरमध्ये 'जन आशीर्वाद यात्रा' सुरू करणार आहेत. या यात्रेच्या माध्यमातून ठाकरे मतदारांचे पुन्हा आशीर्वाद मागणार आहेत, जेणेकरून पहिल्या कार्यकाळात त्यांनी सुरू केलेल्या पश्चिम नागपूरच्या सर्वांगीण विकासकामांना अधिक गती देता येईल. सकाळी ७:३० वाजता गिट्टीखदान येथून यात्रेची सुरुवात होईल, जिथे ठाकरे मतदारांशी संवाद साधून त्यांच्या आगामी योजना मांडतील. यात्रेचा दुसरा टप्पा संध्याकाळी ४:३० वाजता माकरधोकडा येथून सुरू होईल.




आपल्या कार्यकाळात ठाकरे, माजी महापौर, यांनी पश्चिम नागपूरमध्ये ऐतिहासिक प्रमाणात विकासकामे केली असून गेल्या पाच वर्षांत त्यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये, कठअकअ आघाडीचे उमेदवार म्हणून ठाकरे यांनी ५.१७ लाख मते मिळवली होती. ही मतदार संघातील न जिंकलेल्या उमेदवारासाठीची सर्वाधिक संख्या आहे.

त्याच जन आशीर्वाद यात्रा च्या माध्यमातून ठाकरे, जे नागपूर महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्षनेते देखील आहेत, आपले वचननामा प्रसिद्ध करणार आहेत, ज्यामध्ये पश्चिम नागपूरच्या विकासाला नवीन उंचीवर नेण्याचे त्यांचे संकल्प मांडले आहेत. ठाकरे तीन कार्यकाळासाठी नगरसेवक म्हणून सेवा देत होते. ते एनआयटीमध्ये विश्वस्त होते आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सेनेट सदस्य होते.

# गडकरींनी आधार दिला अन् आयुष्य उभे झाले!

* मनीष गवईचा २८ वर्षांचा संघर्ष
* डायस्टोनियामुळे उभेही राहता येत नव्हते

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

मनीष गवई नावाचा एक तरुण बालपणापासून डायस्टोनिया नावाच्या असाध्य आजाराने ग्रस्त असतो. शरीरामध्ये ससतच्या कंपनांमुळे साधे उभे राहणेही त्याला शक्य नसते. आजारावर उपचार करण्यासाठी कुटुंबाचे आर्थिक कंबरडे मोडले. अशात एक दिवस केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना मनीषच्या आजाराविषयी माहिती मिळते. ते बंगळुरू येथे मनीषच्या उपचाराची व्यवस्था करतात. आर्थिक पाठबळ मिळवून देतात. आज मनीष स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो. गडकरींच्या संवेदनशिलतेमुळे मनीषचे आयुष्य उभे झाले, अशी भावना त्याचे कुटुंबीय व्यक्त करतात.

दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी मनीष व त्याचे वडील सुरेश गवई नितीन गडकरी यांच्या भेटीला आले होते. त्यावेळी त्यांनी गडकरींप्रति कृतज्ञता व्यक्त केली. मनीष मूळचा मुर्तिजापूरचा रहिवासी. गेल्या २८ वर्षांपासून तो डायस्टोनिया या आजाराने ग्रस्त आहे. मेंदूतून पायाकडे जाणाऱ्या पेशींना रक्तपुरवठा थांबला, की हा आजार होतो. यामध्ये संपूर्ण शरीरात पूर्णवेळ कंपने येत असतात आणि उभे राहता येत नाही, मान स्थिर नसते आणि झोपही लागत नाही. मनीषनेही हा त्रास सहन केला. एवढा की रात्री झोप सुद्धा लागायची नाही. त्यामुळे मानसिक ताण वाढत गेला. दुसरीकडे वडील उपचारासाठी त्याला मुंबई, पुणे, बंगळुरूला घेऊन फिरायचे. वडीलही आर्थिकदृष्ट्या खचून



गेले. अशात एक दिवस मनीष आणि त्याच्या वडिलांनी नितीन गडकरींची भेट घेऊन आपली कैफियत मांडली. १२ वर्षे मुंबईत धिरुभाई अंबानी रुग्णालयातही उपचार घेऊन बघितला, पण उपयोग झाला नाही.

त्यानंतर बंगळुरूमधील राष्ट्रीय मानसिक स्वास्थ्य व स्नायू विज्ञान संस्थान (निमहान्स) येथे या आजारावर उपचार उपलब्ध आहे; पण त्यासाठी लावण्यात येणारे मशीन जवळपास पंधरा लाखांचे आहे, असे त्यांनी ना. नितीन गडकरींना सांगितले. गडकरींनी तातडीने उपचाराची सोय करून देण्याची सूचना आपल्या अधिकाऱ्यांना केली. त्यांनी आरोग्य मंत्र्यांसोबत पत्रव्यवहार केला. मनीषला उपचारासाठी आर्थिक सहकार्य मिळाले. सलग दहा महिने बंगळुरूमध्ये उपचार घेतल्यानंतर मनीषच्या डोक्यामध्ये एक मशीन लावण्यात आले. या मशीनची बॅटरी त्याच्या छातीमध्ये लावण्यात आली. २७ ऑक्टोबर २०२३ ला मनीषवर शस्त्रक्रिया करण्यात आली. महिन्याभराच्या आतच त्याला स्वतःच्या पायावर उभे राहता आले. शरीरातील कंपने जवळपास संपुष्टात आली.

त्याच्यावरील मानसिक ताण कमी झाला. पूर्वी अन्नाचा घास तोंडातून बाहेर पडून जायचा. आज तो व्यवस्थित जेवण करू शकतो. या सर्वांचे श्रेय मनीष व त्याचे वडील नितीन गडकरींना देतात. साहेबांनी वेळेवर मदत केली नसती तर कदाचित मनीष आयुष्यभर स्वतःच्या पायावर उभा राहू शकला नसता, अशी भावना त्याचे वडील सुरेश गवई व्यक्त करतात.

# धम्मज्योती बुध्दविहारात वर्षावास समाप्ती निमित्त शुक्रवारी महापरित्राण पाठ

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ४ :

दिनांक ८ नोव्हेंबरला शुक्रवारी सकाळी ८ वाजता वर्षवास समाप्ती निमित्त महा परीत्राणपाठ व संघदान कार्यक्रम धम्म ज्योती बुद्ध विहार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वार्ड रामटेक येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला भन्ते धम्मपाल महाथेरो,कोराडी यांना अष्टपरिहार दान करण्यात येणार आहे.



यावेळी विनोद राऊत, नितीन भैसारे,अशोक अंबादे, अरविंद सांगोडे,अतुल धमगाये,अमित अंबादे यांच्या हस्ते देण्यात येणार आहे तसेच भंते कल्याण मित्र रामटेक यांच्या हस्ते चिवर व पंच परिहार हे भंते धम्मपाल यांना धम्मदान करण्यात येणार आहे तसेच माताजी पुंडलिका,माताजी धम्म प्रिया, माताजी बोधी चिंता, माताजी सुमेधा, माताजी उपाली यांना सुद्धा धम्म दान देण्यात येणार आहे. त्या आधी महा परित्राणपाठ करण्यात येईल व नंतर भंते धम्मपाल धम्म देशना संबोधित करणार आहे. त्यानंतर साक्षोधन कडबे हे बौद्ध धम्म काळाची गरज या विषयावर धम्म देषणा देतील.तसेच डॉ.प्रदीप बोरकर हे सुध्दा धम्म देशना देतील.

भंते कल्याण मित्र यांना अष्टपरिहार उज्वला धमगाये, शोभा राऊत, कल्पना अंबादे, भाविका सांगोडे,मीना धमगाये यांच्या हस्ते धम्म दान करण्यात येणार आहे व त्यानंतर लगेच महा भोजनदानाचा कार्यक्रम सुरू होईल. तरी समस्त उपासक उपसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# रेकॉर्डवरील गुन्हेगारांची परेड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

येत्या विधानसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक कायम राहावा, यासाठी पोलीस वेगवेगळ्या प्रतिबंधात्मक उपाय योजना करीत आहेत. पोलीस उपायुक्त रश्मिता राव एन यांनी परीमंडळाच्या हद्दीतील रेकॉर्डवर असलेल्या सर्वच गुन्हेगारांची हुडकेश्वर पोलीस ठाण्यात परेड केली. कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न केल्यास खैर केली जाणार नाही, असा सज्जड दम गुन्हेगारांना दिला.



विधानसभा निवडणूक जाहीर झाली असून येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात कुठल्याही प्रकारचा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, या दृष्टीकोणातून पोलिसांनी प्रयत्न करणे सुरु केले आहे.

परिमंडळ क्रमांक ४ च्या पोलीस उपायुक्त रश्मिता राव एन. यांनी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास पाच पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेकॉर्डवरील ५२ गुन्हेगारांना हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या आवारात बोलावले. सर्व गुन्हेगारांना मैदानात बसवले आणि त्यांना कायदा-सुव्यवस्थे संदभार्तील आवश्यक सूचना दिल्या.

यात अजनी येथील १३, नंदनवन येथील १६, सक्करदरा येथील ७, वाठोडा २ आणि हुडकेश्वर येथील ४ गुन्हेगारांचा समावेश होता. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने परिमंडळातील रेकॉर्डवरील राजकीय गुंड, भू-माफिया, मकोकातून सुटलेले आरोपी, मध्यवर्ती कारागृहातून स्थानबद्धतेच्या आरोपातून (एम.पी.डी.ए रिलीज) सुटलेले आरोपी व हिस्ट्रिशिटर गुन्हेगारांचा या परेडमध्ये समावेश होता. गुन्हेगारांकडून सबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, अशी हमी घेण्यात आली. याकरिता कलम ६८ म.पो.का अन्वये त्यांना ताब्यात घेऊन पोलीस उपायुक्त रश्मिता राव यांनी त्यांचे समुपदेशन करून योग्य सूचना देत कलम ६९ म.पो.का अन्वये सोडण्यात आले.

पोलीस उपायुक्त रश्मिता राव यांनी झोन-चारचा पदभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम रेकॉर्ड वरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका लावला होता. प्रत्येक गुन्हेगारावर वॉच ठेवण्यात येत होता. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यावर अंकुश ठेवला होता.

## निधन

### जयवंत दिनकर पिंपळे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

आज रविवार दिनांक 03 नोव्हेंबर रोजी राहटे कॉलोनी निवासी तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेचं निवृत्त प्रबंधक जयवंत दिनकर पिंपळे यांचे वयाच्या 86 व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई आणि बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दोन दिवसीय मंडई महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ४ :

कन्हान शहरा पासुन काही अंतरावर असलेल्या वराडा गावात महात्मा फुले सांस्कृतिक मंडई समिती द्वारे दोन दिवसीय मंडई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवार (दि.२) नोव्हेंबर सायंकाळी गावात ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित केला. या संगीतमत कार्यक्रमात विविध प्रकारचे जुन्या पुराणे गीतांनी नागरिक मंत्रमुग्ध झाले. दुसऱ्या दिवशी रविवार (दि.३ नोव्हेंबर रोजी गावात दिवस भर खडी गम्मतीचा कार्यक्रम सुरू असतांना महिला - पुरुष , तरुण वर्ग सोबत मान्यवरांनी देखील मोठ्या संख्येत गर्दी करून कार्यक्रमाचा आनंद घेतला.



यावेळी गावात आकाश पाळणे, ब्रेक डांस, लहान मुलांचे खेळणे असल्याने नागरिकांनी दोन दिवसीय मंडई चा आनंद घेतला. या दोन दिवसीय मंडई महोत्सवाचा यशस्वितेकरिता गुरुदेव बोबडे, पंकज हेटे, आशिष बोबडे, सचिन हेटे, प्रणय गुरांदे, योगेश लंगडे, प्रज्वल हेटे, अक्षय फसाटे, अक्षय बोबडे, संदीप जांगडे, आकाश अंजनकर, हेमंत हेटे, अभय हेटे, नितीन हेटे, दीपक घाटोळे, अल्पेश हेटे, ओम हेटे, गणेश हेटे, उदय हेटे, नरेंद्र गुरादे, आशिष वन्हारकर, बंडू घाटोळे, अमोल नाकतोडे, राहुल खोब्रागडे, अमोर बोबडे, सह आदिंनी सहकार्य केले.

# प्रदूषणमुक्त दिवाळी संकल्पना हवेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

दिव्यांचा सण दिवाळीनिमित्त कोट्यवधी रूपयांची फटके उडवण्यात आले आहेत. त्यामुळे प्रदूषणमुक्त दिवाळी संकल्पनेला फटाके लागले. कर्णकर्कश आवाज व धुरामुळे आरोग्यासह पर्यावरणाला धोका निर्माण झाला असून प्रदुषणाची पातळी चांगलीच वाढली आहे. दिवाळीच्या आनंदोत्सवात आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी झाली. दिवाळीला आनंदोत्सव साजरा करताना कोट्यवधी रुपयांचे फटाके उडवण्यात आले. फटाक्यांविरुद्ध विविध स्तरावर मोहीम राबविण्यात येते. ही जनजागृती मोहीम थंडावल्याचे चित्र यावर्षी दिसून आले.

फटाक्यांमधून निळा, पिवळा, हिरवा, लाल, जांभळा रंग निघण्यासाठी अँल्यूमिनिअम, अँन्टमनी सल्फाईड, बेरियम नायटनेट, तसेच तांबे, शिसे, लिथियम, स्टनॅन्शयम, अर्सेनिक यासारख्या घटकाचा वापर केला जातो. फटाके फोडल्यानंतर निघणा?या धुरामुळे अनेक दुर्धर व्याधी होतात. गर्भात असलेली मुले व नवजात मुलांना तर हा अधिकच घातक. यासोबतच चार ते पाच दिवसांत मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्यामुळे अनेक किटक, किडे नाश पावतात. आग लागणे, मुले भाजण्याचे प्रकार घडतात. मात्र, याकडे दुर्लक्ष करून दिवाळीत फटाके फोडण्याचा मनमुराद आनंद नागरिकांनी लुटला. दिवाळीमध्ये मोठ्या आवाजात फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे पक्ष्यांना नुकसान पोहचते. त्यामुळेही फटाके कमी प्रमाणात फोडण्याचे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले होते. मात्र, त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही.

वसुबारसपासून सुरू झालेली आतषबाजी भाऊबीजेला रात्री उशिरापर्यंत सुरुच होती. काहींनी नियम डावलून रात्री उशिरापर्यंत फटाके फोडण्याचा आनंद घेतला. प्रकाशमय दिवाळी साजरी करताना आपण प्रदुषणाची काळी सावली तर गडद करत नाही ना, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. फटाके हे ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक डेसिबलचे आणि आरोग्यावर कायमस्वरूपी परिणाम करणारे आहेत. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या या फटाक्यांमुळे लहान बालके, रुग्ण, अबाल वृद्ध आणि पशु पक्षी यांच्यासह पर्यावरणालाही हानी पोहोचत आहे. मात्र, फटाके फोडण्याच्या स्पर्धेत याचा विचार होत नाही. आता फटाके फोडण्याची स्पर्धा रंगत असल्याने उत्सवाचे स्वरूप विद्रूप होत चालले आहे. फटाक्यांमुळे आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतात, हे माहीत असूनही मोठ्या आवाजात फटाके फोडण्यात येत आहेत. शहरासह ग्रामीण भागातही स्पर्धा दिसून येते.

दिवाळीतील फटाक्यांचा आवाज रक्तदाब वाढवू शकतो. कायमचे बहिरेपण ही येऊ शकते. सुतळी बॉम्ब किंवा पोपटबॉम्ब सारखे फटाके १२० डेसिबल आवाजाची मयार्दा ओलांडतात. ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियमांनुसार फटाक्यांना आवाजाची मयार्दा ९० डेसिबल इतकी घालून देण्यात आली आहे. शांतता क्षेत्रात आवाजाची मयार्दा ५० डेसिबल आहे. मात्र, शांतता क्षेत्रातील आवाजाची पातळी सर्रास ओलांडली जाते. आकाशात फुटणाऱ्या फटाक्यांची उंची राहत असल्याने, इमारतीत वरच्या मजल्यांवर राहणाऱ्या रहिवाशांना मोठा आवाज सहन करावा लागतो.

## गोंडवाना एक्सप्रेस मधील प्रवाशाचा बॅग केली परत

नागपूर : 30 ऑक्टोबर 2024 रोजी आरपीएफ पोस्ट बैतूलला माहिती मिळाली की गोडवाना एक्सप्रेस (गाडी क्रमांक 12409) च्या अ/2 डब्यातील बर्थ क्रमांक 20, 21 वर प्रवाशाचा एक पाठीवरचा बॅग विसरला आहे ज्यात एक लॅपटॉप व इतर साहित्य होते. प्रधान आरक्षक पूरन सिंह सल्लाम यांनी ही माहिती दिली.

सदर ट्रेन घोडाडोंगरी स्टेशनवर 16:40 वाजता पोहोचल्यावर प्रधान आरक्षक आर.के. शर्मा यांनी तात्काळ बॅग ट्रेनमधून उतरवून आरपीएफ बाह्य चौकी घोडाडोंगरी येथे आणली. प्रवासी श्री रामेश्वर लोनारे यांना त्यांचे मोबाइलवर सूचित केले. 40 वर्षीय श्री लोनारे, रहिवासी वॉर्ड क्रमांक 52 आदर्श नगर, दुर्ग, छत्तीसगड, हे दुर्ग ते बैतूल प्रवास करत असताना त्यांचा बॅग गाडीत राहिला.

श्री लोनारे 19:00 वाजता आरपीएफ बाह्य चौकी घोडाडोंगरी येथे आले, जेथे दोन पंचांच्या साक्षीने बॅग उघडून सर्व साहित्य तपासले. श्री लोनारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बॅगमध्ये लॅपटॉप व इतर साहित्य, ज्याची एकूण किंमत अंदाजे 42,000 रुपये होती, सुरक्षित अवस्थेत सापडले.

# गजानन प्रसाद नगरात अशुद्ध पाण्याचा पुरवठा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

येथील गजानन प्रसाद नगर मधील हनुमान मंदिर जवळील परिसरात गेल्या दोन महीन्यापासुन गढुळ पाण्याचा पुरवठा सुरू आहे. दहा दिवसा पूर्वी वेणा जलाशयाची पिण्याची पाईप लाईन फुटल्यामुळे परिसरात सतत पाणी वाहत आहे. या विषयी मोहन ठाकरे यांनी नगरपरिषदचे कर्मचारी भिमराव जासुतकर तसेच अभियंता सुषमा भालेकर यांना फोन द्वारे याची माहिती दिली होती.

परंतु वेणा जलाशयाचा कारभार नगर परिषद कडे नसल्यामुळे त्यांनी वेणा जलाशय यांना या विषयी कळविण्याचे सांगीतले. पाईप फुटल्यामुळे परिसरात अशुद्ध पाण्याचा पुरवठा सुरू आहे.

याकडे वेणा जलाशयाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन शुध्द पाण्याचा पुरवठा सुरू करण्याची मागणी स्थानीक रहीवाशी सामाजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे, अमित हुसनापुरे, नामदेव शेळके, अल्केश झरपडे, ज्ञानेश्वर चिखलेकर, अनिल धानोरकर, देवराव अखंड, श्रीराम सोनेकर, अविनाश गोटेकर, विनय लांजेवार, सुधीर जवंजाळ तट्टे, मुन्ना राजपूत आदींनी केली आहे.

# मानधनाकरीता कलावंतांची वयोमर्यादा ४० वर्ष करण्यात यावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मानधन मिळण्याकरीता कलावंतांची वयोमयार्दा ४०वर्ष करण्यात यावी अशी मागणी ओबीसी सेवासंघाचे जिल्हा अध्यक्ष नारायण उदापूरे यांनी केली आहे.संत महात्म्यांच्या महाराष्ट्र भूमीत लोक कलावंताचा फार मोठा वारसाआहे.काळानुरुप ही कला हळुहळु लोप पावत चालली आहे. ही कला जीवंत ठेवायची असेल तर कलावंतांच्या आर्थिक उन्नतीत भर घालणे आवश्यक आहे. लोक कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातूनमनोरंजनासह समाज प्रबोधनाचे कार्य करतात, तमाशा, दंढार, गोंधळ, भजन, किर्तन, भागवत प्रवचन बहुरुपी अन्य क्षेत्रात हे कलावंत कार्यरत आहेत. त्यांना चांगले आयुष्य जगता यावे. वयोमयार्दा शिथिल करुन ४० वर्ष करण्यात यावी जेणेकरुन कलावंतांना या मानधनाचा अधिक लाभ होवू शकेल. शासनाने याबाबत गांभियार्ने विचार करुन मानधनाकरीता ४०वर्ष वयोमयार्देचा जीआर काढून कलावंतांना प्रोत्साहीत करावे, अशी मागणी ओबीसी सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष नारायण उदापूरे यांनी केली आहे .

# डॉ. संजय ढोबळे यांच्या संशोधन समूहाचे ३ महिन्यात तब्बल १७ पेटंट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्रा.डॉ. संजय जानराव ढोबळे व त्यांचे संशोधक विद्यार्थी यासह संशोधक सहयोगी यांनी संयुक्तपणे काम करून त्यांच्या १७ पेटंटला मागील ३ महिन्यात मान्यता प्राप्त झाली आहे. डॉ. संजय ढोबळे व त्यांच्या संशोधक सहयोगींनी ल्युमिनिसेन्स मटेरियल विषयात संशोधनास लागणारे व समाजपयोगी कार्यावर नवकल्पनांना प्रोत्साहित करीत तब्बल १७ पेटंट प्राप्त केले आहे.

भौतिक शास्त्रासह आंतर विषयांमध्ये भौतिक शास्त्राची उपयोगिता सांगत वषार्नुवर्ष संशोधनाची कल्पना व त्यावर विचारपूर्वक कार्य करून त्यांनी एकूण १७ पेटंटला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला संशोधनाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी उत्कृष्ट कार्य केले आहे. डॉ. ढोबळे यांचे एकूण ८० पेटंट असून त्यापैकी ४७ पेटंटला मान्यता मिळाली आहे, हे विशेष.



त्यांच्या १७ पेटंटमध्ये त्यांचे सहकारी संशोधक व संशोधक विद्यार्थ्यांमध्ये डॉ. शामली गुप्ते, डॉ. अमित बंसोड, प्रियल चौधरी, सागर पवार, डॉ. यातिश परवाह, राहुल पवार, डॉ. नयना शिरभाते, प्रतिक तायडे, डॉ. वैशाली पिंपळे, डॉ. सीमा निम्बारते, डॉ. नीरजा हरदास, डॉ. अर्चना कुलकर्णी, प्रीती डोंगरे, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. चंद्रशेखर डोईफोडे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. रूपाली महाखोंडे, डॉ. अतुल येरपुडे, डॉ. राकेश रॉय, डॉ. श्वेता पार्वे, चंद्रहास नंदनवार, डी. एम. परशुरामकर, आर.एस. मेश्राम, डॉ. निरुपमा ढोबळे, डॉ. विभा चोपडा, डॉ. आरती मुळे, डॉ. स्वाती बिश्नोई, डॉ. शरद देशमुख यांनी कार्य केले आहे.

> डॉ. ढोबळे यांनी आतापर्यंत ९५९ शोधनिबंध स्कोपसवर प्रकाशित केले असून त्यांचे सायटेशन १३,८६६ आहे व एच इंडेक्स ४८ आहे. त्याप्रमाणे गुगल स्कॉलरवर त्यांचे सायटेशन १६,९५३ असून ए-इंडेक्स ५४ तर आय-टेन इंडेक्स ४५६ आहे.

डॉ. ढोबळे यांनी आतापर्यंत ९५९ शोधनिबंध स्कोपसवर प्रकाशित केले असून त्यांचे सायटेशन १३,८६६ आहे व एच इंडेक्स ४८ आहे. त्याप्रमाणे गुगल स्कॉलरवर त्यांचे सायटेशन १६,९५३ असून ए-इंडेक्स ५४ तर आय-टेन इंडेक्स ४५६ आहे. वरील संशोधनाचा त्यांचा अनुभव बघता त्यांना नुकतेच नॅचर या प्रतिष्ठित जनरलसाठी संपादकीय मंडळावर घेण्यात आले आहे हे विशेष.


भौतिकशास्त्र विभागातील शिक्षक व त्यांच्या संशोधक सहकाऱ्यांनी तब्बल १७ पेटंट मिळवीत यश प्राप्त केल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर सर्व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# तू लढला नाहीस तरी चालेल, पण मत विकू नको


## विद्यार्थ्यांचे जनजागृती करत मतदान करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

शालेय विद्यार्थ्यांनी हातात वेगवेगळे संदेश लिहिलेले फलक घेवून मतदानासंबंधी केलेल्या जागृतीचा एक व्हिडीओ सध्या तुफान व्हायरल होत आहे. यात "तू लढला नाहीस तरी चालेल. पण, मत विकू नको', असे आवाहन केले आहे.




आजचा जनावरांचा बाजारभाव या फलकापासून व्हिडिओची सुरूवात होते. म्हैस ९ हजार रुपए, गाय १ लाख रुपए, शेळी १२ हजार तर कुत्रा ६ हजार रुपए असे फलक घेवून विद्यार्थी एका मागोमाग एक येत जातात. निवडणुकीत स्वतःला विकणाऱ्या माणसाची किंमत फक्त ५०० रुपए आहे. मुर्ख माणसा तुज्यापेक्षा कुत्रा महाग आहे असे फलक घेवून विद्यार्थी येत राहातात...आपला स्वाभिमान गहाण ठेवू नका, आपले मत बहुमूल्य आहे ते विकू नका आणि वाया घालवू नका असे आवाहनही ते करतात. आणि सरते शेवटी सोडा सर्व काम करूया मतदान असा संदेशही देतात...




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर हा व्हिडीओ खूपच व्हायरल होत आहे. निवडणुकीत मते विकत घेण्याचे, मतदारांना प्रलोभन दाखवण्याचे प्रयत्न होतात. अनेक प्रसंगी मतदार या प्रलोभनांना बळी पडल्याचेही दिसून येते. यावर अंजन घालणारा हा व्हिडीओ आहे...लोकशाही सुदृढ करायची असेल तर निवडणूक स्वच्छ व पारदर्शक होण्याची गरज असते. त्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाही शिक्षण देण्याची आवश्यकता असते.

शालेय शिक्षणात नागरिकशास्त्र शिकवले जाते. पण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून नागरिकशास्त्र शिकवण्याचा यशस्वी प्रयोग अनेक शाळा करतात. मतदान वाढीसाठी एक अफलातून उपक्रम करणाऱ्या राज्यातील एका शाळेचा एक व्हिडीओ सध्या तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडीओत विद्यार्थ्यांनी काहीही करा, पण मतदान करा असे आवाहन करताना स्वतःचे मत विकू नका असे आवाहनही केले आहे. विधानसभा निवडणूक २०२४ साठी बुधवार,२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान आहे.

शासनातर्फे मतदान वाढीसाठी पथनाट्य, फ्लॅशमॉब, शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती असे उपक्रम केले जात आहे. मतदानाच्या दिवशी लागून सुट्या आल्यास लोक सहलीला निघून जातात. परिणामी मतदानाचा टक्का घसरतो. हे टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने यावर्षी आठवड्याच्या मध्यातला दिवस निवडला आहे.

# वाडीत राष्ट्रीय दुय्यमचा खडा तमाशा गुरुवारी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

येथील वेणा जलाशय कार्यालय जवळील वेणा टॅकच्या खालील मैदानात शिवशक्ती सांस्कृतिक मंडळातर्फे राष्ट्रीय दुय्यमचा खडा तमाशा गुरुवार ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजता पर्यंत आयोजित केला आहे.

यावेळी पंचरंगी निशान खडी गंमत मध्ये शाहीरा उर्मिला चौधरी,सहशाहीर विलास बोबडे, नृत्य किशोर छकुली,नकलकार गणेश भांगळकर,ढोलक मास्टर संजय खंडाळ,क्लाट मास्टर मनोज खडसे,सुर मा. संजय राऊत ,पार्टी संचालक राजु भोयर संपुर्ण पार्टी सहीत तसेच राष्ट्रीस जन जागृती निगुणी निशाण पार्टी मध्ये शाहीर मारोती मारबते,सहशाहीर उमेश खडसे, नृत्य अवि, अनु,नकलकार चिंतामण शेंडे,ढोलक मास्टर जैद्रा वानखेडे,क्लाट मास्टर शेखर खडसे,कोरस शेखर टिचकुले, सुखदेव अवजे संपुर्ण पार्टी सहीत उपस्थित राहणार आहे.

परिसरातील नागरीकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून पारंपारीक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक गोविंदराव रोडे,अश्विन चिंचुलकर, निकेश यादव , निलकंठ निखाडे, विक्की भुडे आदींनी केले आहे.

# महावितरणची हर घर दिया, हर घर दिवाली संकल्पना यशस्वी
## विदर्भातील ६,२५० ग्राहकांचे आयुष्य उजळले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

दिवाळीच्या प्रकाशपर्वात नागरिकांच्या घरासोबत त्यांचे आयुष्य देखील प्रकाशमान व्हावे यासाठी महावितरणतर्फे.राबविण्यात आलेल्या हर घर दिया, हर घर दिवाली या संकल्पने अंतर्गत विदभार्तील तब्बल 6,250 ग्राहकांना नवीन वीज जोडणी देत त्यांचे आयुष्य प्रकाशमय केले आहे.



महावितरणच्या नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहीमेत विदभार्तील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील 6,250 ग्राहकांना नवीन वीज जोडणी देत त्यांची दिवाळी गोड केली आहे. यात सर्वाधिक नागपूर जिल्ह्यातील 1,268, बुलढाणा जिल्ह्यातील 1,214 तर त्याखालोखाल गडचिरोली जिल्ह्यातील 704, अमरावती जिल्ह्यातील 673, अकोला जिल्ह्यातील 548, चंद्रपूर जिल्ह्यातील 525, वाशिम जिल्ह्यातील 337, यवतमाळ जिल्ह्यातील 326, भंडारा जिल्ह्यातील 266, वर्धा जिल्ह्यातील 219 तर गोंदिया जिल्ह्यातील 181 ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आली. यात पायाभुत सुविधा उपलब्ध नसलेल्या 248 ग्राहकांकडे त्या सुविधा उपलब्ध करून देत तर पायाभुत सुविधा उपलब्ध असलेल्या 6,002 ग्राहकांना वीज जोडणी देत त्यांना प्रकाश देण्याचे महत्वपुर्ण काम महावितरणने अवघ्या 10 दिवसात केले आहे.

महावितरणकडे नवीन वीज जोडणीचे अर्ज करुन आवश्यक शुल्काचा भरणा केलेल्या ग्राहकांची दिवाळी प्रकाशमय व्हावी, त्यांना अंधारात राहावे लागू नये यासाठी प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी 25 ऑक्टोंबर रोजी मांडलेल्या हर घर दिया, हर घर दिवाली या संकल्पनेला अनुकुल प्रतिसाद देत 25 ऑक्टोंबर पासून राबविण्यात आलेल्या या संकल्पनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी विदभार्तील सर्व अभियंत्यांनी विशेष परिश्रम घेत, ज्या ग्राहकांकडे वीज जोडणीसाठी आवश्यक असलेल्या पायाभुत सुविधा उपलब्ध नाहीत अश्या ग्राहकांकडे त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या यात सर्वाधिक 40 वीज जोडण्या खामगाव विभागात तर नागपूर येथील सिव्हील लाईन्स विभागाने 30 ग्राहकांकडे पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देत तेथे नवीन वीज जोडणी उपलब्ध करुन दिली. अकोला ग्रामीण विभागाने सर्वाधिक तब्बल 359 विज जोडण्या दिल्या, वाशिम विभागाने 337, काँग्रेसनगर विभागाने 253 तर बुटीबोरी विभागाने 248 नवीन वीज जोडण्या दिल्या.

या 6,250 नवीन वीज जोडण्यांमध्ये 5,479 घरगुती, 593 वाणिज्यीक, 62 औद्योगिक तर 136 इतर वर्गवारीतीअ ग्राहकांचा समावेश असून नवीन वीज जोडणीसाठी अर्ज करुन आवश्यक शुल्का भरणा केलेल्या प्रत्येक ग्राहकाला त्वरीत वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्यास महावितरण कटिबद्ध असल्याने महावितरणतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# रामटेकमध्ये मुळक रिंगणात
## उमरेडमध्ये राजू पारवेंची माघार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

जिल्ह्यातील विधानसभेच्या १२ जागापैकी सर्वात लक्षवेधी ठरलेल्या रामटेक विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक यांनी येथील शिवसेना ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार विशाल बरबटे यांच्या विरोधात केलेल बंड कायम आहे. मात्र उमरेडमध्ये भाजपचे अधिकृत उमेदवार सुधीर पारवे यांच्या विरोधातील शिवसेना (शिंदे) उमेदवार राजू पारवे यांनी दाखल केलेला अर्ज मागे घेतला आहे.

हिंगणा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार रमेश बंग यांच्या विरोधात त्यांच्याच पक्षाच्या जिल्हा परिषद सदस्य उज्वला बोढारे यांनी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे हिंगण्यातील राष्ट्रवादीतील बंड टळले. काटोल मतदारसंघात भाजपचे अधिकृत उमेदवार चरणसिंह ठाकूर यांच्या विरुद्ध अजित पवार गटाचे सुबोध मोहिते यांनी अर्ज दाखल केला होता. तो त्यांनी सोमवारी मागे घेतला.

रामटेक विधानसभा मतदारसंघात राजेंद्र मुळक यांची बंडखोरी राज्यात सर्वाधिक चचेर्ला गेली. त्यांनी अर्ज मागे घ्यावा म्हणून त्यांना प्रदेश काँग्रेसकडून विनंती करण्यात आली होती. मात्र त्यांनी निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर ठाम राहण्याचे ठरवले. ही लढत चुरशीची होणार आहे. येथे शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार आशीष जयस्वाल रिंगणात आहेत.



येथे त्यांच्याच पक्षाचे नरेश धोपटे यांनी अर्ज भरला होता. पण त्यांनी माघार घेतली. उमरेडमध्ये राजू पारवे यांनी भाजप विरोधात केलेली बंडखोरी चर्चेत होती. त्यांच्याशी भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पारवे यांच्याशी दुरध्वनीवरून चर्चा केली.

त्यानंतर पारवे यांनी माघार घेतली. काटोल मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सलील देशमुख यांच्या विरुद्ध युवक काँग्रेसचे याज्ञवल्क्य जिचकार रिंगणात कायम आहे. महाविकास आघाडीतील हे बंड सलील देशमुख यांच्यासाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. मध्य नागपूरमध्ये काँग्रेसचे बंटी शेळके यांच्या विरुद्ध काँग्रेस नगरसेवक रमेश पुणेकर यांनी बंड केले आहे. ते हलबा समाज पुरस्कृत उमेदवार आहेत.

पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या विरोधात काँग्रेसचे पुरुषोत्तम हजारे यांनी तर भाजपचे या मतदार संघातील उमेदवार व विद्यमान आमदार कृष्णा खोपडे यांच्या विरोधात अजित पवार गटाच्या उमेदवार आभा पांडे यांनी उमेदवारी कायम ठेवली आहे. जिल्ह्यात महायुतीमध्येही बंड झाल्याचे यावरून दिसून येते. उमरेड मतदारसंघातून काँग्रेसचे उमदवार संजय मेश्राम यांच्या विरुद्ध काँग्रेसचे जिल्हा परिषद सदस्य मिलिंद थुटे रिंगणात होते. ते काँग्रेस नेते सुनील केदार यांचे समर्थक मानले जात होते. त्यांच्या माघारीमुळे मेश्राम यांना दिलासा मिळाला.

# रश्मी शुक्ला यांची संघ मुख्यालयाला भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

राज्य पोलीस दलाच्या प्रमुख पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी १ मार्च २०२४ ला अचानक नागपुरातील संघ महाल येथील संघ मुख्यालयात पोहचल्या होत्या. त्यांनी जवळपास अर्धा तास तेथील सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. पोलीस महासंचालकांच्या या दौऱ्याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. काँग्रेसचे नाना पटोले यांनी त्यांच्या विरोधात सर्व प्रथम नागपुरातून २४ सप्टेंबर २०२४ ला निवडणूक आयोगाला तक्रार केली होती.

रश्मी शुक्ला १९८८ च्या तुकडीच्या आयपीएस अधिकारी असून सध्या पोलीस महासंचालक पदाबरोबरच लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरोचा अतिरिक्त पदभारही त्यांच्याकडेच आहे. रश्मी शुक्ला जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणार होत्या.पण महाराष्ट्र पोलीस कायद्याचे थेट उल्लंघन करून त्यांना महायुती सरकारने बेकायदेशीरपणे जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली. त्यांची निष्पक्षता आणि प्रामाणिकपणाबद्दल शंका घेतली जाते. रश्मी शुक्ला यांनी त्यांच्या कार्यकाळात विरोधी



पक्षांच्या नेत्यांना त्रास देण्यासाठी आणि धमक्या देण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला आहे. अनेकदा खोट्या केसेस दाखल केल्या आहेत. रश्मी शुक्ला या भाजपासाठी राजकीय प्रचारक म्हणून काम करत आहेत. त्यांनी विरोधी पक्षनेत्यांचे फोन बेकायदेशीरपणे टॅप केले आहेत, त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत.

एक वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून त्यांची भूमिका पक्षपाती स्वरूपाची आहे. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या प्रभारी पोलीस महासंचालक या नात्याने त्यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना आणि सदस्यांना पोलीस स्टेशन आणि लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या कार्यालयात बोलावून धमकावले, असा आरोप काँग्रेसने केला होता.

तत्पूर्वी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या यवतमाळ दौऱ्यानंतर नागपुरात पोहचल्या. पोलीस मुख्यालयाच्या शिवाजी मैदानावर सुरु असलेल्या पोलीस क्रीडा महोत्सवाच्या कार्यक्रमात त्या सहभागी झाल्या होत्या. १ मार्चला दुपारी दोन वाजता अचानक त्यांनी महालमधील संघ मुख्यालयातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्याचे नियोजन केले. याबाबत पोलीस विभागाने कमालीची गुप्तता पाळली.

शुक्ला दुपारी दोन वाजता थेट संघ मुख्यालयात पोहचल्या. बंदोबस्तात तैनात असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक ते निर्देश दिले. त्यांनी तेथील सीसीटीव्ही यंत्रणादेखील तपासली. संघ मुख्यालयात रश्मी शुक्ला जवळपास अर्धातास उपस्थित होत्या. त्यांनी सुरक्षा व्यवस्थेबाबत काही निर्देश दिलेत. त्यांनी परिमंडळ ३ मध्ये उपायुक्त म्हणून काम केले आहे.

यामुळे त्यांच्याकडे संघ मुख्यालयाची माहिती अगोदरपासूनच होती. निवडणूक आयोगाने शुक्ला यांची बदली करण्याचे आदेश दिल्यानंतर या घटनाक्रमची चर्चा सुरू झाली आहे.

# ऑटोच्या धडकेत सायकलस्वार ठार

**नागपूर:** पाचपावली पुलावर भरधाव ऑटोने एका सायकलस्वार व्यक्तीला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी सायकलस्वाराचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. शकील अब्दुल सत्तार खान (58) रा. हंसापुरी, असे मृताचे नाव आहे. गत 8 सप्टेंबरच्या सायंकाळी शकील सायकलने काही कामानिमित्त जात होते. पाचपावली पुलावर एका ऑटोच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून शकील यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. सायकलसह रस्त्यावर पडून शकील गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आधी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती.

# स्थानकावर प्रवासी सुविधा आणि गर्दी व्यवस्थापनात वाढ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

सणासुदीच्या काळात वाढणाऱ्या प्रवासी गदीर्ला सामोरे जाण्यासाठी, सेंट्रल रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर रेल्वे स्थानकावर सुरक्षा, गर्दी व्यवस्थापन आणि प्रवासी सोयीसाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. या व्यवस्थांचा उद्देश सर्व प्रवाशांना एक सुरक्षित, आरामदायक आणि सुलभ प्रवास अनुभव प्रदान करणे आहे.

गर्दी व्यवस्थापनासाठी वाणिज्य आणि रेल्वे सुरक्षा बल विभागातून 100 हून अधिक अतिरिक्त कर्मचारी नेमण्यात आले आहेत. हे कर्मचारी चौवीस तास ड्यूटीवर असतात जेणेकरून स्थानकावर सुचारू कामकाज आणि सुरक्षितता सुनिश्चित करता येईल. तत्काल बुकिंग सुलभ करण्यासाठी, सहा अतिरिक्त पीआरएस (प्रवासी आरक्षण प्रणाली) काउंटर आणि सात यूटीएस (अनारक्षित तिकीट प्रणाली) काउंटर सुरू करण्यात आले आहेत. या अतिरिक्त काउंटरमुळे तिकीट सेवांमध्ये गती येईल आणि प्रवाशांचा प्रतीक्षा वेळ कमी होईल.

सर्व स्वयंचलित तिकीट व्हेंडिंग मशीनवर (एटीव्हीएम) सहाय्यक तैनात केले आहेत जे प्रवाशांना मदत करतात, ज्यांना तंत्रज्ञानाबद्दल अपरिचितता असते, ज्यामुळे तिकीट काउंटरवरील गर्दी कमी होते आणि तिकीटिंग अधिक सुलभ होते. स्थानक व्यवस्थापन टीम प्रत्येक तासाला गदीर्चे निरीक्षण करते. याशिवाय, फक्त तिकीट धारक प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर प्रवेश देण्यासाठी प्लॅटफॉर्म तिकीट विक्री तात्पुरती थांबवली गेली आहे.

स्थानकाच्या पश्चिमेकडील 500 प्रवाशांच्या क्षमतेचे एक समर्पित होल्डिंग क्षेत्र स्थापन केले गेले आहे. या क्षेत्रामुळे प्लॅटफॉर्म वरील गर्दी नियंत्रित करता येईल आणि प्रवाशांसाठी एक आरामदायक प्रतीक्षालय मिळेल.

चौवीस तास गर्दी व्यवस्थापनाची देखरेख करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यामुळे कोणत्याही आव्हानांचा वेळीच प्रतिसाद दिला जाऊ शकतो आणि स्थानकात सुरक्षित वातावरण ठेवता येईल. वाढीव प्रवासी मागणी पूर्ण करण्यासाठी नागपूरहून 13 विशेष गाड्यांची सुरुवात करण्यात आली आहे, ज्यामध्ये प्रमुख ठिकाणा साठी 7,400 हून अधिक अतिरिक्त सेवा उपलब्ध आहेत. प्रवाशांना ट्रेन वेळापत्रक, प्लॅटफॉर्म बदल आणि इतर प्रवासाशी संबंधित चौकशा वेळेत माहिती पुरवण्यासाठी अतिरिक्त चौकशी काउंटर लावण्यात आले आहेत, ज्यामुळे प्रवासाचा एकूण अनुभव सुधारला जाईल. आवश्यक माहिती प्रवाशांसाठी सोयीची बनवण्यासाठी स्थानकाच्या प्रमुख ठिकाणी गाड्या आणि स्थानकाच्या नियमांविषयी माहिती देणारे पोस्टर लावण्यात आले आहेत.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ११९ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ४ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (04) रोजी शोध पथकाने 119 प्रकरणांची नोंद करून 86,000/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 27 प्रकरणांची नोंद करून 10,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 800/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 6 प्रकरणांची नोंद करून 2,400/- रुपयांची वसुली करण्यात आली.

मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय,





कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 4,000 रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 37 प्रकरणांची नोंद करून 40,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वैद्यकिय व्यवसायिकांना बायोमेडीकल वेस्ट सर्वसाधारण कचऱ्यात टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 10,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 25 प्रकरणांची नोंद करून 5,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 12 प्रकरणांची नोंद करून 12,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. ओह नो हॉटेल यांनी टाकाऊ पदार्थ/जेवण टाकून चेंबर ब्लॉक केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. धंतोली झोन अंतर्गत हरीष गोधनी यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच मे. बंडुजी पत्राळी शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. सागर किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

सतरंजीपुरा झोन मे. तीजारे सोनपापडी कारखाना यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. लकडगंज झोन अंतर्गत रीतेश ठाकरे यांनी निरूपयोगी कचरा रस्त्यावर टाकल्याबद्दल रु. 5,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपद्रव शोध पथकाने 7 प्रकरणांची नोंद करून रू. 40,000/ दंड वसूल केला.

## निवडणूक खर्चासंदर्भात बैठकीचे आयोजन

**नागपूर :** निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नागपूर दक्षिण-पश्चिम, नागपूर दक्षिण, नागपूर पुर्व, नागपूर मध्य, नागपूर पश्चिम, नागपूर उत्तर (अ.जा.) तसेच काटोल, सावनेर, हिंगणा, उमरेड, कामठी व रामटेक मतदार संघातून २०२४ ची विधानसभा सार्वत्रिक निवडणूक घेतली जात आहे.

या विधान सभासाठी निवडणूक लढविणाऱ्या नामनिर्देशित उमेदवारांना वाटपानंतर निवडणूक खर्चा संदर्भात आयोगाच्या सर्व कायदेशीर तरतूदी आणि सुचना, त्याची देखरेख याबाबत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व उमेदवार, उमेदवारांचे खर्च प्रतिनिधीची ही बैठक, ५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी नागपूर येथे करण्यात आली आहे.

# अल्पवयीनसह 3 चोर पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर :** कॉटन मार्केट परिसरातील श्री भगवती ट्रेडर्स नावाच्या दुकानाचे कुलूप तोडून चोरी प्रकरणात गणेशपेठ पोलिसांनी अल्पवयीनसह तीन आरोपींना पकडले. त्यांच्याकडून 2.79 लाख रुपयांचा मालही जप्त केला. प्रज्वल उर्फ पज्जू भास्कर नगराळे (22) रा. गुलशननगर, रोहित अशोक भगत (18) रा. भीमनगर, अजनी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अल्पवयीन आरोपीही पोलिसांच्या ताब्यात असून पोलिस सर्वांची चौकशी करीत आहेत.

गत 26 ऑक्टोबरच्या रात्री अज्ञात आरोपींनी भगवती ट्रेडर्सच्या शटरचे कुलूप तोडून 8 लाखांची रोकड चोरी केली होती. तक्रार मिळताच गणेशपेठ पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी दिसत होते, मात्र फुटेज स्पष्ट नसल्याने त्यांची ओळख पटविणे कठिण होते. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. परिसरात त्यावेळी सक्रीय मोबाईल फोनचा डम्प डाटा काढला असता प्रज्वलची माहिती पुढे आली. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता रोहित आणि अल्पवयीनसोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींनी मौजमज्जा आणि शौक पूर्ण करण्यासाठी चोरी केल्याची माहिती दिली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख 1.60 लाख रुपये, 2 दुचाकी वाहन, चोरीच्या पैशातून खरेदी केलेला मोबाईल फोन आणि इतर वस्तूंसह 2.79 लाख रुपयांचा माल जप्त केला.

# महाराष्ट्रातील ओबीसी जनतेचा जाहीरनामा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

महाराष्ट्राची आगामी निवडणुक ही, 12.16 कोटी जनतेच्या जीवनमानाच्या भविष्याची वाटचाल संबधाने महत्वाची घटना आहे. आपल्या दृष्टीने ही निवडणूक व येणारी सत्ता सामान्य नागरिकांचे जीवन अधिक ऊन्नत करणारी, वंचितासाठी अधिक न्यायपुर्ण व सहभागी तसेच समावेशी विकासात्मक नीती निर्धारण करणाऱ्या प्रतिनिधित्वासाठीची आहे. यासाठी महाराष्ट्रातील 9.25 कोटी मतदार आपल्या विवेकाच्या अनुभवाची कसोटी लावणार आहे.

आपल्या समोर, या जनप्रतिनिधींचा वा राजकीय पक्षाच्या नीतिचा व त्यावर विराजमान असलेल्या प्रतिनिधींचा जीवन अनुभव आहे. या आधारे या सर्वांची आगामी कृति, संविधानाच्या ऊद्देश व दिशेला साधक ठरणार की अधिक खडतर ठरणार याचे आकलन असणार आहे. हे प्रतिनिधित्व वा त्यांचे सत्ताकारण विशेष



करुन कष्टकरी आणि वंचित व्यक्तिबाबत, अल्पसंख्याक बाबत अधिक न्यायपुर्ण, सन्मानपुर्ण करणारे आणि महिला व मुलींच्या सार्वजनिक सुरक्षित जीवनाची वाटचाल वृद्धींगत करणारे ठरावे, असे अपेक्षित आहे. येणारी राजसत्ता सामन्यांची, शेतकरी बळीराजाची आर्थिक व सामाजिक गळचेपी करणारी आणि प्रस्थापितांसाठी, धनीकांसाठी अधिक मखमली बिस्तरा साकारणारी व कार्पोरेटी संगनमताची राहणार आहे काय? याचेही चिंतन अपेक्षित आहे.

प्रस्तावित राजकीय नेतृत्व काही मौलीक जीवन मूल्यांबाबत व आचरणाबाबत जबाबदार की सार्वजनिक संकेत व मानवी मूल्यांना तुडवून पुढे जाणारे हुकमी व हेकेखोर व अहंकारी आहेत, याबाबतचीही तपासणी करावी लागणार आहे.

सरतेशेवटी आपण सर्व येणारी सत्ता, ही बलिदान व कष्टाने साकारलेली भारतीय लोकशाही व प्रगतीशील व सामाजिक न्यायाच्या संत महात्म्यांच्या विचार परंपरेने साकारलेल्या महाराष्ट्रीय रयतेचे निरपेक्षेता अधिक समृद्ध करणारी ठरावी या प्रतिक्षेत आहोत. कारण ओबीसी बहुजन हा परंपरागत सेवाकरी, कष्टकरी, श्रमजीवी आपल्या कृतिशी प्रामाणिक समुदायी असा आहे. आणि आजही परंपरेच्या ओज्यातून आणि कष्टाच्या बोज्यातून सुटलेला नाही. त्याची जीवन वाटचाल अधिक सुलभ व सुखमय होणार आहे काय? या काळजीने आपल्याला मतदानाला सामोरे जायचे आवाहन आहे.

यावेळी भुषण दडवे, अड.अशोक यावले, अजय लांबट, कृष्णकान्त मोहोड, असलम खातमी, अँड छायादेवी यादव, अजित भाकरे, नारायण चिंचोणे, राम वाडीभस्मे, अरुण पाटमासे, शंकरराव चुरागले, नक्की पटेल, शमीऊल्ला छवारे, अमोल तलखंडे, इंदूताई डफ, गुणवंत देशकर, प्रमोद लोन्हारे, डॉ. महेश जोगी, उपस्थित होते

# अवैध दारु विक्रीवर कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाची धाड

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ४ :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत सिहोरा गावात अवैध दारु विक्री वर कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने धाड मारुन आरोपी सुभाष मेश्राम ला अटक करुन त्याचा जवळुन ३७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार रविवार (दि.३) नोव्हेंबर ला दुपार च्या दरम्यान अवैध धंद्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि सिहोरा गावात सुभाष मेश्राम हे आपल्या राहत्या घरी अवैध दारु विक्री करत आहे.

अश्या मिळालेल्या माहिती वरुन कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने सुभाष मेश्राम यांचा घरी पोहचुन परिचय देऊन घराची झडती घेतली असता एका प्लॉस्टीक पिशवी मध्ये ५३ देशी दारु च्या निपा आढळुन आले . पोलीसांनी आरोप सुभाष भगवान मेश्राम (वय ४५) रा.सिहोरा , कन्हान ला अटक करुन त्याचा जवळुन एकुण ३७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे.

सदर ची कार्यवाही उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, महेश बिसेन, अमोल नागरे, अश्विन गजभिए, आकाश सिरसाट, आशिक कुंभरे, महिला कर्मचारी प्रतिभा मरस्कोले सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.